# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )

## श्रीसाई वाक्सुधा

वर्ष ६२ वे )    किंमत २ रुपये    ( अंक ८-९

नव्हेंबर–डिसेंबर १९८३    दूरध्वनी

श्रीसाईलीला दिवाळी विशेषांक    ८८२२५६१

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

हे साईनाथ स्वप्रकाश ।
आम्हां तुम्हीच गणाधीश ।
सावित्रीश किंवा रमेश ।
अथवा उमेश तुम्हीच ।। १९ ।।
तुम्हीच आम्हातें सद्‌गुरु ।
तुम्हीच भवनदीचे तारूं ।
आम्ही भक्त त्यांतील उतारू :
पैल पारू दाविजे ।। २० ।।
कांहींतरी असल्याशिवाय ।
पूर्वजन्मींचे सुकृतोपाय ।
केवीं जोडतील हे पाय ।
ऐसा ठाय आम्हांतें ।। २१ ।।
नमन माझें कुलदैवता ।
नारायणा आदिनाथा ।
जो क्षीरसागरीं निवासकर्ता ।
दुःख हर्ता सकळांचा ।। २२ ।।
परशुरामें समुद्र हटविला ।
तेणें जो नूतन भूभाग निर्मिला ।
प्रांत ' कोंकण ' अभिधान जयाला ।
तेथ प्रगटला नारायण ।। २३ ।।

—श्री साईसच्चरित्, अध्याय १ ला

## दिवाळी शुभचिंतन

ही दिवाळी
आणि नूतनवर्ष, साईभक्तांना,
आमच्या सर्व वाचकांना,
लेखकांना, कवींना,
आणि हितचिंतकाना
सुखाचे, समृद्धीचे
आणि उत्कर्षाचे
जावो अशी
श्री साई चरणी
प्रार्थना.

# अनुक्रमणिका–दिवाळीअंक १९८३

(१) संपादकीय
(२) साईनिकेतनमधील विजया-
दशमी.
(३) सौ. चंदवणकर निधन
(४) डॉ. श्री. दि. परचुरे
(५) १० वे लेखक-कवि संमेलन
(६) श्री स्वामी संजयानंद
(७) ले. क. मु. ब. निंबाळकर
(८) सौ. आसावरी वायकूळ
(९) प्रा. र. श्री. पुजारी
(१०) डॉ. सौ. सुमती खानविलकर
(११) प्रा. एच. बी. महाले
(१२) श्री. गजाननराव निरखे
(१३) श्री. के.पी पहाडे
(१४) सौ. पुष्पलता सूर्यवंशी
(१५) श्री. डी. बी. जगत्पुरीया
(१६) कु. सरल खारकर
(१७) श्री. ग. रा. पालकर
(१८) सौ. उषा रेगे
(१९) श्री. विलास गोडबोले
(२०) सौ. अरुणा साळगावकर
(२१) श्री. रामचंद्र जोशी
(२२) श्रीमती कृष्णाबाई ढेपे
(२३) श्री. राजाभाऊ पटवर्धन
(२४) सौ. सुवर्णलता गवंडे
(२५) श्री. विजयकुमार चिंदरकर
(२६) कु. डी. म्हात्रे
(२७) श्री. दिगंबर पेनुरकर
(२८) श्री. आर. एस. कोंकरे
(२९) सौ. सिंधु कृष्णराव सणस

(३०) श्री. मुकुंद इंगळे
(३१) श्री. दिलीप लांडे
(३२) सौ. प्राजक्ता गांधी
(३३) श्री. सा. व्यं. कुलकर्णी
(३४) सौ. पद्मावती वैद्य
(३५) श्री. माधवराव गोरे
(३६) सौ. नीलम देशपांडे
(३७) श्री. सूर्यकांत गर्जे
(३८) कु. सुषमा गीध
(३९) श्री. डी. बी. पोतनीस
(४०) लीलाताई गोलतकर
(४१) श्री. रमेश चव्हाण
(४२) कु. शुभांगी चुरी
(४३) श्री. प्रभाकर काटदरे
(४४) कु. सुधा देशपांडे
(४५) श्री. गौरूराम उरणकर
(४६) सौ. वसुंधरा चोरे
(४७) श्री. विठ्ठल पै
(४८) डॉ. इंदूताई नाईक
(४९) श्री. अनिल रिसबूड
(५०) सौ. प्रमोदिनी पोतनीस
(५१) श्री. मधुकर अंबाडे
(५२) सौ. तारा गाडगीळ
(५३) श्री. विश्वनाथ वरूणकर
(५४) सौ. मेधा केळकर
(५५) श्री. बाळकृष्ण नाखवा
(५६) सौ. नयना बिरमोळे
(५७) श्री. मनोहर राजे
(५८) सौ. शीला म्हात्रे
(५९) श्री. विजय सहामते
(६०) सौ. सुनिता कोंडकर
(६१) सौ. अरुणा कर्णिक
(६२) कु. अलका सावंत
(६३) सौ. रजनी घेवारी




प्रिय साईप्रेमीनों, मागील काही वर्षापासून तुमच्या आमच्या सर्वांच्या श्रीसाईलीला मासिकामधे आंतरबाह्य खूपच बदल झाला आहे आणि तो केल्याबद्दल, झाल्याबद्दल असंख्य वाचकांची स्वागतपर पत्रे आम्हांस हरहमेशा येत असतात त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

अलीकडे अलीकडे श्रीसाईलीलेवर लेखांचा आणि विशेषतः कवितांचा अक्षरशः वर्षाव होत आहे. परंतु लेखक-कवींनो, आपले साहित्य पाठवताना आता तरी निदान पुढील सूचनांकडे अवश्य लक्ष द्याच.

श्रीसाईलीला आणखीन आकर्षक वाटावी यासाठी प्रयत्न चालू आहेत. त्यासाठी दरवर्षी संमेलनेही भरवली जात आहेत. पण एक लक्षात ठेवा की आमचेकडे लांबच लांब लेख कृपया पाठवू नका. दीर्घलेख आता मुळीच नकोत. कारण एकतर आमची पृष्ठसंख्या मर्यादित म्हणजे अवघी ६४ पानांची आहे. यापैकी आठ ते दहा पाने संस्थानच्या वृत्तांसाठी व संपादकीय कामकाजासाठी वापरली जातात. जाहिराती असतात दोन पानांच्या. तेव्हा उरलेल्या ५० पानातच सर्व त्या साहित्याची दखल घ्यावी लागते. आखणी करावी लागते. सुमारे १० पाने तर काव्यसाहित्यालाच द्यावी लागतात. यामुळे अवघ्या ४० पानांवरच गद्यसाहित्य छापले जाते. तेव्हा आपले लेख पाठवताना ते सुवाच्य अक्षरात असावेत याकडे जरूर लक्ष पुरवा. मजकूर कागदाच्या एकाच बाजूने लिहा. कागदाच्या दोन्ही बाजुला लिहिलेली व गिचमीड अक्षरातली कितीतरी हस्तलिखिते आम्हांला आता नाईलाजाने परत पाठवावी लागत आहेत. भक्तांनो, तुम्ही पाठविलेला लेख जर सुवाच्च व शुद्ध नसेल तर कंपोझिटरला किंवा मोनो टाईप मशीन ऑपरेटरला तुमचा लेख वाचायला फार वेळ लागतो व अशा परिस्थितीत तो अक्षरशः कंटाळतो आणि मग मजकूर तयार होतो त्यात असंख्य चुका असतात व त्या पुन्हा पुन्हा दुरुस्त करायला आम्ही जरी सांगितल्या तरी त्या पुढे पुढे होणाऱ्या घाईत सुधारावयाच्या तशाच राहून जातात आणि मग चुकांनी मजकूर तसाच प्रसिद्ध होतो. तेव्हा या परिस्थितीत निदान आतातरी बदल करणे हे साईप्रेमीनो केवळ तुमच्या हातात आहे. नवनवीन लेखक-कवींना भरपूर वाव

देण्याचे आम्ही ठरविले असल्याने मुद्दाम हे निवेदन या दिवाळी अंकातून देण्याचे योजले. पुढील नववर्षारंभ अंकापासून आंतरबाह्य आणि मजकूरातही बराचसा आकर्षक बदल झालेला आपणाला दिसून येईल. पण हे सर्व तुमच्याच सहकार्यावर अवलंबून आहे.

दिवाळीच्या मंगल सणाप्रित्यर्थ तुम्हांसर्वांना आमच्या सर्वांच्या शुभेच्छा.

श्रीसाईलीलेचा हा दिवाळी अंक नोव्हेंबर–डिसेंबर असा जोडअंक असल्याने वेगळा डिसेंबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

यापुढील अंक जानेवारी १९८४ मध्ये प्रसिद्ध होईल.

★

# साईनिकेतनची विजयादशमी

सर्वसाधारण साईभक्तांची इच्छा साईबाबांच्या उत्सवासाठी शिर्डीला जाण्याची असते. पण काही ना काहीतरी अडचणीमुळे पुष्कळांना ते जमत नाही. म्हणून मग ते अगदी जवळच्या साईमंदिरात जातात व उत्सवाच्या दिवशी साईबाबांचे दर्शन घेतात. साईनिकेतन, दादर येथे शिर्डी संस्थानचे मुंबईचे कार्यालय आहे, पण साईबाबांचा एक पुतळा त्या ठिकाणी साईभक्तांच्या दर्शनासाठी ठेवलेला आहे आणि म्हणूनच शिर्डीला जे तीन मोठे उत्सव होतात ते अल्प प्रमाणावर ह्या कार्यालयातही साजरे केले जातात. साईनिकेतनच्या आजूबाजूस रहाणाऱ्या भक्तांस हे माहीत असल्यामुळे ते नेहमी तीनही उत्सवाच्या दिवशी दुपारी बारा वाजता बहुसंख्येने बाबांच्या आरतीला उपस्थित राहून बाबांची उपासना व प्रार्थना करतात.

रविवार दि. १६ ऑक्टोबर १९८३ ला सकाळी नऊच्या सुमारास साईनिकेतन येथील कार्यालय उघडण्यात आले व तेव्हापासूनच साईभक्तांची रिघ दर्शनासाठी लागली. भक्त येत होते व दर्शन घेऊन, उदबत्त्या लावून व हार वगैरे घालून निघून जात होते. पण दहा साडेदहा नंतर येणारे भक्त आरतीपर्यंत थांबून आरती करून जाण्याच्या तयारीने येत असतात. त्याप्रमाणे भक्त येऊन दर्शन घेऊन बसू लागले. भक्तांची थोडी गर्दी झाल्यावर अकराच्या सुमारास सौ. एम. पी. वाणी व त्यांची कन्या कु. नम्रता ह्यांनी भक्तिगीते गाण्यास सुरुवात केली. दोन्ही गायिका नवशिक्या असून नुकत्याच गायन शिकू लागलेल्या आहेत हे त्यांच्या गायनावरून स्पष्ट होत होते. परंतु कु. नम्रता हिचे वय सध्या दहा अकरा वर्षांचेच असेल. तिला गोड गळ्याची देणगी बाबांच्याकडून मिळाली असल्याचे तिच्या गाण्यावरून जाणवले. तेव्हा तिने गाण्याचा सराव केल्यास तिला चांगले गाणे येईल ह्यात शंका नाही. तिने त्या तऱ्हेने प्रयत्न करावा असा सल्ला आम्ही तिला देत आहो. हा भक्तिगीतगायनाचा सुमारे अर्धा तास चाललेला कार्यक्रम संपला व इंग्रजी आवृत्तीचे कार्यकारी संपादक डॉ. श्री. दि. परचुरे ह्यांनी त्या दोनही गायिकांना संस्थानतर्फे प्रसाद व श्रीफल देऊन त्यांचा सत्कार केला.

ह्यानंतर श्री. विजय हजारे व श्री. प्रभाकर कोळमकर ह्यांनी संपादन केलेल्या साईप्रसाद ह्या दिवाळी अंकाचा प्रकाशन समारंभ करण्यात आला. आपल्या प्रास्ताविक भाषणात श्री. हजारे म्हणाले, " साईभक्त हो, मी गेली दोन वर्षे ह्या दिवाळी अंकाचे प्रकाशन करीत आलो परंतु त्याच्या प्रकाशनासाठी करावी लागणारी खटपट इतकी असते की नोकरी करून ती करणे मला फार कठीण जाते. म्हणून ह्यावर्षी हा अंक काढू नये असा निर्णय मी घेतला होता; परंतु श्री. बाबांच्या ह्या कार्यात तुम्ही खंड पडू देऊ नका तुम्हाला लागेल ती मदत मी करीन असा मदतीचा हात श्री. कोळमकर ह्यांनी पुढे केला व अन्य साईभक्तांनी देखील मला प्रोत्साहन दिले आणि त्यामुळे बाबांच्या कृपेने माझे कष्ट फळाला आले व हा अंक आज आपणापुढे येत आहे. श्री साईलीला मासिकाचे कार्य कारी संपादक डॉ. परचुरे ह्यांना मी त्याची प्रसिद्धी करण्यास विनंती करतो. ह्या अंकाची किंमत अगदी माफक म्हणजे फक्त सहा रुपये आहे; परंतु आज ह्या ठिकाणी तो मी साईभक्तांना पाच रुपयाना देणार आहे. ज्यांना तो घ्यावयाचा आहे त्यांनी तो घ्यावा अशी त्यांना विनंति आहे."

ह्यानंतर आपल्या भाषणात डॉ. परचुरे म्हणाले, साईभक्त हो, श्री. विजय हजारे स्वतःला वेडा म्हणवतात, साईवेडा म्हणून म्हणवतात. त्यांना सर्वत्र साईंचा वास दिसतो, व बाबांचे लहान मोठे कार्य करण्यासाठी ते सदैव आपली काया झिजवीत असतात. आजच्या दिवसात ह्या प्रकारचा अंक काढणे ही फार कठीण गोष्ट झालेली आहे. कागद व छपाई ह्यांच्या किंमती फार चढल्या आहेत. अंक छापण्यासाठी प्रेस मिळत नाही. कित्येक ठिकाणी अन्य दिवाळी अंक छापले जात असतात. त्यामुळे तुमचा अंक छापून देतो असे आश्वासन देऊनही अंक वेळेवर मिळण्याची पंचाईत पडते. अशा परिस्थितीत ह्या अंकाच्या प्रसववेदना किती असतात ह्याची कल्पना कदाचित प्रसववेदना सहन करणाऱ्या स्त्रियाच करू शकतील. तेव्हा

अशा प्रकारे कष्ट करून हा अंक प्रसिद्ध करण्याचे काम श्री. हजारे करतात ह्याचे एकमेव कारण म्हणजे साईभक्तीचा प्रसार होईल तितका करणे हे त्यांचे ध्येय आहे, व त्याकरिता वाटेल तो त्यागही ते करण्यास तयार असतात. एवढे कष्ट करून आज जो अंक त्यांनी तयार केला आहे त्याचे प्रकाशन झाले असे मी जाहीर करतो व त्यांनी दिलेल्या सवलतीचा फायदा घेऊन आपण सर्वांनी हा अंक

विकत घ्या व वाचा आणि त्याचा प्रसार करा अशी मी आपणास विनंति करतो. मला ह्या अंकाच्या प्रकाशनाची ही संधी दिल्याबद्दल मी संपादकांचे आभार मानतो. "

साईप्रसादचे दुसरे संपादक श्री. प्रभाकर कोळमकर ह्यांनी सर्वांचे आभार मानल्यावर हा समारंभ आटोपता घेण्यात आला. कारण आता घड्याळाचा काटा बाराकडे सरकू लागला होता. आरतीच्या पूर्वी जमलेल्या सर्व भक्तांना सौ. ताराबाई, चेंदवणकर ह्या साईचरणी दि. ७ ऑक्टोबर १९८३ ला विलीन झाल्याचे वृत्त डॉ. परचुरे ह्यांनी सांगितले व सर्वसाधारण परंपरेप्रमाणे त्याबद्दल दुखवटा व्यक्त करणे आवश्यक आहे. असे प्रतिपादले; परंतु ही सभा नसल्यामुळे आरती संपल्यावर प्रत्येकाने सौ. ताईबाईंच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी आपल्या मनात साईचरणी प्रार्थना करावी अशी विनंती त्यांनी सर्वांना केली व आरतीची सुरवात झाली. आरती संपल्यावर सर्वांना प्रसाद वाटण्यात आला. ह्या वर्षीचा पुण्यतिथी दिवस रविवारी आला होता त्यामुळे बहुतेक मंडळी सकाळच्या वेळातच येऊन दर्शन घेऊन गेली होती. त्यामुळे पूर्वी जाहीर केल्याप्रमाणे साईनिकेतन येथील कार्यालय दुपारी तीन वाजता बंद करण्यात आले व हा छोटासा उत्सव संपला. त्या दिवशी सुमारे १५०० च्या वर साईभक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला.

# स्वर्गवासी सौ. ताराबाई चेंदवणकर



श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या श्रीसाईलीला या आंतरराष्ट्रीय सुकीर्तीच्या मासिकाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांच्या सुशिल आणि सुविद्य पत्नी सौ. ताराबाई यांचे घटस्थापना नवरात्रीच्या पहिल्याच दिवशी शुक्रवार दिनांक ७ ऑक्टोबर १९८३ रोजी पहाटे ६–१५ वा. अचानकपणे देहावसान झाले. निधनसमयी त्यांचे वय ५२ वर्षांचे होते.

सौ. ताराबाई यांनी वयाच्या १८–२० वर्षांपासून नोकरीला सुरुवात केली. त्यांनी मुंबईतील हरकिसनदास, डॉ. के. सी. शहा, जैन क्लिनीक इ. विविध रुग्णालयातून असंख्य रुग्णाइतांची दुःखी पिडीतांची सेवा सुश्रुषा केली होती.

त्या लहानपणापासूनच साईभक्त होत्या. शिरडीला त्यांनी अनेकदा भेटी दिल्या होत्या. १९५६ साली विवाहानंतर संसार व इतर विविध कार्यात गुंतल्यामुळे त्यांचे शिरडीस जाणे कमी झाले परंतु आपल्या पतीने श्रीसाईलीलाची का. संपादकाची जबाबदारी पत्करल्यानंतर त्यांचे जाणे पुन्हा वाढले. श्रीसाईलीलाच्या सर्व संमेलनास त्या हजर होत्या व सर्व साईभक्तात त्या 'ताराई' या नावाने आदराने ओळखल्या जात. साईलीलामधून त्यांनी बाबांवर विविधतेने कविता केल्या त्यापैकी काही कॅसेटस करिताही निवडल्या गेल्या होत्या.

१९७५ साली त्यांना अर्धांगाचा झटका आला. तेव्हा त्यांचे डावे अंग किंचीत् अधू झाले खरे परंतु तशाही अवस्थेत त्यांनी भरपूर प्रवास केला. घरातील सर्व

कामकाज इतकेच नव्हे तर संपूर्ण स्वयंपाकही त्या एका हाताने व विलक्षण गतीने कशा काय करीत याचे अनेकांना आश्चर्य वाटे. त्या गुणी, सुस्वभावी, मोठ्या जिद्दी, बोलक्या, लोकसंग्रही व आतिथ्यशिल वृत्तीच्या होत्या. त्यांच्या आकस्मिक निधनाने साईभक्तात कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या पश्चात त्यांचे पती: चिरंजीव सुभाष, सून नुकताचजन्मलेला नातू, व असंख्य साईभक्त परिवार आहे. श्रीसाई मृतात्म्यास चिरशांती व सद्गती देवो.

# श्रद्धांजली

दिनांक ७ ऑक्टोबर १९८३ ला सकाळी सौ. ताराबाई चेंदवणकर साई चरणी विलीन झाल्याची बातमी, माझे मित्र व एक निस्सीम साईभक्त श्री. इनामदार ह्यांनी मला टेलीफोनवरून कळविली तेव्हा मला धक्काच बसला आणि क्षणभर ही बातमी मला खरीच वाटेना. सुमारे सात वर्षापूर्वी त्यांना अर्धांगवायूचा झटका आला होता. त्यावेळी त्या शिवच्या हॉस्पिटलमध्ये उपचार करून घेऊन बऱ्या झाल्या होत्या आणि बहुतेक सर्व नित्याचे व्यवहार करीत होत्या, सर्व, संमेलने उत्सव ह्यांत भाग घेत होत्या. सर्व ठिकाणी फिरत होत्या आणि म्हणून त्या इतक्या लवकर आपल्यातून निघून साईचरणांकडे धाव घेतील असे वाटले नव्हते; पण शेवटी असे दिसले की त्यांचे शरीर जर्जर झाले होते व साईभक्तीमुळे प्राप्त झालेल्या जबर इच्छाशक्तीच्या जोरावर त्या आला दिवस आपल्या चेहऱ्यावरचे हास्य मावळून न देता ढकलीत होत्या.

श्री. सदानंद चेंदवणकर ह्यांच्यावर साईलीला मासिकाच्या मराठी आवृत्तीच्या संपादनाची जबाबदारी भूतपूर्व कोर्ट रिसीव्हर श्री. का. सी. पाठक ह्यांनी १९७३ च्या अखेरीस सोपविली. त्यापूर्वी दोन्ही आवृत्यांचे काम मी पहात असे. श्री. सदानंद चेंदवणकर ह्यांना नेहमी नवीन विचार स्फुरत असतात. त्याप्रमाणे साईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक म्हणून सुमारे एक वर्ष काम केल्यानंतर ह्या मासिकाच्या कवी व लेखकांचे एक संमेलन शिर्डी येथे भरवावे असे विचार त्यांच्या मनात आले आणि त्यावेळचे कोर्ट रिसीव्हर श्री. का. सी. पाठक साहेब ह्यांनी ती कल्पना उचलून धरल्यामुळे साईलीला मासिकाच्या कवी लेखकांचे पहिले संमेलन दि. १८ व १९ जानेवारी १९७५ ला शिर्डी येथे पुण्याचे प्रसिद्ध साईभक्त एन. पी. तथा काकासाहेब अवस्थी ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरले. त्यापूर्वी कधी मी शिर्डीला गेलो नसल्यामुळे मुंबईपासून शिर्डीपर्यंत श्री. चेंदवणकर ह्यांच्या कुटुंबाबरोबरच मी प्रवास केला व त्या संमेलनात सौ. ताराबाई चेंदवणकर ह्यांचा माझा प्रथम परिचय झाला आणि त्यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्वाची छाप माझ्यावर त्या पहिल्या भेटीतच पडली. त्या ठेंगण्याठुसक्या व तसे पहावयास गेले तर कृशच होत्या; पण त्यांच्या वागण्यासवरण्यात

एक प्रकारचा चपळपणा होता. त्या पूर्वाश्रमी हॉस्पिटलमध्ये मेट्रन म्हणून काम करीत होत्या. त्यावेळी त्यांना लागलेल्या सवयीचा कदाचित तो परिणाम असवा. त्यांच्या बुद्धिमत्तेची चमक त्यांच्या चेहऱ्यावर व त्यांच्या वागण्या बोलण्यात कोणालाही तात्काळ दिसून येत असे आणि त्याचमुळे त्या पहिल्या भेटीतच कोणावरही छाप पाडीत असत.

का ते सांगता येत नाही. हा कदाचित योग असेल; पण सौ. ताराबाईंना अल्प परिचयातच माझ्याबद्दल आदर वाटू लागला व मला त्यांनी आपला मोठा भाऊ मानण्यास सुरवात केली म्हणून त्या मला सदोदित "दादा" ह्या नावानेच हाक मारीत असत व सतत आग्रहाने घरी बोलावीत असत. आपल्या घरगुती गोष्टींविषयी देखील त्या माझ्याशी पुष्कळ वेळा चर्चा करीत व काही वेळा त्याबद्दल सल्लाही विचारीत. त्याचप्रमाणे मलाही बऱ्याच त्या काही काही गोष्टी सांगत व त्या मी करितो की नाही ह्याकडे त्यांचे लक्ष असे.

सौ. ताराबाईंचा स्वभाव मनमिळाऊ व प्रेमळ होता म्हणूनच त्या त्यांच्या नातेवाईकांत, साईभक्तांत आणि साईलीला मासिकाच्या लेखक व कवींमध्ये फारच लोकप्रिय होत्या. साई परिवाराची हीच मजा आहे. साईभक्तीच्या निमित्ताने एकत्र आलेल्या साईभक्तांत जात, पात, सामाजिक व आर्थिक उच्चनीचता ह्यांचा कोठलाही अडसर येत नाही व सर्वजण साईबंधु व साईभगिनी होतात. ह्यामुळेच श्री. अनील रसाळ व श्री. विजय हजारे हे सौ. ताराबाईंना आपली मोठी बहीण मानीत तर सौ. शशीकला रेवणकरसारखी एक भावनाप्रधान मुलगी त्यांना आईप्रमाणेच मानीत असे. लोणावळचाच्या डॉ. इंदु नाईक व डॉ. (सौ.) सुमती खानविलकर देखील त्यांना मोठ्या बहिणीप्रमाणे मानीत व त्याप्रमाणे त्यांना मान देत असत. अशी आणखी किती नावे सांगावी? सांगावी तेवढी थोडीच! ही यादी वाढवावी तेवढी वाढेल. पण ह्या यादीत कोणाकोणाचा अंतर्भाव होऊ शकेल हे सर्व साईभक्त सहज सांगू शकतील.

साईबाबांनी सौ. ताराबाईंना भरल्या संसारातून वयाच्या केवळ ५२ व्या वर्षी आपल्याकडे न्यावे ह्यात आपणाला सामान्य जनांना विषाद वाटतो हे खरे, परंतु बाबांची ह्यात काय योजना होती हे आपणास कसे कळणार? अर्धांगवायूचा झटका आल्यापासून सौ. ताराबाईंचा एक हात व एक पाय काहीसा निकामी झाला होता. मधून मधून रक्तदाब वाढला की पुन्हा त्रास व्हायचाच. परंतु हे सर्व चेहऱ्यावर न

दाखविता, घरातील सर्व नित्याची कामे पार पाडून आपल्या चेहऱ्यावरचे हास्य लोपू न देण्याची अवघड कला सौ तारावाईंनी आत्मसात केली होती ती केवळ साईबाबांच्या प्रसादामुळेच असे म्हटले तर यात कांही वावगे होईल काय? पण या गरीब अबलेने ह्या यातना किती दिवस सहन करावयाच्या? साईबाबांना बहुधा सौ. ताराबाईच्या ह्या यातना पहावेनाशा झाल्या असाव्यात व या संपवण्यासाठीच यांनी सौ. ताराबाईंना आपल्या पायांपाशी येण्याची आज्ञा केली असावी. नाहीतर त्यांच्यासारख्या प्रेमळ बाईचा आपल्या सर्वांना सोडून जाण्यात साईबाबांच्या चरणी विलीन व्हायची ऐवढी घाई का व्हावी? त्यांच्या मुलाचे चि. सुभाषचे लग्न योग्य वेळी होऊन आता थोड्याच दिवसात घरात नातवंड येणार होते. त्याला पहाणे त्यांच्या नशिबी नव्हते असे दिसते; पण आपण त्याबद्दल काय बोलणार? सद्‌गुरु साईबाबांचा आदेश हा सर्वश्रेष्ठ आहे. त्यांना काय चांगले व काय वाईट हे आपणां सर्वांपेक्षा अधिक चांगल्या तऱ्हेने कळते. तेव्हा त्यांनी सौ. ताराबाईंना आपल्या पायांशी बोलाविले ह्यांत त्यांची साईभक्ति किती उत्कट होती ह्याचाच प्रत्यय आपणाला येतो. साईभक्ति सौ. ताराबाईंच्या इतकीच उत्कट व निरपेक्ष कशी होईल ह्याचाच प्रयत्न सर्व साईभक्तांनी करणे हीच आपापली श्रद्धांजली सौ. ताराबाईंना वहावी अशी माझी त्यांना विनंति आहे.

श्री साईचरणी विलीन झालेल्या सौ. ताराबाईंच्या आत्म्यास चिरशांति लाभो ही साईबाबांचेचरणीं प्रार्थना करणे एवढेच आता आपल्या हाती आहे, आणि ती प्रार्थनाच करून मी माझी श्रद्धांजली सौ. ताराबाईंना वहात आहे.

डॉ. श्री. दि. परचुरे<br>
कार्यकारी संपादक, श्रीसाईलीला<br>
(इंग्रजी आवृत्ती)

मी साईनाथ सेवा मंडळ नवापूर धुळे सौ. ताराबाईंना वाहिलेली श्रद्धांजली अर्पण करतो.

## अश्रुंची अंजली

आता फक्त उरलीसे ताराई तुझी स्मृती
नेत्रापुढे उभी राहे वात्सल्याची मुर्ती

पोरकाच वाटे जीव वाटे हुरहूर
शिरडीत शोधू कुठे प्रेमाची पाखर

माया तुझी माझ्यावर अलौकिक कसाची
त्रिभुवनी शोधुनिया नाही मिळायची

टाकोनिया का ग गेली तुझ्या लेकराला
भेटीसाठी ओढ माले लागली जीवाला

व्हायची ना कधी आता भेट तुझी परि
चंदनाची आठवण जपतो अंतरि

शिरडीच्या संमेलनी सौख्य जरी सारी
तुझ्याविण नसे मुळी गोडी त्यात खरी

लाभायची नाही आता मायेची साऊली
नित्य दिनी वाहतो मी अश्रुंची अंजली !

कवि---रमेश डी चव्हाणे, नवापूर
अध्यक्ष साईनाथ सेवामंडळ, नवापूर

# श्रीसाईलीला



## साईबाबा

भक्त स्वानुभव आदरांजली

# काशी ते शिर्डी पायी यात्रा प्रवास

–श्री स्वामी संजयानंद
बद्रीधाम, हिमालय.

० आमच्या पायी प्रवासातील हा एक अनुभव वेगळाच आहे. बाबांच्या तीन अटी होत्या. पहिली अट अशी पैशाला शिवायचे नाहीं. दुसरी अट कुणापाशी मागायचे नाहीं. तिसरी अट हॉटेलात खायचे नाही. या तीन अटी पाळून मी ही यात्रा पूर्ण केली.

ह्या अनुभवावरून हाच निष्कर्ष निघतो की श्री बाबांचे वर्चस्व सृष्टीतील सर्व प्राणी मात्रांवर होते. निर्जिव, सजीव देखिल बाबांना दबत असे. आतासुद्धा हाच अनुभव पुष्कळांना येत आहे.

आम्ही अजिंठा गावात (औरंगाबाद जिल्हा) रात्री मुक्काम करून अजिंठा लेणी पाहून संध्याकाळी पाच वाजता वाकोद या गावी आलो. तेथून पुढे पहूर शेंदुर्णी मार्गे जाण्याचे ठरविले. पण तेथील गावकऱ्यांना विचारले असता ते म्हणाले की तुम्ही व्हाया पळास खेडा शेंदुर्णी मार्गे जा म्हणजे तुम्हांला जास्त चालावे लागणार नाहीं.

आम्ही पति–पत्नी विचार करून रात्री मुक्काम पळास खेडा येथे करायचे ठरविले. पळासखेडा हे छोटेसे खेडे वाकोद पासून अवघे दोन मैलावर होते. अजून सुर्यास्त व्हायचा होता आम्ही रात्र पडायच्या आत त्या गावी पोहोचलो ते सरळ हनुमान मंदिरात सामान ठेवून मुक्काम ठोकला.

रात्री गावातील मंडळी एकत्र झाली. गावकऱ्यांनी आम्हाला किर्तन प्रवचना-साठी आग्रह केला. आम्ही दिवसभराचे थकल्या कारणाने त्यांच्या आग्रहास्तव फक्त दोनतीन भजने म्हणावयाचे ठरविले. जेवण वगैरे आटोपल्यावर आम्ही भजनाला बसलो, तो सकाळचे चार केव्हा वाजले हे आम्हाला कळले पण नाही. सकाळी तोंड वगैरे धुवून चहा वगैरे घेऊन पुढचा मार्ग धरण्याची तयारी केली. पण गावकरी काही जाऊ देईनात ते म्हणाले "महाराज आपल्यासारखी माणसं काय नेहमी नेहमी नाही येणार.', आता आला आहांत तर दोन दिवस रहा.

आम्ही त्यांच्या विनंतीला मान देवून त्या गावात राहिलो.

आता ह्या गावाची परिस्थिती अशी की "ते गाव मोगलाईकाळात बेचिराख होते. येथील वस्ती जास्त परदेशी लोकांची होती. दर आठवड्याला दोन वार देवीच्या नावावर बकरा बळी देवून ते मास हे लोक खात व वर दारू पिऊन गावात गोंधळ घालीत अशी ही स्थिती या गावाची होती.

आम्ही त्यांना "बकरा बळी" बंद करायला सांगितला तर त्यांच्यातील काही लोकांना ते आवडले नाही. ते आमच्यावर खूप चिडले. पण आम्ही आमचा हट्ट सोडला नाही. दररोज बाबांचे भजन करावयाचे व प्रवचन हेच आमचे काम. त्याचा काही लोकांवर परिणाम झाला, व त्यांनी आमच्याकडे येऊन संकल्प केला की आम्ही आजपासून मास खाणार नाही व दारू पिणार नाही. यावर ज्याला हे आवडले नाही ते लोक आमच्या विरुद्ध झाले. आम्हाला ते पाण्यात पाहू लागले, व ते वाट पाहू लागले की महाराज केव्हां गावातून जातात.

आम्हाला गावात बाबांचा प्रचार करून दहा दिवस झाले होते. नंतर आम्ही एका व्यक्तीच्या मळयात मुक्काम केला. तेथे अखंड धूनी पेटवली व संध्याकाळी गीता प्रवचन ठेवले. गावातून लोक रात्री प्रवचन ऐकण्यासाठी येऊ लागले. मळयामध्ये आमच्या बरोबरच गावातून दोन कुत्रे आले होते. ते आमच्या बरोबर राहू लागले. त्यात एक "ठगी" नावाची कुत्री होती ती गावातील पोलिस पाटलां-ची होती. जन्मल्यापासुन ती मुकी होती. तिला भुंकता येत नव्हते, व बारा वर्षा-पासून तिचा आवाज गावकऱ्यांनी ऐकला नव्हता.

एक दिवस आमच्या मळयात रहाणारे आमचे शिष्य गावात कंदिलात तेल भरण्यासाठी व गडी आपली भाकरी आणण्यासाठी गेले. मळयात फक्त आम्ही दोघेच, व कुत्री "ठगी" होती.

पावसाळी कृष्णपक्षाचे दिवस होते. संध्याकाळचे सात वाजले होते. ढगांच्या मुळे काळोख खूप झाला होता. कंदिल तर गावात नेला होता. आठ वाजेपर्यंत आमच्या माणसांपैकी कोणी आले नाहीं तेव्हां आम्हाला वाटले, आता ह्या जंगलात काय करायचे? आजूबाजूला माणसांची वस्ती नाहीं. ज्वारी बाजरीची पिकेंवर आलेली. त्याच्यात कोणी लपून बसले तर कळायचे नाही. गावात तर काही

माणसे आमच्या विरुद्ध होती ती सर्व दारूबाज होती. त्यांचा काही भरोसा करता येत नव्हता त्यांना माहिती पडल्यावर ते त्रास द्यायला येणार हे निश्चित होते.

चारी बाजूला शेते भरगच्च भरलेली सगळीकडे अंधार गुडूप झाला होता मी बाबांना आठवू लागलो. "ठगी" कुत्री आमच्या बाजूला खाटेखाली बसली होती मी तिला हाक मारून बोललो, 'की ठगी, आज तुझी परीक्षा आहे. इतके दिवस तू आमच्या बरोबर राहिलीस तेव्हा आता ह्या जंगलात तूच काय ते कर एवढे माझे बोल ऐकताच ठगी पटकन उठून उभी राहिली व आपला आळस झटकला व आमच्या अवती भोवती चौकस दृष्टीने कान टवकारून इकडे तिकडे फिरू लागली, थोड्या वेळाने दूरवर कंदिलाचा उजेड दिसू लागला. कंदिलाचा प्रकाश जसजसा आमच्या झोपडीच्या रोखाने जवळ येऊ लागला, तशी ती ठगी कुत्री त्या पाय वाटेवर जाऊन उभी राहिली. आम्हांला वाटले की कोणीतरी दारू पिवून आम्ही जंगलात एकटे आहोत असे पाहून आम्हांला त्रास देण्यास येत आहे आम्ही पण बाबांचा धावा करीत उभे राहिलो. आमच्या पासून २५-३० फुट अंतरावर कंदिल घेऊन येणारी व्यक्ति जशी जवळ आली, तशी ठगी कुत्री त्यांच्या अंगावर भुंकत तुटून पडली. तिचे ते आवेशाने भुंकणे ऐकून आम्ही थक्कच झालो.

आम्ही कंदिलाच्या उजेडात येणारी व्यक्ति पाहिली तर तो आमच्या शिष्याचा नोकर. त्याच्या मागे आमचा शिष्य रामसिंग शेवगण होता, व ही कुत्री नोकरांच्या अंगावर धावली होती. ह्या नोकराने १२ वर्षापर्यंत ठगीचा संभाळ केला होता व ठगी ही हलक्यासलक्या जातीची नसून "अल्सेशियन" उंच अशी कुत्री होती. ही आपल्या मालकाला चांगली ओळखत होती. मी जेव्हा तिला हाक मारली तेव्हा ती माझ्याजवळ परत आली. मी नोकराला विचारले की "तुझी कुत्री तुला कशी भुंकली?" तेव्हां तो म्हणाला "महाराज मला काय माहित" आणि "ह्याच माणसापासून आम्हांला धोका होता हे ठगीने बरोबर ओळखले."

रामसिंग म्हणाला की, "महाराज आश्चर्य हे की ठगी कुत्री १२ वर्षात आज पहिल्यांदाच कशी बोलली? खूप डॉक्टरी औषधे केली, पण ठगी कधी भुंकली नाहीं. अगदी मुकी होती. यावर मी म्हणालो की, आज बाबांनी ठगीवर कृपा केली. या नंतर चार पांच दिवसांनी आम्ही ते गाव सोडले. आमच्या बरोबर आम्हांला पोहोचविण्यासाठी रामसिंग, त्याची मुले, नोकर व ठगी कुत्री देखिल आली. पहुर गावी आल्यावर मी त्या लोकांना परत पाठविले. ते लोक परत निघाले. परंतु ठगी जाईना त्या लोकांनी ठगीला न्यायचे खूप प्रयत्न केले शेवटी

तिला साखळीने बांधून जबरदस्तीने नेले. शेतात पोहोचल्यावर रामसिंग व नोकर आम्ही जेथे धुनी पेटविली होती व बाबाचा फोटो पूजेला लावला होता, त्या ठिकाणीच राहिले. ती कुत्री पण तेथेच बाबांच्या फोटोखाली अन्नपाणी न घेता पडून राहिली. परत आपल्या मालकाकडे गावात गेली नाही तिला खायला घाला-यचा रामसिंगने खूप प्रयत्न केला पण ती अन्नाला शिवलीही नाहीं व चार-पाच दिवसांनी ती स्वर्गवासी झाली. बाबांच्या फोटोखाली धूनीजवळ तिने प्राण सोडले. बाबांच्या कृपेने तिला वाणी मिळाली. मोक्ष देखिल प्राप्त झाला. असे साईबाबा सर्व प्राणी मात्रांवर दया करतात कृपा करतात.

❖ ❖ ❖

# प्राण दाता साई

**आमचा दुसरा चमत्कारीक अनुभव असा—**

० सन १९७२ चे जानेवारी महिना. आम्ही पती-पत्नी पायी प्रवास करीत होतो. त्या प्रवासातील हा अनुभव आहे. १६ जानेवारीला आम्ही अमरावतीहून निघून मालखेडी पार करून चांदूर रेल्वे स्टेशनवर बसलो होतो. पायी चालून थकवा आला होता, व उपाशीसुद्धा होतो. बाकावर बसल्या बसल्या आमच्या गप्पा चालल्या होत्या. एवढयात दोन तरुण व्यक्ति "पांढरे धोतर व पांढरा शर्ट" असे स्वच्छ वस्त्र घातलेल्या, "आमच्या जवळ आल्या व ते दोघे आम्हांला म्हणाले की "महाराज येथे काय बसलात? येथे बसून चालणार नाहीं. निंभोरा (बोडखा) गावी तळणी रेल्वे स्टेशनवर "संत मेळा" भरला आहे. महाराष्ट्रातील सर्व संत आले आहेत फक्त तुम्हीच बाकी राहिला आहात व तेथे तुमचे महत्त्वाचे काम आहे. तुम्ही चला. आम्ही त्यांचे बोलणे ऐकून एकदम गारच झालो. कारण ते ज्या गावाविषयी बोलत होते, ते गाव आम्हांला अगदी नवीन होते. त्या गावा-विषयी आम्हांला काहीच माहिती नव्हती, व तेथे आमच्या ओळखीचें कोणी नव्हते. आमच्या मनातला गोंधळ पाहून ते आम्हांला म्हणाले की "महाराज सर्व काळजी सोडा." आम्ही तुम्हांला तळणी रेल्वे स्टेशनवर सोडतो. समोरच निंभोरा बोडखा हें गाव आहे. स्टेशनवरच तुम्हांला नेण्यासाठी व्यवस्था पण आहे. "श्याम बाबांच्या घरी तुम्ही जा. श्यामबाबा त्या गावातील एक साधू आहे व संत मेळा त्यांनीच भरविला आहे असे म्हणून त्या दोघांनी आमच्या उतराची वाटसुद्धा

न पहाता मांदुर ते तळणी रेल्वे स्टेशनचे तिकीटच आमच्या हातात दिले. आम्हांला ते नाकारता आले नाहीं. त्यांनी आमचे सामान उचलले व आमच्या बरोबर रेल्वेत बसून तळणी स्टेशनला उतरले, आणि तिथेच आम्हांला म्हणाले की आमचे काम झाले. आम्ही आता जातो, आणि तेथेच ते दिसनासे झाले. आम्ही बावचळल्यासारखे तिथेच उभे राहिलो तेव्हढ्यात आमच्या नावाचा पुकारा झाला. चारपाच माणसांनी आमच्या भोवती गराडा घातला, व आम्हांला त्यांनी श्यामबाबांकडे नेले. श्यामबाबा चंपाबाई नावाच्या एका विधवा बाईच्या घरात रहात होते. चंपाबाईने आम्हांला प्रथम चहा दिला. नंतर जेवण पण दिले. थोडा वेळ विश्रांति घेतल्यावर श्यामबाबाने आम्हांला स्टेजवर भजनासाठी नेले. लहान गाव. गावाच्या मानाने जनता पुष्कळ आली होती. प्रत्येक घरात पाहुणे मंडळी भरली होती. १४ जानेवारीला संक्रांतीच्या शुभ मुहूर्तावर संतमेळा सुरू झाला होता. २१ जानेवारीला दहीकाला होता. पांचलेगावकर (सापवाले) महाराज, गुलाबबाबा, नगाभूवनचे हरिहर महाराज, गोट्या महाराज, पुंडलिकबाबा वगैरे आणखी विदर्भातील नामवंत संत आले होते. आम्हा दोघांना पाहून त्यांना आनंद झाला. श्याम बाबांनी आमची ओळख करून दिली. नंतर आम्ही एक तास पर्यंत भजन केले. राम, कृष्ण व संत मेळ्यावर आधारित भजने म्हटली. गावातील सर्व लोकांनी आम्हांला प्रेम दिले. आम्ही "संत मेळ्याला" कसे आलो याचे वर्णन केले तर हरिहर महाराज म्हणाले, ते दोघेजण म्हणजे साईबाबांचे रूप घेऊन आले होते. तुम्ही भाग्यवान म्हणून तुम्हाला त्यांचे आमंत्रण मिळाले. त्याच गावातील हा एक चमत्कार मी लिहीत आहे. "निंभोरा गावाला " निंभोरा बोडखा " हे नाव होते संत मेळा भरल्या पासून त्या गावाला " संतनिंभोरा हे नाव पडले. भुसावळ, नागपूर रेल्वे मार्गावर तळणी हे रेल्वे स्टेशन आहे. व गाव मात्र निंभोरा बोडखा. निंभोरा गावात एक तुकाराम मास्तर म्हणून प्रायमरी शिक्षक तर्क वादात ते एकदम पटू होते. कुठल्याही विषयावर ते तर्क करण्यात पटाईत होते. तर्कवादात त्यांनी कुणालाही सोडले नव्हते, व ते कोणाला मानत पण नव्हते. निंभोरा गावात "विचित्र खोपडीचा माणूस" असा त्यांचा लौकिक होता. तो आमच्या संपर्कात आला. सुरवातीला आमच्या बरोबर त्याने बुवाबाजीपासून सर्व विषयावर तर्क केले. नंतर तो आमच्यावर विश्वास ठेवू लागला.

गावातील संत मेळा संपला सर्व. संत आपली दक्षिणा व शालजोडी घेवून गेले. परंतु श्याम बाबा. व गावातील प्रतिष्ठित मंडळीनी आम्हांला महिनाभर

थांबवून घेतले. रोज रात्री सतसंग व भजन, चर्चा होवू लागली. त्या दरम्यान तुकाराम मास्तरांचा आमच्यावर विश्वास दृढ बसला. गाव सोडते वेळी मी तुकाराम मास्तरांना साईबाबांची उदी दिली, व म्हणालो की कठीण प्रसंगी उदीचा उपयोग करा. ही सर्व संकटातून सोडविल साईबाबांचा अनुभव घ्या, व आम्ही तेथून कानपूरला आलो. त्यानंतर हा उदीचा चमत्कार आहे. हा तुकाराम मास्तर यांनी स्वत: सांगितलेला. गावातील लोकांनी सुद्धा पाहिलेला.

१९७५ साल. दिवाळीचे दिवस. त्यातून महाराष्ट्रातील दिवाळी, धूम धाम सगळीकडे असते. फटाक्यांची गडबड फराळ पाण्याची धांदल. असे ते दिवस होते. घराघरातुन दिवाळीचे काम सुरू झाले होते. तुकाराम मास्तरांच्या पत्नीने देखिल घरातील डबे, भांडी, सारवण वगैरे काम सुरू केले. तुकाराम मास्तरांची पत्नी पूर्ण दिवसाची गरोदर होती. ९ वा महिना संपत आला होता. घरात वडिल माणूस कोणी नव्हतं. तुकाराम मास्तरांची आई लहानपणीच वारली होती. त्यामुळे सर्व जबाबदारी मास्तरांच्या पत्नीवर होती. मुले लहान होती. काम करण्यासारखी मोठी नव्हती. त्यांच्या पत्नीने घरातील भिंती सारवण्याचे काम हाती घेतले. छताच्या वरच्या भागाला हात पुरत नसल्याने ती शिडी वर चढून वरचे छत सारवू लागली. पूर्ण दिवस भरलेली बाई ती सारवता सारवता तिचा पाय सरकला व ती खाली पडली, व बेशुद्ध झाली. तुकाराम मास्तरांना झटपट बोलवले गेले. त्यांनी तिला तशीच पॅसेंजर गाडीत चढवून वर्धाला नेले, व दवाखान्यात ॲडमीट केले. दुसरी लहान मुलं शेजाऱ्यांनी संभाळली.

इकडे दवाखान्यात डॉक्टरांनी पत्नीची तपासणी केली, असता त्यांना एक पाय फ्रॅक्चर आढळला. कमरेपासून पाय तुटला होता. त्याला प्लॅस्टर मध्ये ठेवावे लागले. असे डॉक्टरांनी सांगितले. दुसरी गोष्ट मोठी कठीण होती. वरून पडल्यामुळे बाळंतपणासाठी विघ्न आले होते. मुलाला ऑप्रेशन करून काढावे लागणार. मुलाला वाचवावे तर आई मरते. आई वाचवावी तर मुल मरते. असा पेच डॉक्टरांना पडला. इकडे तुकाराम मास्तरांची स्थिती अगदी केविलवाणी होती. त्यांच्या डोळ्याचे पाणी थांबत नव्हते. घरी लहान मुले एकटी होती. दवाखान्यात पत्नीची स्थिती गंभीर. घरची परिस्थिती साधारण. जवळ पैसा नाही. तुकाराम मास्तर विचारातच होते. पत्नी ऑप्रेशन रूममध्ये बेशुद्ध होती. एक नर्स तिच्याजवळ होती. डॉक्टर व नर्स आपसात विचार करीत होती. त्यांनी तुकाराम मास्तरांना सर्व परिस्थिती सांगितली, व म्हणाले पत्नी व मुल याच्या-

मध्ये एकच जणाचा जीव वाचविता येईल. तेव्हा तुम्ही बॉन्डवर सही करा. बाईला प्लॅस्टरमध्ये ठेवावे लागेल. तुकाराम मास्तरांचे धैर्य गळाले. ते म्हणाले डॉक्टर पत्नीला वाचवा, व डॉक्टरांनी दिलेल्या बॉन्डवर त्यांनी सही केली. एवढे होईपर्यंत त्यांना मी दिलेल्या उदीची आठवण नव्हती. त्यांनी एका नर्सला 'वार' विचारला. ती म्हणाली, आज गुरुवार आहे. तशी त्यांना आमची आठवण झाली. ते मनात म्हणाले की आपल्याकडे आलेल्या " संजय " महाराजांनी साईबाबांची उदी कठीण प्रसंगी उपयोग करावयास दिली आहे. ती तर खिशात आहे. तिचा आज मी अनुभव घेतो व ते लगेच ऑप्रेशन रुम मध्ये पळाले, व नर्सला म्हणाले की मला दोन मिनिटे पत्नीजवळ जाऊ द्या. नर्सने त्यांना तशी परवानगी दिली. त्यांनी खिशातून उदी काढली. प्रथम साईबाबांचे स्मरण केले. नंतर ती उदी त्यांनी पत्नीच्या तोंडात टाकली, व थोडी उदी तिच्या कपाळावर, पोटावर लावली. त्यांचे हे कृत्य नर्स पहात होती. परत एकदा बाबांचे स्मरण करून, बाबांच्या वर सर्व जबाबदारी सोपवून ते बाहेर आले व आपल्या जागेवर बसले. १५–२० मिनिटाचा काळ लोटला असेल. तेवढ्यात ऑप्रेशन रुममधील नर्स, डॉक्टर, डॉक्टर म्हणत पळतच डॉक्टरांच्या खोलीत गेली. तिच्या पळण्याचा तुकाराम मास्तरांना काहीच बोध झाला नाही. नर्स डॉक्टरांना म्हणाली की, डॉक्टर बाई बाळंतीण झाल्या, व मुल जीवंत आहे, व बाई शुद्धीत आल्या आहेत. डॉक्टरांचा आपल्या कानावर विश्वास बसला नाही. त्यांना वाटले की ही नर्स काहीतरीच सांगत आहे. परंतु तेवढ्यात ऑपरेशन रुममधून मुलाचा रडण्याचा आवाज आला. तसे डॉक्टर व नर्स रुमकडे पळाले. रुम मध्ये बाळ, बाळंतीण सुखरूप होते. बाहेर येऊन डॉक्टरांनी तुकाराम मास्तरांना सांगितले. तुकाराम मास्तरांनी साईबाबांचे शतशः आभार मानले. त्यांनी सर्व हकिकत डॉक्टरांना सांगितली, व त्याच दिवशी संध्याकाळी डॉक्टरांनी पत्नीची पूर्ण तपासणी करून पाय फ्रॅक्चर नसल्याचे सांगितले व पत्नीला घरी नेण्यास परवानगी दिली. तो दिवस गुरुवार होता. उदी मी दिलेली होती म्हणून तुकाराम मास्तरांनी त्याचे नाव 'संजय' असे ठेवले. आज तो मुलगा गावातील एक हुशार, चतुर म्हणून ओळखला जातो. अशा ह्या प्राणदाता साईच्या उदीचा चमत्कार.

# बाबांनी बद्रीनाथ-केदारनाथजीची यात्रा घडविली

—ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
१।१४ फाइव्ह स्टार अपार्टमेंटस,
बंड गार्डन रोड, पुणे ४११ ००१.

भक्तकाजकल्पद्रुम। कैसे साई दयाळू परम।।
कैसे सप्रेम भक्तांचे काम। पुरवित अविश्रम सर्वदा।। अ. २९ ओ. ९५।।
भक्त जेथें जेथें जाई। तेथें तेथें कवण्याही ठायीं:
आधींच आऊन उभा राही। दर्शन देई अकल्पित।। अ. ४६. ओ. २१ ::

माझे थोरले चिरंजीव सैन्यात लेफ्टनंट कर्नल असून सध्या मेरठ (उत्तर प्रदेश) येथे मुख्यालयात काम करीत असतात. १९८२ मे-जून मध्ये ते पुण्यास सुट्टीवर आले तेव्हा म्हणाले होते की बद्रीनाथ केदारनाथ त्यांचे हद्दीतच पडतात व आम्ही त्यांचेकडे जाऊ तेव्हा ते आम्हाला तिकडे न्यायची सोय करू शकतील. अर्थात्‌च अशी यात्रा बाबांच्या कृपेने होत असल्याची शक्यता पाहून मनाला फार हर्ष झाला व उत्कंठाही वाटली.

नंतर ऑक्टोबर १४ तारखेला आम्ही दोघेही त्यांचेकडे गेलो तेव्हा त्यांनी लगेच बद्रीनाथ-केदारनाथला आम्हाला न्यायचा बेत केला व स्वत: रजा देखील घेतली. थंडीचा मोसम सुरू झाला होता त्यामुळे त्यांना आमची काळजी वाटत होती. तरी आम्ही २ तारखेस (दसऱ्याचे दुसरे दिवशी) निघण्याचा बेत केला. परंतु २६–२७ तारखेला मेरठची हवा अचानक बिघडली, पाऊस पडला व थंडी वाढली. वर पहाडात बराच बर्फ पडल्याच्याही बातम्या आल्या. तेव्हा काय करावे समजेना. माझी इच्छा तर खूप होती. परंतु बर्फ पडल्यामुळे दर्शनाच्या शक्यतेची शंका होती व थंडी आम्हा दोघांना कशी सहन होईल याची भीति पण वाटत होती. बद्रीनाथ समुद्रसपाटीपासून १०२०० फूटावर आहे तर केदारनाथची उंची ११७५२ फूट आहे. शिवाय केदारनाथला जायला शेवटी १५ किलोमीटर पायी किंवा घोड्यावरून जावे लागते. शेवटी ता. २७ बुधवारी मी बाबांच्या पुढे चिठ्ठ्या टाकून त्यांना विचारण्याचे ठरविले आणि आश्चर्य म्हणजे त्यांनी निघण्याची परवानगी दिली. मग अर्थात् दुसरे दिवशी ठरल्याप्रमाणे निघण्याचा बेत पक्का केला.

त्या दिवशी व त्याचे अगोदर २–३ दिवसांपासून यात्रेला निघण्याचे ठरल्यापासून मला श्रीसाईसच्चरित्रातील ४६ व्या अध्यायाची आठवण आलीहोती, ज्यांत कै. माधवराव देशपांडे (शामा) यांनी बाबांकडे काशी-गयेला यात्रेला जायची परवानगी मागितली होती. मला आपले उगाचच वाटले होते की, तोच अध्याय नेमका आम्ही निघायचे दिवशी रोजच्या वाचण्यात येईल कां? आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे आम्ही निघायचे दिवशी सकाळी नियमाप्रमाणे पोथी वाचावयास घेतली आणि तोच अध्याय आला. अर्थात् आदल्या दिवशीची चिठ्ठीतून आज्ञा व आता हा अध्याय आला. तेव्हा जणू काय माझ्या प्रवासाला बाबांनी आशीर्वादच दिल्यासारखे वाटले. परंतु त्याबरोबरच मोह झाला की शामाला गया येथे छबीरुपे दर्शन देऊन " मी तुझ्या अगोदर येथे येऊन पोहोचलो " असे जणू काय म्हणाले तसा अनुभव मला पण बाबा देतील का? आपली शामाइतकी योग्यता नाही तरीपण आपल्यावर असला अनुग्रह करतील का? असो.

ता. २८ ला गुरुवार होता. सकाळी ६ वाजताच आम्ही बाबांचे स्मरण करून बसने निघालो व संध्याकाळी ७ वाजता रुद्रप्रयाग येथे (मंदाकिनी व अलकनंदा या नद्यांच्या संगमावर) मुक्कामास पोहोचलो. तिथे आम्हाला १०–१५ मुंबई-नागपूरकडचे यात्रेकरू भेटले. ते त्याच दिवशी केदारनाथहून परत आले होते. शेवटल्या ७ किलोमीटर अंतरावर ३ फूट बर्फ असल्याने त्यांना दर्शनाला न पोहोचताच परत यावे लागले होते. परंतु बाबांनी आम्हाला कमी उंचीवर असलेल्या बद्रीनाथलाच आधी जायचीबुद्धी दिली होती. त्याप्रमाणे दुसरे दिवशी (२९ ऑक्टो.) सकाळी आम्ही बद्रीनाथकडे जाण्यास निघालो, व दुपारी ४ वाजता जोशीमठला मुक्कामास पोहोचलो. येथे जगद्गुरू शंकराचार्यांचा मठ आहे व सैन्याचा तळ असल्याने आमची राहण्याची व जेवणाची उत्तम सोय झाली. तिथेही आम्हास कळले की बद्रीनाथचा रस्ता दोन दिवसापूर्वी बर्फामुळे बंद होता परंतु आता मोकळा झालाय. दुसरे दिवशी सकाळी आम्ही गाडीने ४८ किलोमीटर दूर असलेल्या बद्रीनाथला जाण्यास निघालो. जसजसे बद्रीनाथ जवळ येऊ लागले तसतसा रस्त्यावर बर्फ दिसू लागला. परंतु वाहने जाऊ शकत होती. आम्ही थेट मंदीराजवळ गाडीने जाऊ शकलो. अर्थात् मंदीरावर व सभोवती असलेल्या टेकड्यांवर बर्फ होताच. परंतु दृश्य सुंदर दिसत होते. पुलाखालून धावत जाणारी अलकनंदा मनोहर दिसत होती. बद्रीनाथजीचे शांतिपूर्वक व व्यवस्थित रीतीने दर्शन झाले. नंतर तेथील तप्तकुंडात (गरम पाण्याच्या झऱ्यात) मी स्नान करून पितरांना तर्पणही दिले.

थोडासा बाजार करून आम्ही पूलाच्या अलिकडे गाडीजवळ परतलो व चिरंजीव सहज म्हणाले चहा घेणार का? थंडी होतीच, कोण नाही म्हणणार? समोरच्याच हॉटेलमध्ये गेलो व चहाची ऑर्डर दिली. सहज मी मागे वळून पाहिले आणि आश्चर्याचा धक्काच बसला. मालकाच्या काऊंटरच्या मागे माझी साई माऊली आशीर्वादात्मक हात उंचावून माझ्याकडे पहात असलेली मला दिसली. डोळ्यांवर विश्वासच बसेना. तसाच उठून तिथे गेलो व बाबांच्या हार घातलेल्या मोठ्या तसबिरीजवळ जाऊन अश्रुपूर्ण नयनांनी त्यांना नमस्कार केला. जवळ सतत नंदादीपही पेटत होता. या पामरावर बाबांनी केवढा अनुग्रह केला होता? कुठे शामा आणि कुठे मी! नंतर मी मालकाजवळ जो जातीने शिख होता त्याचेजवळ चौकशी केली तेव्हा त्याने सांगितले की तो मनमाडहून शिरडीला नेहमी जात असतो.

या आनंदातच आम्ही जोशीमठला (६५०० फूट) परत आलो व रात्री मुक्काम करून दुसरे दिवशी केदारनाथला जाण्यासाठी म्हणून परत रुद्रप्रयागकडे अगदी पहाटे निघालो आणि यापुढे आमच्यावर अडचणींचा व संकटांचा मारा सुरू झाला. आदल्या रात्रीपासून सौभाग्यवतीला जोराची थंडी व खोकला सुरू होऊन तापही चढला होता. त्यांतून पहाटे ५॥ वाजता बसस्टँडवर पोहोचूनही ६ वाजताची बस अगदी गच्च भरलेली होती व एकही सीट रिकामी नव्हती. दुसरी बस ९ वाजता होती व आम्ही थंडीत तसेच स्टँडवर कुडकुडत बसलो होतो. आम्हाला ६ वाजता निघून रुद्रप्रयागला १२ चे अगोदर पोहोचून केदारनाथकडे १२॥ वाजता जाणारी बस गाठायची होती. ती चुकल्याने निराशही झालो होतो, व एक रात्र फुकट रुद्रप्रयागला घालवावी लागणार याची चिंता वाटत होती.

परंतु अचानक ७॥ वाजता एक खाजगी बस आली व त्याने आम्ही १॥ वाजता रुद्रप्रयागला पोहोचलो. तेथे आम्हाला सुदैवाने डेहराडूनकडून येणारी बस ३ वाजता मिळाली. मात्र ती गौरीकुंडला (जेथून केदारनाथला जाण्यास पायी रस्ता सुरू होतो) न जाता सोनप्रयागला (म्हणजे ५ कि. मी. अलिकडे) जाणार होती व तेथून गौरीकुंडला जाण्यास टॅक्सी सहज मिळतील असे सर्वजण म्हणाले. तेव्हा आम्ही त्या बसने निघालो व संध्याकाळी ७॥ वाजता सोनप्रयागला पोहोचलो. परंतु तेथे पाहतो तो सर्व शुकशुकाट. एकही टॅक्सी किंवा इतर साधन नाही. दुसरे दिवशी सकाळी १० वाजताच फक्त बस मिळणार हे कळले. रात्र काढावयास एक लहानसे गावठी हॉटेल व त्याची मुक्कामासाठी एकच खोली होती. पलंग वगैरे काही नाही. शौचघर, न्हाणीघर वगैरेही नाही. सौभाग्यवती तर तापाने फणफणलेली. नाइलाजाने तिथे मुक्काम केला.

दुसऱ्या दिवशी १ नोव्हेंबर (सोमवार) रोजी पहाटे ६ वाजता मी व चिरंजीव सोनप्रयागहूनच घोड्यावर निघालो. सौभाग्यवतीला प्रकृतीमुळे वर चढणे शक्य नसल्याने तिला बरोबर आणलेल्या गढवाली शिपायाबरोबर मागे ठेवले व नंतर बसने गौरीकुंडला येण्यास सांगितले. केदारनाथचे मंदीर दुपारी १२ वाजता बंद होते व त्यात सोनप्रयाग ते गौरीकुंड ५ किलोमीटरचा प्रवास वाढला होता. शेवटी १ किलोमीटर बर्फात चालावेही लागणार होते. त्यामुळे दर्शन घडेल की नाही याची शंकाही वाटत होती. शिवाय सौभाग्यवतीला बरोबर नेता आले नव्हते याचेही दुःख वाटत होते. मनात बाबांना म्हटले, "बद्रीनाथ दर्शन किती सहज घडविले आणि आता या सर्व अडचणी का? निघण्याची आज्ञा तुम्हीच दिली होती ना? मग काय आता माझी निराशा करणार? " असो.

एका तासाने गौरीकुंडला पोहोचलो. येथे पार्वतीदेवीचे तप्तकुंड आहे. ते ओलांडून शंकराच्या दर्शनाला जाववेना. खूप थंडी होती व दर्शनाला उशीर होत होता. तरी आम्ही घाईघाईने त्या गरम गरम पाण्यात स्नान उरकले व पुढे निघालो दगडी रस्ता व अत्यंत उभी चढण (केवळ १५ किलोमीटरमध्ये ५००० फूट उंची गाठायची) त्यामुळे घोड्यावर देखील आराम नव्हता. अंग घुसळून निघत होते. परंतु सभोवारचे दृश्य मात्र सुंदर होते. वर उंच बर्फाच्छादीत पर्वताच्या रांगा व खाली खोल दरीत खळवळत वाहणारी मंदाकिनी. त्यामुळे उत्साह वाढला होता.

इतक्यात ११। वाजता केदारनाथच्या ३ किलोमीटर अलिकडे आम्ही पोहोचलो तो तेथे खालून आलेले सर्व घोडे उभे राहिलेले दिसले. पुढे बर्फ असल्याने घोडेवाल्यांनी यात्रेकरूंना घोड्यांवरून उतरवून दिले होते व पुढे पायी जाण्यास सांगितले होते. हे पाहून आम्हाला आश्चर्याचा धक्काच बसला. आमच्या सोनप्रयागच्या घोडेवाल्याने १ च किलोमीटर बर्फात चालावे लागेल असे सांगितले होते. परंतु तोही आता या गौरीकुंडाहून आलेल्या घोडेवाल्यांच्या सांगण्यावरून पुढे येईना. शेवटी त्याचेशी कबुलीप्रमाणे न वागल्यास पैसे न देण्याची धमकी देऊन थोडी हुज्जत घातल्यावर तो पुढे यावयास तयार झाला. परंतु १ किलोमीटर पुढे गेल्यावर बर्फ खूपच होता हे पाहून आम्हीच घोड्यांवरून उतरलो व पायी पुढे जायचे ठरविले.

येथे आपणास सांगायला पाहिजे की मला गेल्या १५ वर्षापासून हृदयविकार आहे. ३–४ वेळा हॉस्पिटलमध्ये दाखल होऊन आलेलो आहे. पुण्यासही अर्धा किलो-

मीटर चालले तरी छातीत कळ येते. ही परिस्थिती माहीत असल्याने जेव्हा वर्फात २ किलोमीटर पायी चालण्याची वेळ आली तेव्हा चिरंजीवानी मला विनंती केली की आपण परत जाऊ या. तुम्हाला त्रास होईल. १२ वाजण्याचे आत पोहोचण्याची शक्यता कमीच असल्याने पुन्ह, दर्शनासाठी २ वाजेपर्यंत तिथे थांबावे लागणार होते आणि इकडे तर ढग जमू लागले होते. पुन्हा बर्फ पडला तर तिथेच अडकून राहण्याची शक्यता होती. परंतु माझे मन परत फिरण्याचे होत नव्हते. इतके जवळ येऊन दर्शनाशिवाय परतायचे? चिरंजीवानी खूप आग्रह केला व शेवटी रागावलेही परंतु माझा बाबांच्या शब्दावर विश्वास होता. दर्शन घडणार हे निश्चित वाटत होते. मनात विचारही आला की यदाकदाचित् हृदयविकाराने रस्त्यात उसळी खाल्ली तर काय होईल? फार तर प्राण जाईल व देह पडेल एवढेच ना? अशा पवित्र ठिकाणी आणि महादेवाचे दर्शनाचे मार्गावर मृत्यु आला तर केवढे भाग्य? पांडवांचे देह असेच नाही का हिमालयाच्या वाटेवर पडले होते?

असो. मी पुढे चालू लागलो आणि इतक्यात समोरून परत येत असलेला एक यात्रेकरू भेटला. त्याने मला " जय केदार " असे म्हणून अभिवादन केले आणि मला एकदम स्फूर्ति आली. तेथून मी सारखा 'जय केदार' " जय साई " असा जप सुरू केला आणि आश्चर्य की फारसा त्रास न होता मी मंदीराजवळ जाऊन पोहोचलो. चिरंजीवानी मला हळूहळू येण्यास सांगितले मंदीर बंद होईल म्हणून ते घाई-घाईने पुढे प्रसादाचे ताट वगैरे घेण्यास गेले. थोड्याच वेळात त्यांनीच पाठविलेला प्यारेलाल नावाचा एक वृद्ध पंड्या माझेकडे आला व माझा हात धरून मंदीराच्या शेवटच्या चढाईवर घेऊन गेला. तो कोणीही असो परंतु त्यावेळी मात्र मला वाटले की जणू काय श्रीसाईबाबाच मला आधार द्यावयास आले होते.

आम्ही पोहोचलो आणि मंदीराचा दरवाजा बंद झाला. परंतु बाबा काय मला तसेच परत पाठविणार होते? चिरंजीवांना योगायोगाने प्रसादाच्या दुकानात मंदीराचा चौकीदार भेटला व चिरंजीव सैन्यातले अधिकारी आहेत हे ऐकून स्वतः होवून आम्हाला दुसऱ्या दरवाजाने आत घेऊन गेला. आम्ही अगदी शांतपणे केदारेश्वराचे दर्शन घेतले, यथाविधी पूजा केली आणि पांडवांनी बांधलेले हे प्राचीन मंदीर सर्व बाजूंनी नीट पाहिले. इतक्या कष्टानंतर व अडचणीनंतरही श्री केदार-नाथांचे दर्शन घडले यामुळे माझ्या मनाला अत्यंत आनंद झाला व श्री साईबाबांनी आपला शब्द खरा केला याचे प्रत्यंतर मनातल्या मनात घेऊन मी त्यांना शेकडो नमस्कार केले.

लगेच आम्ही परत यावयास निघालो. मंदाकिनीच्या पूलावर आल्यावर तिला भक्तीने नमस्कार केला व परत ३ किलोमीटर बर्फात चालत निघालो. वाटेत मला अजिबात त्रास झाला नाही. एवढेच काय पुढे घोड्यावरून १३ किलोमीटर खाली उतरतानाही थकवा वाटला नाही. सारखा दर्शन सफळ झाल्याच्या आनंदात होतो. आता माझ्या लक्षात आले की बाबांनी सौभाग्यवतीला आजारी पाडले व सोनप्रयागच्या पुढे आमचेबरोबर येण्यास अशक्य करून सोडले. सौभाग्यवती आजारी नसती तर तिला घोड्यावर २७—२८ किलोमीटर येऊन जाऊन प्रवास करता आला नसता व बर्फात एकंदर ५ किलोमीटर त्या उंचीवर व भयंकर थंडीत पायी चालणेही शक्य झाले नसते. आणखी म्हणजे माझ्या हृदयविकाराच्या आजारामुळे शेवटले २ किलोमीटर बर्फात पायी मला तिने जाऊच दिले नसते. एक वेळ चिरंजीवाला मी नाही म्हणू शकलो परंतु सौभाग्यवतीला मी कसे नाही म्हणून शकलो असतो? आपल्या सौभाग्याच्या काळजीमुळे तिने मला शपथच घातली असती तर?

दुसरे म्हणजे रुद्रप्रयागला आमची गौरीकुंडाची बस चुकली व सोनप्रयागला आम्हाला अत्यंत हलाखीत रात्र काढावी लागली, त्यावेळी ते मोठे संकट वाटले. परंतु बाबांनी हे मुद्दामच तर घडवून नसेल ना आणले? सोनप्रयागचा घोडेवाला होता म्हणूनच तो आणखी १ किलोमीटर बर्फात पुढे आला. गौरीकुंडचे घोडे तर एकजुटीने ३ किलोमीटर आधीच थांबले होते आणि तितके चालायची कदाचित माझी हिम्मतही झाली नसती. असो. असा सर्व विचार आल्यावर आदल्या दिवशी व त्या दिवशी सकाळी आलेल्या सर्व संकटांबद्दल व अडचणींबद्दल बाबांवर रागावल्याबद्दल फार पश्चाताप झाला. केदारेश्वरांची पूजा करताना सौभाग्यवतीचे पण मी नाव घेतले होते त्याची आठवण होऊन व सौभाग्यवती म्हणजे आपली अर्धांगी म्हणजे आपण एकट्याने जरी दर्शन घेतले तरी तिला अर्धे पुण्य मिळणारच हा विचार येऊन मनातील सकाळी आलेली निराशा दूर पळाली.

एकूण ११ तासांच्या कठीण प्रवासानंतर संध्याकाळी ५ वाजता आम्ही गौरीकुंड येथे पोहोचलो. तेथे सौभाग्यवती व गढवाली शिपाई आमची वाट पहातच होते. राहण्यासाठी त्यांनी बद्रीनाथ-केदारनाथ ट्रस्ट कडील सुंदर व आरामशीर खोली राखून ठेवली होती. सौभाग्यवतीला यात्रा सफल झाल्याची बातमी दिल्याबरोबर तिला अत्यंत आनंद झाला व लगेच तिने खोलीतल्या एका भिंतीकडे

बोट दाखविले आणि म्हणाली "पहा! तिकडे कोण आहे ते?' पाहतो तो माझी साई माऊली आशीर्वादाने हात उंचावून पुन्हा हजर! भिंतीवर बद्रीनाथला पाहिला तसलाच बाबांचा हार घातलेला फोटो होता. माझे हृदय आनंदाने उचंबळून आले आणि डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. बाबांना वारंवार नमस्कार केला आणि स्वतःला त्या दिवशी धन्य मानले. खरे म्हणजे बद्रीनाथाला छबीरूपाने एकदा दर्शन झाल्यावर आणि केदारनाथकडे दर्शनासाठी आलेल्या अडचणींच्या व संकटांच्या गडबडीत येथेही पुन्हा दर्शन व्हावे या इच्छेची मला आठवणच राहिली नव्हती आणि तसली शक्यता तर फारच कमी होती. परंतु बाबांनी मजवर कृपेचा कहर केला आणि येथेही पुन्हा दर्शन दिले. जणू काय मला त्यांना सांगावयाचे होते की, "पहा: तुझ्या वंदोबस्तासाठी तुझ्या आधीच मी येथे येऊन पोहोचलो नां?" आश्चर्याची गोष्ट म्हणजे हा फोटो दिसल्यावर सौभाग्यवती शेजारच्या सर्व खोल्या पाहून आली होती परंतु तिथे कोणत्याही खोलीत बाबांचा फोटो नव्हता. नंतर आनंदाने गरम गरम जेवण केले आणि जवळच वाहणाऱ्या मंदाकिनीचे गोड संगीत ऐकत गाढ झोपी गेलो.

दुसरे दिवशी पहाटेस आम्ही बसने सरळ ऋषीकेशला परत यावयास निघालो. सौभाग्यवतीची प्रकृतीही आता साफ बरी झाली होती. वाटेत देवप्रयाग लागले जेथे भागिरथी व अलकनंदाचा संगम होतो व तेथूनच पुढे खाली भागिरथीला "गंगा" हे नांव प्राप्त होते. बसमधून दोन्ही नद्यांचा संगम अगदी स्पष्ट दिसत होता. आम्ही दुपारी ४ वाजता ऋषीकेशला पोहोचलो व मुनीकी रेती येथे नावेत बसून गंगेच्या पलिकडे गेलो आणि तिथे गीता भवन मध्ये मुक्कामास गेलो. ऑफिसमधून लगेच एक खोली मिळाली. खोलीवर पोहोचतो एक गृहस्थ माझ्याकडे आले आणि म्हणाले, "आमच्या संस्थेचे मुख्य विश्वस्त आजारी आहेत व ओसरीवर बाहेर बसलेले आहेत. त्यांनी आपणाला येतांना पाहिले व त्यांनी आपल्याला भेटावयाची इच्छा दर्शविली आहे. आपण कृपा करून दोन मिनिटे तिकडे आलांत तर त्यांना बरे वाटेल." हे ऐकून मी लगेच त्यांचेकडे गेलो. एका पलंगावर ते गृहस्थ पडलेले होते. वय ७० च्या पलिकडे असावे. बरेच शिष्यगण त्यांचे हातपाय दाबून सेवा करीत होते. मी आपोआपच त्यांना पायावर डोके ठेवून नमस्कार केला तेव्हा त्यांनी आम्ही कोठून आलो वगैरे तपास केला आणि नंतर मला हात जोडून म्हणाले की, राहण्याची काही गैरसोय असल्यास माफ करा व आमची सेवा गोड मानून घ्या. चौकशी करता कळले की त्यांचे नाव घनश्यामदास जालान होते. ते या संस्थेचे मुख्य विश्वस्त

तर होतेच परंतु गोरखपूरच्या कल्याण मासिकाचे संपादकही होते. त्यांचे नांव मला ऐकून माहित होते. इतक्या मोठ्या माणसाने आजारात फारशी शुद्ध नसताना मला पाहताक्षणीच भेटण्याची इच्छा दर्शवावी याचे मला आश्चर्य वाटले. तसे पाहता त्यांच्या ऑफिसमध्ये मी माझा हुद्दाही सांगितला नव्हता. याचा अर्थ मला हा जो अकस्मात मान मिळाला तो बाबांचा भक्त म्हणून असे मी मानतो. उलट फुकट राहण्यास खोली दिल्याने त्या संस्थेचे आमच्यावर उपकारच होते. असो.

त्या रात्री दुसरा एक चमत्कार म्हणजे आम्ही जेव्हां तेथील "चोटीवाला" या प्रसिद्ध रेस्टॉरंटमध्ये जेवण्यास गेलो तेव्हा तेथेही साई माऊलीने दर्शन दिले. मालकाच्या काऊंटरच्या जवळच बाबांचा बद्रीनाथ व गौरीकुंड येथे पाहिलेला तसलाच मोठा फोटो होता. लगेच उठून जवळ जाऊन मी नमस्कार केला आणि "जेथे जातो तेथे तू माझा सांगाती" या प्रसिद्ध उक्तीची आठवण होऊन हृदय आनंदाने भरून आले. येथे एक गोष्ट सांगावीशी वाटते की, तिन्हीवेळा बाबांचे जे फोटो दिसले ते सर्व अगदी सारखे होते (एकाच साइजचे, रंगीत व आशिर्वादात्मक पोझचे) आणि बाजारात विकण्यासाठी किंवा इतर ठिकाणीही बाबांच्या कुठलाही फोटो आमच्या पाहण्यात आला नाही.

दुसरे दिवशी आम्ही सकाळी गंगेत स्नान केले. ऋषीकेशपर्यंत गंगेचे पाणी अगदी स्वच्छ व निर्मळ असते. स्नान करतांना खूपच आनंद वाटला, व सर्व यात्रा सफळ झाल्यामुळे तर तो द्विगुणीत झाला. त्यानंतर लगेच १२॥ वाजता आम्ही बसने मेरठला परत यायला निघालो. वाटेत हरिद्वारला पुन्हः गंगेचे रमणीय दर्शन घेतले आणि ४ वाजता घरी येऊन पोहोचलो.

अशा प्रकारे श्रीसाईबाबांनी आमची आयुष्यातील अत्यंत अवघड परंतु तितकीच महत्वाची यात्रा अकल्पितपणे व अनायासे घडवून दिली. केदारनाथ हे पांडवानी बांधलेले अतिप्राचीन मंदीर असून श्री शंकराच्या १२ ज्योतिर्लिंगापैकी एक आहे. बद्रीनाथ तर भारतातील चार धामापैकी एक आहे. आपल्या शास्त्रात म्हटले आहे की, जोपर्यंत कोणी यात्रेकरू श्री बद्रीनाथधामची यात्रा करीत नाही तोपर्यंत त्याची तीर्थयात्रा अपूर्णच राहते.

वरील प्रसंगावरून आणि माझ्या गेल्या १५ वर्षांच्या अनेक अनुभवांवरून मी खालील निष्कर्ष काढला आहे :

(१) एखादी गोष्ट करावी की न करावी याची शंका उद्‌भवल्यास बाबांपुढे चिठ्ठया टाकून त्यांचे मत विचारले व त्याप्रमाणे वागलो तर त्या गोष्टींत आपले कधीही नुकसान होत नाही व अंती कल्याणच होते. मात्र एकदा बाबांचे मत विचारल्यावर नंतर कधीही झाले व कोणी कितीही सांगितले तरी बाबांच्या आज्ञेविरुद्ध वागले न पाहिजे. बाबांच्या शद्बांवर पूर्ण निष्ठा आणि आपल्या मनात पूर्ण सबूरी ठेवली पाहिजे.

(२) श्रीसाईसच्चरित हा महान् प्रासादिक ग्रंथ आहे. त्याचे नियमित वाचन, पठन व मनन आणि मधून मधून सप्ताह करीत गेल्यास आपली दिवसें-दिवस अध्यात्मिक उन्नति तर होतेच, परंतु वर्णन केलेल्या चमत्कारांचे तंतोतंत स्वत:ला अनुभव येतात.

(३) बाबांच्या वारी म्हणजे गुरुवारी शुभाशुभ मुहूर्ताचा विचार न करता कोणत्याही कार्याला सुरवात केली तर ती शुभदायकच ठरते.

★

# पोपटाने माद घातली – सा–ई–बा–बा !

लावणीसम्राज्ञी सौ. आसावरी वायकूळ
संगीत विशारद., इ-९-८, बर्वेनगर,
घाटकोपर (पश्चिम) मुंबई ४०००८४.

० श्रीसाईबाबांनी घोड्याच्या तपासासाठी रानातून भटकणाऱ्या चांदभाईला आपली आठवण–यादगार–म्हणून पोपट दिला होता. बाबांचा आवडता पक्षी पोपट आपल्याही घरी असावा अशी माझ्या मुलाची तीव्र इच्छा असल्याने आम्ही क्रॉफर्ड मार्केटमधून चांगला ऐटबाज नेपाळी पोपट खरेदी केला. पोपटाबरोबर एक सुंदर पिंजराही घेतला. जवळ जवळ तीन आठवडे गेले असतील आमच्या घरातील हा पोपट जराही बोलत नव्हता, की त्याच्या तोंडून साधा आवाजही येत नव्हता. पोपट पूर्णत: मुका तर नसेल ना असाही विचार मनात डोकावून गेला. विक्रेत्याने आपणास चांगलेच फसवलेले दिसते तेव्हा हा पोपट त्याला परत करावा असे वाटू लागले.

पण एकदा आमच्या घरी रात्री एक मोठा चमत्कारिक अनुभव आम्हाला आला. त्या दिवशी आम्ही दमून भागून घरी आलो होतो. अल्पसा आहार करून आम्ही झोपी गेलो. झोपही गाढ लागली. रात्रीची निरव शांतता होती. अचानक घरातील पोपटाने मोठ्याने पण मंजुळ आवाजात साद घातली—'सा–ई–बा–बाऽऽ! ' ती साद ऐकून आम्ही दोघे पती-पत्नी एकाच वेळी खाडकन् जागे होवून उठून बसलो. आम्ही एकमेकाकडे पहातच राहिलो कारण दोघांनीही पोपटाच्या तोंडून एकच हाक ऐकली होती—'सा–ई–बा–बा'. त्यावेळी रात्रीचे अडीच वाजले होते. समोर टांगलेल्या पिंजऱ्याकडे आमचे लक्ष गेले. पिंजऱ्यातील पोपट तिरपी मान करून आमच्याकडे टक लावून एकसारखा पहात होता.

पोपटाच्या तोंडून 'साईबाबा' शब्द वदवून बाबांनी आपले अस्तित्व दाखवून दिले. 'सर्वत्र मी आहे, निराश होऊ नका. मी तुमच्यातच आहे, पोपटाचा आत्मा नि माझा आत्मा एकच आहे', असं बाबांना सांगायचं होतं का? बाबांची ही अनाकलनीय लीला पाहून आमच्या आनंदाला पूर आला. घरातील बाबांच्या मोठ्या तसबिरीसमोर आम्ही दोघे नतमस्तक झालो. आज बाबा देहस्थितीत वावरत नसले तरी त्यांचे अस्तित्व सिद्ध होण्याजोगे अनेक चमत्कार अजूनही घडतात व पुढेही घडत राहणार हे अजिबात नाकारता येणार नाही. कारण बाबा सांगूनच गेले आहेत—

'नित्य मी जिवंत, जाणा हेचि सत्य। नित्य घ्या प्रचीत अनुभवे.'

★

## चार बाजून दहा मिनिटे

—प्रा. र. श्री. पुजारी
१९२, सदाशिव पेठ, पुणे-३०.

० बहुधा २ ऑगस्ट १९८३ ही तारीख असेल. 'स्वामीमहाराज' या पुण्याहून निघणाऱ्या दिवाळी अंकासाठी श्रीबाबांवर एक मी दीर्घ लेख लिहित होतो. नाही होय करता लेखाची बैठक जमली होती. श्रीबाबांची ही कृपा होती. त्यामुळे दिलेले अभिवचन पुरे होणार होते. संपादकांच्या संपादकीय योजनांनुसार त्यांच्या कार्यातही त्यांना या गोष्टीमुळे सुलभता येणार होती.

त्या दिवशी दुपारी भोजन झाल्यानंतर मी लगेच लिहावयास बसलो. पृष्ठांची संख्या चाळीसकडे वेगाने झुकत होती. तरीही एक विचार माझ्या मनात होता. ठीक चार वाजून दहा मिनिटांनी आपणास उठावयाचे आहे. त्यानंतर कपडे करून लगेच डॉक्टरांकडे जायचे आहे.

मोठे घड्याळ माझ्यासमोर नव्हते. मनगटी घड्याळही लगेच बंद पडणारे होते. म्हणून त्याची जागा खिळ्यास होती. त्यास चावीही नियमितपणे दिली जात नव्हती. याचे कारण घड्याळाचे वय सत्तावीस वर्षांहून अधिक होते. त्याहूनही ते घालवण्याची माझी हौस मागेच फिटली होती. त्या दिवशी सकाळी मी घड्याळास किल्ली दिली होती. पण ते आता थकले होते. जेमतेम पाच सेकंद चालले की ते तेथेच थांबत होते. म्हणून त्याचा भरवसा मी धरला नव्हता. त्याला त्याच्या स्थानी ठेवून देऊन मी वेळेकडे लक्ष न देता लिहित होतो.

एवढ्यात मानेपासून माझी पाठ खाजण्यास सुरवात झाली. कितीही प्रयत्न करून ती थांबेना. म्हणून अखेर मी उठलो. हातातील भरास आलेले लेखन बाजूस ठेवले. खुर्चीतून उठून माझ्या मागेच असलेल्या छोट्या घड्याळाकडे पहातो, तर चालू! त्यात ४ वाजून बरोबर १० मिनिटे झालेली! एकही सेकंद मागे नाही की पुढे नाही !!!

# मन मनाला मिळाले काय?

—डॉ. सौ. सुमती खानविलकर.
सीताकुंज, लोनावळा.

• खूप दिवस माझ्या मागे गुरु उपदेश घ्या, गुरु करायलाच पाहिजे. त्याशिव सद्गती नाही. असे मित्रमंडळी सांगत व त्यांच्या त्यांच्या परिने महाराजां नावे सांगत.

मी सर्वांना माझे गुरु नव्हे. सारे काही साई आहेत. साईमाता, साईपि साईगुरु, साईच माझे जन्मजन्मांतरीचे तारु असे सांगत असे. पण कोणाल पटेना सारे उपदेश करत होते.

शेवटी एक दिवस बाबानांच विचारले अर्थात् आज नित्याच्या पोथीवाचन जो सल्ला द्याल ते मी करावे असा तुमचा मानस मी समजेन.

पोथी वाचायच्या अगोदर विनंती केली मला तुझ्यापासून कोणत्याच कारणाने दूर न करता जे सुख मिळायचे असेल ते दे.

पोथीतला चालू अध्याय काढला परत धडधडत्या अंतःकरणाने मी वाचावयास सुरवात केली तो काय बाबांच्याच तोंडचे शब्द अध्याय एकोणीस :

आई या मशिदीत बैसून : सांगतों ते तूं मानी प्रमाण। गुरुने न फुंकले माझेच कान । तुझमी कैसे न फुंकरूं । कासवीची प्रेमदृष्टी । तेणेंच पोरांसी सुखसंतुष्टी कासवी नदीचें एकतटीं। पोरें पैल वाळवंटी। पालन पोषण दृष्टादृष्टी। व्यर्थ खटपटी मंत्राच्या। एक मजकडे लक्ष देई : परमार्थ येईल हातास।
तूं मजकडे अनन्य पाहीं। पाहीन तुजकडे तैसाच मीही।

मी बाबांची पूजा करत असताना आमच्या ओळखीचे एक ज्ञानी गृहस्थ आले. परत तोच विषय. अहो तुमच्या पत्रिकेवरून तुमचे हेच महाराज गुरु करणे योग्य. तुमचे सारे प्रश्न सुटतील. शिवाजी महाराज, रामदास, व तुकाराम यांची उदाहरणे दिली. प्रत्येकाचा गुरु ठरलेला असतो. निदान दर्शन तरी करून या.

शेवटी त्यांच्या समाधानासाठी त्या महाराजांच्या दर्शनाला जायचे ठरले. त्यांच्याकडे उत्सव होता, तो दिवस साधून गेलो. आम्ही सात आठजण होतो.

संपूर्ण प्रवासात मन बेचैन होते. आक्रंदून बाबांना हाक मारत होते. विनवत होते तुम्ही मला दूर कां करता तुमच्यात मी सारे काही पहाते. मी सुखी आहे.

अशा मनस्थितीत आम्ही त्यांच्या दारी पोचलो. जीव बाबरा धुबरा झाला. जर आताच गुरुपदेश घ्या म्हणाले तर मी कसं नाही म्हणू. इतक्यात त्यांचे भाऊ बाहेर आले व आम्हाला म्हणाले, महाराज आले नाहीत. उत्सवाच्याच दिवशी येणार पत्र आले आहे. हे ऐकून माझा जीव भांड्यात पडला. आजचे मरण परवावर गेले तिथे पाणीसुद्धा पिण्यास न थांबता लगेच आपण शिर्डीला जाऊ या.

असे म्हटले. त्यांनी खूप आग्रह केला तेव्हा बाकीच्या मंडळींनी चहा घेतला नि आम्ही एस.टी. स्टँडवर आलो. अर्ध्या तासानी शिर्डी बस मिळाली या प्रवासात आनंदाच्या उकळ्या येत होत्या. मन सांगत होते जरा धीररे जीवा बाबा सारे चांगले करतील.

शिर्डीत उतरलो प्रथम मंदिरात गेले बाबांचे दर्शन घेतले. गर्दी नव्हती त्यामुळे खूप वेळ बसता आले. बाबांशी बोलता आले. खूप खूप बोलले बाबा मी नको का हो. तुम्ही मला दूर का करता. मी वाईट वागले का तुमच्या भक्तीत काही चुकले का देवा माझे. मी सर्वस्वी तुझीच आहे.

दुसऱ्या दिवशी काकड आरती, स्नान, अभिषेक चरणस्पर्श सारे मनसोक्त झाले. अतिशय समाधान झाले. मग मात्र मनोमन पटले की बाबा मला दूर करणार नाहीत आणि बाबांना म्हटले यापुढे काय करायाचे ते तू कर. मी मनाने तनाने, धनाने तुझीच आहे.

त्या दिवशी रात्री आम्ही त्या महाराजांकडे पोचलो. महाराजांच्या दर्शनाला हात पाय धुवून गेलो. तो तेथे खूप लोक बसले होते. गुरुपदेशासाठी आले होते. गुरुपदेशाबद्दल विचारले त्यांनी तेव्हा ते म्हणाले, आज आमावास्या आहे उद्या येऊ. पण एक लक्षात ठेवा उद्या गुरुवार आहे माझ्याकडून जाता येणार नाही प्रथा आहे. तुम्ही शुक्रवारी जाऊ शकाल हे ऐकल्यावर बरेच लोक नमस्कार करून जाण्यास निघाले. इतक्यात माझी ओळक करुन दिली गुरुपदेश घेण्यास आल्या अहेत असे त्यांना सांगितले तेव्हा त्यांनी माझ्याकडे पाहिले व म्हणाले तुम्हाला तशी काही जरूर नाही. पुढे पाहू. तुमची चालू असलेलीच उपासना तुम्ही करत राहा. मला मनातून खूपच आनंद झाला. मी त्यांच्याकडे वेड्या सारखी पहात राहिले. मनात बाबांचे गुणगान करत होते. क्षमा मागत होते. इतक्यात माझ्याकडे पाहून म्हणाले :

"मन मनाला मिळाले ना काय? मन मनाला मिळाले ना काय" असे तिनदा म्हणाले. म्हणताना इतके छान हसले. माझ्या मनातले किल्मीष गेले. मी अगदी प्रेमपूर्वक नमस्कार केला. त्यांच्या तोंडावर डोळ्यात मिस्कील पणाची झाक होती. मन आनंदाने डोलू लागले, डोळे भरून आले, साई कृपेचे महत्त्व कळून आले. जे साईजवळ बोलले तेच शद्ब मला या महाराजांच्या मुखाने ऐकविले. बाबा माझे मन मी तुम्हाला अर्पण केले. ते तुमचे. मग तुम्हीपण माझे. मग आता दुसऱ्याला कसे देऊ शकणार? पण बाबांनी माझ्या गडबडलेल्या भांबावलेल्या मनाला तेच शद्ब ऐकवून अगदी शांत केलं. विश्वास पटला. तुम्ही तुमचे सर्वस्व मला अर्पण करा. मी तुमचाच आहे. श्रद्धा नी सबूरी दोन्हीची साथ धरा. तू मजकडे अनन्य पाही। पाहीन तुजकडे तैसाच मीही। ।मिसाई.

# नवसास माझी पावेल समाधी

प्रो. एच. बी. महाले, एम. एस.सी.
अध्यक्ष गणित विभाग,
ज. ह. शासकीय महाविद्यालय, बैतूल.
मध्य प्रदेश.

० श्री साई बाबांनी इ. स. १९१८ मध्ये विजयादशमीच्या दिवशी समाधी घेतली. समाधी घेण्याच्या पूर्वी बाबांनी अकरा वचने दिली त्यांचे पालन बाबा अजूनही कसे करीत आहेत, हे खालील गोष्टीवरून लक्षात येईल :

बाबा जीवंत असताना एकदा नांदेड, (महाराष्ट्र) येथील रतनजी वाडिया शेटजीने शिरडीला बाबांच्या दर्शनाला जावून पुत्र-प्राप्तीची इच्छा केली. बाबांनी आशीर्वाद देवून त्या यथायोग्य समय जाताच शेटजीला पुत्र देवून त्यांची इच्छा पूर्ण केली. हा प्रसंग हेमाडपंतांनी श्री साई सच्चरित्रामध्ये चौदाव्या अध्यायात वर्णन केला आहे.

दिनांक ३१ जानेवारी १९८२ व १ फेब्रुवारी १९८२ ला शिरडी येथे आठव्या लेखक-कवी यांचा वार्षिक मेळावा भरणार म्हणून मला डिसेंबर, १९८१ मध्ये समजले. पण ह्या सम्मेलनात भाग घेण्यासाठी त्याच लेखक कवींना आमंत्रण देण्यात येणार होते की ज्यांच्या चार किंवा अधिक रचना मागील सात वर्षांत, निर्धारित नियमानुसार श्री साई लीला मासिकांस प्रकाशित झाल्या आहेत. माझे मित्र साई भक्त प्राध्यापक ए. पी. त्रिपाठी ह्यांच्या प्रोत्साहनामुळे मी साई लीला मासिकात लिहिण्यास नुकतीच सुरूवात केली होती, कारण त्रिपाठी म्हणत की बाबा विषयी लेख-कविता लिहिणे म्हणजे बाबांची एक प्रकारची सेवाच आहे. हे मला पटले व जानेवारी १९८२ पर्यंत माझ्या तीन रचना प्रकाशित होऊ शकल्या. आठव्या मेळाव्यात भाग घ्यावा ही माझी मनापासूनची इच्छा होती. म्हणून मी व माझे मित्र त्रिपाठीजी यांनी श्री काकरे कोर्ट रिसीव्हर साहेब, शिरडी यांना विशेष विनंती केली की तीन रचनेवरच मला मेळाव्यात भाग घेण्यास मिळावे. पण त्यात यश आले नाही. उलट मला कोर्ट रिसीव्हर साहेबांकडून पत्राद्वारे कळले की मला परवानगी मिळू शकत नाही, कारण माझ्या तिनच रचना प्रकाशित झाल्या आहेत. असे पत्र आल्यावर मला फार वाईट वाटले. तरीपण मी पूर्ण पणे निराश झालो नाही. मला वाटले बाबांची इच्छा असल्यास माझी चौथी रचना

फेब्रुवारी १९८३ च्या अंकात प्रकाशित होईल मी भाग घेण्यासाठी पात्र होईन प्राध्यापक त्रिपाठी सुद्धा श्रद्धा युक्त म्हणाले की, तुमची एक रचना फेब्रुवारी १९८३ च्या अंकात नक्की प्रकाशित होणार आहे. त्यांच्या चारपेक्षा जास्त रचना प्रकाशित झाल्या होत्या. त्यांना मेळाव्याचे आमंत्रण आले होते म्हणून ते, प्राध्यापक आर. आर. वर्मा व मी असे तिघेही मेळाव्यात भाग घेण्यासाठी शिरडीला दि. ३० जानेवारी १९८२ पोहोचलो.

दिनांक ३१ जानेवारी १९८२ ला मला शिरडीला त्रिपाठीजींनी साईलीलेचा अंक दाखवून हे सांगितले की माझी चौथी रचना काव्यबहार विशेषांकात प्रकाशीत झाली आहे. हे ऐकताच माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही. मी लेखक-कवी सम्मेलनामध्ये भाग घेण्यासाठी साईरायांच्या कृपेने पात्र ठरलो. बाबांनी माझी इच्छा पूर्ण केली

लेखक-कवि संमेलनात माझा सत्कार करण्यात आला. मला श्रीफळ, धार्मिक साहित्य, परमहंस पुंडलिक महाराज यांचा फोटो, कॅलेंडर, प्रसाद व पाच रुपये देण्यात आले. दिनांक १ फेब्रुवारी १९८२ ला सुद्धा मी स्वताच रचलेली कविता समाधी मंदिरात गावून साईबाबांकडे हजेरी लावली. पुन्हा मला एक श्रीफळ आणि एक रुपया सत्काररूपाने देण्यात आला. श्री. सदानंद चेंदवणकर ह्यांनी दोन दिवस मेळाव्याचे कुशल संचालन केले. सर्व कार्यक्रम उत्तम झाले. मेळाव्यात संत भक्त-मंडळी जमली होती. तेथे परमेश्वरच वास करीत आहे असे मला वाटले. तसेच साईबाबांनी व त्यांचेच अवतार श्री. सत्यसाई बाबांचे म्हणणे आहे की जेथे भजन-कीर्तन चालते, तेथे मी नेहमी उपस्थित असतो.

वरील कार्यक्रमामध्ये मी सच्चिदानंद साईबाबांच्या समाधीचे श्रद्धेने दर्शन घेतले व त्यांना नवस केला की देवा माझ्या येथे माझी मुलगी सौ. सुमनबाई ही आली आहे. तिचे बाळंतपण एक-दीड महिन्यात अपेक्षित आहे. तिला तिसरी मुलगी आहे. अशा स्थितीत आपण ह्या बाळंतपणात तिला मुलगाच द्यावा. जर मुलगा झाला तर मी आपणास एक शाल पांघरीन.

काय आश्चर्य. दिनांक ९ मार्च १९८२ ला सौ. सुमनला मुलगाच झाला. माझा नवस बाबांनी त्यांच्या वचनाप्रमाणे पूर्ण केला. बाबांनी आपले वचन पूर्णपणे पाळले.

" नवसास माझी पावेल समाधी।
धरा दृढ बुद्धी माझ्या ठायी। "

जय साई राम।

# तुमचा मी भार वाहीन सर्वथा

माझा दुसरा अनुभव असा

एका वेळी मी अंदाजे १९६६ मध्ये शिरडीला वर्तमान प्राचार्य श्री. आर. बी. अय्यर यांच्या परिवारा बरोबर गेलो. तेथे आम्ही साईबाबांच्या समाधीचे दर्शन घ्यावयास गेलो. तेव्हा चपला, जोडे मंदिराच्या बाहेर काढून ठेवावे. त्या वेळेस सध्या ज्याप्रमाणे जोडे चपला ठेवण्याची समुचित व्यवस्था आहे, तशी नव्हती. दर्शन करून परत आल्यावर आमचे सर्वांचे जोडे चपला मिळाल्या पण सौ. कांता अय्यर यांच्या चपला गायब झाल्या होत्या. आम्ही इकडे तिकडे पुष्कळ तपासणी केली, पण चपला मिळाल्या नाहीत सौ. अय्यर ह्या मुळे फार उदास दिसत होत्या. नंतर आम्ही आम्हाला साई संस्थानाची जी खोली मिळाली होती तेथे गेलो.

तेथे आल्यावर सौ. अय्यर ह्यांनी रडायला सुरवात केली. मी म्हटले– "बाई, काय रडता अहो चपला हरवल्या तर हरवू द्या, त्यांचे एवढे दुःख कशाला मानायचे." तरी त्यांनी रडायच थांबविल नाही. मग मी म्हणालो– "अहो, तुमच्या चपला बारा रुपयांच्या तर होत्या. बारा रुपये काही मोठी रक्कम नाही. श्री. अय्यरना हजार रुपये व तुम्हास पांचशे रुपये दरमहा पगार मिळतो. तुम्ही सहजच दुसऱ्या चपला घेवू शकता आणि जर तुम्ही घेत नसाल, तर मी घेवून देतो. पण कृपा करून रडू नका. त्या म्हणाल्या—"अहो, बारा रुपयांचा प्रश्न नाही. ह्यांच्या (श्री साईबाबांच्या) दरबारांत माझ्या चपला जायला नकोत." मी म्हटले—"श्री साईबाबा काय तुमच्या चपला राखतील." त्यावर त्या म्हणाल्या—"यांच्या दरबारात माझ्या चपला चोरी जाणे म्हणजे माझा अपमान आहे. त्यांनी माझ्या चपला धुंडून आणावयास पाहिजेत." मी म्हणालो—', साई बाबा काय तुमच्या चपला धुंडायचे काम करेल? त्यांना दुसरे काही काम नाही का?"

थोडा वेळ रडत राहिल्यावर सौ. अय्यर म्हणाल्या—"माझ्या चपला आता मंदिरात आल्या आहेत. जा आणि घेवून या." मी म्हटले—"बाईला भ्रम होत आहे. तरी बाईच्या म्हणण्याप्रमाणे मी व त्यांची मोठी मुलगी वर्तमान डॉ. सौ. प्रतिभा लोखंडे मंदिरात गेलो. हरवलेल्या चपला पुष्कळ पाहिल्या पण त्या काही दिसल्या नाहील. मग आम्ही निराश होऊन खोलीवर परतलो.

चपला मिळाल्या नाहीत. हे सौ. अय्यरांना समजताच त्या अधिक जोरान रडू लागल्या व पुढे पुढे तर त्या बाबास शिव्या सुद्धा देवू लागल्या. मी म्हटले– "बाई,तुम्ही काही मिराबाईची नक्कल करू नका. पण त्या कोठे गेल्या ऐकायला त्यांनी बाबास नावे ठेवणे चालूच ठेवले आणि मग मला म्हणाल्या––"आता माझ्या चपला मंदिरात आल्या आहेत. तुम्ही घेवून या." मी म्हटले––"मी काही एवढा रिकामा नाही. तुम्ही अय्यरांना किंवा प्रतिभाला पाठवा." मला पुन्हा जाणे मुर्खपणाचे वाटत होते. मग सौ. प्रतिभा मंदिरात गेली आणि परत आली. तर काय आश्चर्य? ती त्या हरवलेल्या चपला पायात घालून आली. मला आश्चर्याचा धक्काच बसला आणि माझ्या मनातील भ्रम एकदम नाहीसा झाला. सौ. अय्यर म्हणाल्या––', शेवटी आणून द्याव्या लागल्या ना त्याला माझ्या चपला." "जया मनी जैसा भाव तया तैसा मी पाव."

आता दुसरी गोष्ट १९७९ सालची. ह्या वेळेस मी भोपाळ मेडिकल कालेज मध्ये गंगरीनचा उपचार करीत होतो. माझ्या उजव्या हाताच्या बोटाकडून वरच्या दिशेकडे गंगरीन सरकत होती. मी शिरडी साईच्या दुसऱ्या अवताराची म्हणजे श्री सत्यसाईबाबाची प्रार्थना करायचा. एक दिवस बाबा माझ्या स्वप्नात आले आणि त्यांनी माझ्या उजव्या हातास मनगट आणि कोपर ह्यांच्या मध्ये त्यांच्या एका बोटानी स्पर्श केला ज्या ठिकाणी त्यांनी स्वप्नात स्पर्श केला तेथूनच माझा हात कापला गेला. गंगरीन वर सरकली नाही. ऑपरेशन सफल झाले. मी दिनांक १६ सप्टेंबर १९८१ ला दाभोलकर कृत श्रीसाई सच्चरित्र वाचत असताना माधवराव देशपांडे (शामा) यांना साप चावयाचा प्रसंग वाचावयास दिला ह्या संकटाच्या वेळी देशपांडेना वाटले की आता मला साई माऊलीशिवाय कोण वाचवणारा परंतु ते बाबाजवळ जाताच बाबांनी गर्जना केली––

"चढू नको भटुरड्या वर. चढशील तर खबरदार : चल नीट जा उतर खाली उतर।" अ. २३

श्री. माधवराव देशपांडे घाबरले पण थोड्या वेळानी बाबा शांत झाल्यावर ते त्यांच्या जवळ जावून बसले आणि बाबांनी त्यांना सांगितले की धीर सोडू नकोस. काळजी करू नको. दयाळू फकीर सांभाळून घेईल. मग देशपांडे बाबांच्या आज्ञेप्रमाणे घरी गेले व बाबांच्या सांगण्याप्रमाणे रात्री झोपले नाहीत. व अशा रीतीने देशपांडेंची वरील आलेली भयंकर वेळ टळली. वर जे बाबांनी भटुरड्या वर चढू नको. . . . म्हटले ते सापाच्या जहरास, शामाचे जीवन वाचवण्यासाठी

म्हटले आणि अशारितीने भक्ताचे संरक्षण केले. "तुमचा मी भार वाहीन सर्वथा. नव्हे हे अन्यथा वचन माझे."

वरील गोष्टीचा संबंध, श्री. सत्य साईबाबांनी स्वप्नात माझ्या हाताला स्पर्श करण्याच्या घटनेशी मला वाटतो. त्यांनी माझ्या हाताला स्पर्श करून ग्रॅंगरीनच्या जहराला मूक आज्ञा केली की "दुष्टा वर चढू नकोस. खाली उतर. चढलास तर खबरदार. चल नीघ जा खाली उतर. " अशा रीतीने त्यांनी माझे जीवन रक्षण केले. "शरण मज आला आणि वाया गेला, दाखवा दाखवा ऐसा कोणी."

द्वापारयुगात जेव्हा हेच श्री साईबाबा भगवान श्रीकृष्णाच्या रूपात अवतरले तेव्हा त्यांनी अर्जुनाला धर्मभूमि कुरुक्षेत्रात सांगितले की—

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योग क्षेमवहाम्यहम् ॥

आणि सध्या ह्या श्री अवतारात बाबा हेच वचन निरनिराळ्या भाषेत सांगतात—" तुम्ही, तुमच्या सर्व दुःखाचे ओझे मला द्या, ते मी माझ्या खांद्यावर वहन करीन." तुम्हास काही काळजी करावयाची नाही. जय साईराम.

★

# " श्रद्धा सबुरी आणि साई पादुका "

श्री. गजानन कृष्णराव निरखे
२० नंदलालपुरा, इंदूर ४.

० कोण आहे बापूसाहेब निरखे? ताबडतोब बाहेर या आल्या 'साईपादुका' मुंबईहून!

आमच्या साईमंदीरात मी चारपाच माणसांच्या घोळक्यात विमनस्क स्थितीत एक टक, साईमूर्तीकडे डोळे लावून ...काय बोलत होतो, काय बडबडत होतो, माझे मलाच कळत नव्हते. इतर कुणाला त्याचे काय? एकसारखे विचारण चालूच होत, खरच येणार का साईपादुका आज? जे पादुका देणार होते त्यांची आपली ओळख तरी होती का? ...का बरे अजून ते लोक आले नाहीत? शब्द पाळायला हवा होता त्यांनी, मग दुसरा बोलू लागला, अन् तिसरा पण लगेच. माझा राजन

(मुलगा) जवळच होता. एकदम ओरडला नका त्रास देऊ त्यांना. साई पादुका आज येणारच. प्लीज कृपा करा'!

अरे हो, पण थांबा, प्रस्तावना किंवा कोड्यात उतरापेक्षा खरा प्रकारच तुम्हांला विदित करतो! अगदी ताजा जिव्हाळ्याचा आस्थेचा स्वानुभव आहे हा माझा.

साईबाबा आपणा सर्व भाविकांचे आराध्य दैवत आहेत होयना? माझी तर पूर्ण श्रद्धा आहे. म्हणूनच सबूरीने घेतो. "तरी एक सांगतो शामा। प्रेमे घेईल जो मन्नामा। तयाच्या मी सकल कामा । पुरवी प्रेमा वाढवी । ३।१११

भक्तांच्या संकटसमयी त्यांचेसाठी साईबाबा धावून गेलेत ... मग तेच बाबा माझे आर्त हाकेला ...हं तर काय म्हणत होतो मी? हो बरोबर दिनांक १२ जून १९८३ आम्ही इंदूरस्थ छत्रीबाग, संस्थान, साईमंदिरासाठी, मुंबईचे, हल्ली वास्तव्य स्वित्झर्लंड येथील पंडीत आबाजी पणशीकर हे आपल्या संकल्पाप्रमाणे चांदीच्या साई पादुका, सुमारे तीन हजार रुपयेच्या समर्पण करण्यास आपले शिष्य शाहू शिंदे आदिसह सकाळी नऊ वाजता मुंबई पवन ट्रॅव्हल बसने इंदूरात येणार होते, आणि दुपारी १२॥ वाजता पूजन ठरले होते. सारी तयारी झाली होती. भाविक भक्त सकाळपासून मंदिराकडे येऊ लागली होती. आम्ही मंदीरकर ट्रस्टी काही सुवासिनीसह हार, फुल, निरांजन आदि घेऊन पादुकांचे स्वागत पूजनासाठी बस स्थानकावर हजर झालेलो होतो.

नऊ वाजले दहा आणि साडेदहा वाजले पवन ट्रॅव्हलबस आली नाही. त्यातील काही उतारू इतर दोन बसमधून उभे रहात इंदूरात आले. माहिती अंती कळले पवनचे बसला नाशीकजवळ अपघात झालाय पण उतारू बचावले. आलेल्या ह्या मंडळीत आबाजी पणशीकर नावाचे कुणी दिसले नाही. उतारूंची यादी ाली नव्हती. विचारणाऱ्यांनी विचारून घेतले. दिसतात का तुमचे आबाजी ह्या ातारूमध्ये? ट्रॅव्हल एजंट बोलण्याचे मनस्थितीत नव्हता, कारण त्याचे बसला पघात झाला होता. आणि माझीतर पाचावर धारण बसली होती. हार, फुल, निरांजन जागचे जागी राहिलेत. आमची काही मंडळी मंदीराकडे परतली. मी विचारात पडलो. पेपरात जाहिरात होती, प्रसिद्धि पत्रके वाटली गेलीत ... मग काय? मला शब्द दिला आहे त्यांनी. नव्हे मंदीर संस्थानला पत्र आलेय त्यांचे— आज साईपादुकासह येतो आहे म्हणून. मग शंका-का? आणि मी सुद्धा मंदिराकडे पाहुणे तिकडे तर आले नाहीत परभारे? म्हणून परतलो. अकरा वाजून गेले होते. ब्रम्हवृन्द एकत्र झाले होते. वेदघोष चालू होता. अभिषेकाची तयारी होत होती.

मी, बावळा, साईबाबांकडे व साईबाबा माझेकडे पहात होतो. जीव घाबरा झाला होता. ट्रस्टीगण म्हणाले घाबरू नका बापू! आपण दुसरा उपाय करू! ...

नाही! नाही!! तसं होणारच नाही! साईपादुका येतीलच. ते काही नाहीं ...राजन चल घरी. मुलाने मला घरी आणले स्कूटरवर! देव्हाऱ्यातील साईबाबांस हाती उदी घेऊन गळयातील तसबीरीवर हातठेवून आवाज दिला साई-घरात घंटी वाजू लागली टेलीफोन आहे वाटत मुंबईचा कॉल ...नाही — बापू रिंग बंद, ... रॉंग नंबर असेल ...नो! नो! लाव मुंबईला आबाजींचा नंबर? पुन्हां रिंग आली मुंबईहून कॉल होता. पणशीकर आले का इंदूरात काल इथून निघालेत ...म्हणजे साई- पादुका घेऊन येत आहेत ना? ...नक्कीच...पण कां आले नाहीत का इंदूरात काहीं विशेष ...टेलिफोन खाली ठेवला घरातील मंडळी एक नजर पहातच होते. राजनने पुन्हाः स्कूटरवरुन मला मंदीरात आणले. जवळ जवळ ओरडलोच मी

साई पादुका येत आहेत...पण केव्हां? मन चिंती...ते...पूजा सुरू झाली. मी दाराकडे आणि साईमूर्तीकडे टक लावून बसलो होतो. लोकांचा घोळका माझे अवतीभवती होता. जणू माझी परीक्षाच पहात होते. प्रश्न विचारीत होते ... साईपादुका ...आणि म्हणूनच माझा राजन वरीलप्रमाणे ओरडला होता. मला श्वास देऊ त्यांना साईपादुका आज येणारच, प्लीज कृपा करा!!

आणि वर लिहिलेले वाक्य आवाज कानी पडला ...कोण आहे बापूसो ... तावडतोब बाहेर या साईपादुका आल्या आबाजी पणशीकर तुम्हांला बोलावित आहेत.

मी वाऱ्यासारखा टॅक्सीकडे धावलो महाराष्ट्र टॅक्सी बाहेर उभी होती. पंडीत पणशीकरांच्या पायी पडलो. साईबाबा की जय म्हटले । हृदय डोळे भरून आले. पंडीत पणशीकरांनी साईपादुकेचा देव्हारा माझे हातात दिला आणि म्हणाले धन्य आहां तुम्ही इंदूरकर भक्त मंडळी उशीर झालाय नां? पण ऐका, साई-बाबांनी पादुका तुमचेसाठी कशा धाडल्या ऐका!! पवन मोटार बसला नाशीक जवळ अपघात झाला लोक मोटार बसचे बाहेर पडले अन आम्ही सुखरूप सडके-च्या कडेला कसेबसे उभे होतो. इतर उतारू मागाहून येणाऱ्या बसने इंदूरकडे रवाना झालेत. इतक्यात आमचे जवळ एक टॅक्सी येऊन उभी राहिली. काय साहेब काही मदत हवीय? मी म्हटले अहो इंदूरचे साईमंदीरासाठी हृया पादुका न्यायच्या होत्या, ही समोरची मोटार बस जाऊ शकत नाही? मग या साहेब

माझ्या टॅक्सीत मी पण मध्यप्रदेशात इंदूरात जात आहे. साईबाबांच्या पादुका आहेत माझी पण सेवा घ्या अन् अवघ्या काही तासांत ही टॅक्सी तुमचे मंदीरासमोर उभी केलीय! आम्ही तर नवखे! पण साईबाबांचे तुम्ही खास भक्त व इंदूरकर भाविक लोक आहात. अन मला आठवले काही वेळापूर्वीच मी घरी होतो; टेलीफोनची रिंग वाजली होती त्याच सुमारास साईबाबांच्या पादुकांची टॅक्सी इंदूरात शिरली होती. माझ्या साईमाऊलीने केवळ माझेसाठी, माझी हाक म्हणूनच टॅक्सीतून पादुका आणून मला माझ्या सबुरीने उपकृत केले होते. अशा प्रकारे साईपादुका माझे हातात होत्या मी साईमंदीराच्या पायऱ्या चढत होतो :– सुवासिनींनी आरती ओवाळली.लोकांचा साईनामे गजर चालू होता हिंदी लोकांचा आवाज. "साईबाबा की जय" हितचिंतक कानाशी पुटपुटले वा बापूसाब धन्य! मवाजींचे तोंड पाहण्यालायक होते असे राजन म्हणाला.

साईपादुका मंदीर ट्रस्टी अध्यक्षांना समर्पित केल्या गेल्या. तब्बल दोन तास अभिषेक पूजा चालू होती मंदीर असंख्य भक्तांनी भरलेले होते.

माझे भान हरपलेले होते. अभिषेकाची धार पादुकेवर पडत होती व अश्रूंची धार शरीरावर पडत होती.

---

श्रद्धा व सबूरीचे फळ श्रीसाईबाबांनी "साईपादुका" आणून मला दिल तसेच हे! बाबा श्रद्धावान भाविकांनाही दे!! असे म्हणत नतमस्तक झालो.

आणि पुढील उक्ती — वचने — आपोआप डोळ्यापुढे आल्या ...

जरी हे शरीर गेलो मी टाकून !
तरी मी धावेन भक्तांसाठी ॥
नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य ।
नित्य घ्या प्रचिती अनुभवे ॥
जो जो मज भजे जैसा जैसा भावे ।
तैसा तैसा पावे मीही त्यासी ॥

☆

# साईलीलेचा अनुभव

—सौ. मंगला सु. वैद्य
द्वारा श्री. सुभाष अ. वैद्य
स्टेट बँक ऑफ इंडिया
झाबुआ. (म. प्र.) पीनकोड ४५७६६१

० तेव्हां आम्ही उज्जैनच्या सिंधी कॉलनीत रहात असू. सिंधी कॉलनीच असल्यामुळे मागे–पुढे, वर–खाली व आजूबाजूला सिंधीच रहात असत, यामुळे सर्वांशी साधारण ओळख असली तरी जास्त संपर्क नव्हता, शिवाय जास्त करून सिंधी लोक 'राधास्वामी' पंथाचे असल्यामुळे मूर्तीपुजेस ते एका वेगळ्याच दृष्टी कोनातून बघत असत. म्हणून नित्यक्रमाच्या व्यतिरिक्त वेळ मी वाचन वगैरे मध्ये घालवत असे. व त्यांना ही माझी विशेष दखल नसे.

...आणि एक दिवस अचानक शेजारची बाई घाबरलेला चेहरा घेवून माझ्या घरी आली. ती इकडच्या तिकडच्या गप्पा करत असली तरी ती विशेष काही सांगण्यासाठी आली आहे हे तिच्या अविर्भावाने स्पष्ट दिसत होते. थोडीशि भूमिका बांधून शेवटी ती म्हणाली —"माझे यजमान मध्यंतरी भोपाळला गेले होते व त्यांनी अजाणताच 'काही' ओलांडले होते तेव्हां पासून त्यांच्या सारखे पोटात दुखत आहे, झोप येत नाही व आवडत्या वस्तु अचानक गायब होतात (हरवतात) तसेच पोटावर ओरखडे उठतात. सर्व प्रकारचे औषध–उपचार व डॉक्टर वैद्य झाले परंतु गुणच येत नाहीं. तुमच्या जवळ ह्यावर काही अध्यात्मिक उपाय आहे काय?" मला एकदम श्रीबाबांच्या उदीची आठवण झाली. मी तिला सांगितले की जर तुमची श्रद्धा असेल तर ही उदी सकाळ संध्याकाळ कपाळाला लावून पोटात ग्रहण करा व उशाशी पुडी ठेवा. तिने श्रद्धा ठेवली (कारण संकटात सापडलेला मनुष्य सर्वात जास्त श्रद्धाळू असतो) आणि ३–४ दिवसातच तिचे यजमान सर्व प्रकारे पूर्ण बरे झाले. तिने मला बोलावून आभार प्रदर्शन केले. वास्तविक ह्या सर्व प्रकारात माझे काहीच महत्त्व नव्हते श्री बाबांची कृपा व तिची श्रद्धा ह्यामुळेच हे सर्व घडून आले आणि हे मी तिला स्पष्ट बोलून दाखविले. अस्तु. सगळ्यात जास्त आश्चर्य व आनंद मला ह्या गोष्टीचा झाला कि त्यांच्या श्रद्धास्थानी असलेल्या 'गुरु महाराजां'च्या शेजारी श्री बाबांची सुंदर छबी मी बघितली. अर्थात बाबांच्यावर श्रद्धा ठेवल्यास ते कोणत्याही माणसावर कृपा करतात. माणसांची श्रद्धा व श्री बाबांची कृपा अशीच अबाधित असो हीच बाबांच्या चरणी प्रार्थना.

# आणि भौतिक वासने पासून परावृत्त केले

(श्री साईबाबांची किमया)

—श्री. के. पो. पहाडे
झेंडा चौक, धरमपेठ, नागपूर

० मनात विकल्प आल्यानंतर बाबा भक्तांना कसे परावृत्त करतात असा हा अनुभव!

एक वर्ष झाले त्या गोष्टीला! प्रतीवर्षी मी तीनदा श्री साईसच्चरित्राचे पारायण आपल्या सवडीच्या वेळात दहा दिवसांत करीत असतो. मागील वर्षी गुढीपाडव्याच्या दोन दिवस आधी पारायणाला सुरवात केली. सायंकाळची वेळ होती. पोथीचे अकरा, बारा अध्याय वाचून झाले होते. वाचन झाल्यानंतर श्री बाबांच्या फोटोला नमस्कार करून व उदी प्रसाद खाऊन नुकताच घराच्या गच्चीत उभा राहिलो.

रस्त्यावरून महाराष्ट्र राज्य लॉटरीचा एक तिकीट विक्रेता ओरडत चालला होता, त्याला थांबवून मी त्याचे जवळून तीन तिकीटे विकत घेतली आणि नंतर पुन्हा घरात येवून श्रीसाईबाबांच्या फोटोसमोर उभा राहून म्हटले "बाबा! पाच लाखाची लॉटरी पाडव्याला (म्हणजे उद्या दि. २५-३-८२) उघडणार आहे आपल्या आशिर्वादाने जर मला त्यातील कमीत कमी दुसरे किंवा तिसरे बक्षिस लागले तर माझी सारी कडकी दूर होऊ शकेल! देखो बाबा दया करना!'

ही गोष्ट तेवढ्यावरच राहिली. दुसरे दिवशी सकाळी वेळ होता म्हणून पुढील पारायणाला सुरवात केली. कर्मधर्म संयोगाने नेमका तेरावा अध्याय त्या दिवशी वाचण्यास आला. बाबा म्हणतात! "अरे जरी मी झालो फकीर। घर ना दार बेफिकीर। बैसलो एका ठायी स्थिर। सारी किर किर त्यागुणी ॥४॥ तरी ही माया अनिवार। मलाही गांजी वरचेवर। मी विसरे परी तिजला न विसर। मजसी निरंतर कवटाळी!"

बस्! आणि आदल्या दिवशी मनांत आलेली लॉटरीची कल्पना बाबांनी तेराव्या अध्यायातील या ४ थ्या व ५ व्या ओळीमुळे पार धुळीस मिळविली.

अहा! किती हा समयोचित इशारा! आपल्या प्रपंचातील नड बाबांनी दूर करावी या उद्देशाने मनात आलेला लॉटरीचा विचार, वरील ओव्यांनी नष्ट व्हावा, आणि सर्व भौतिक वासनेपासून अलिप्त रहा हा श्री साईबाबांनी दिलेला इशारा वाचून धन्यता वाटली. आणि तेव्हापासून कानाला खडा लावला की काहीतरी विषयाचा हेतू मनात धरून बाबांना साकडे घालू नये.

आपल्या भक्तांचा संदेह दूर करायला बाबा किती तत्पर असतात याचे हे ज्वलंत उदाहरण.

प्रत्येकाने परमेश्वराची निष्काम भक्ती किंवा उपासना करण्याचा प्रयत्न करावा. त्याने परमेश्वरी अंशाचाच लाभ हळू हळू होऊ लागतो व साऱ्या अडचणी, संकटे आपोआप दूर होत जातात. यापरते आणखी काय हवे? ही वेळीच मिळालेली शिकवण.

बाबांच्या किमयेचा एक अंश वाचकांना खचितच आनंददायी वाटेल.

श्री बाबांचे चरणी शतशः प्रणाम!

★

# साईबाबांची कृपा

सौ. पुष्पलता सूर्यवंशी
३५२, साकेत, इंदूर.

० जो जो मज भजे जैसा जैसा भावे, तैसा तैसा पावे मीही त्यासी या ओवीचा अर्थ किती चांगला आहे. आपण देवाला अंतःकरणाने स्मरतो त्याप्रमाणे देवमुद्धा भक्ताच्या हाकेला धावून येतो. श्रीसाईबाबांच्या या वचनाचा अनुभव आमच्या घरात खूपवेळा आला आहे.

नुकतीच घडलेली गोष्ट माझ्या घरी श्री सत्यनारायण देवाची पुजा व माझ्या सोमवार व्रताचे उद्यापन होते. कार्यक्रम श्री साईकृपेने व्यवस्थित रितीने पार

पडला. दुसऱ्या दिवशी बाहेरून आणलेले सामान पोहोचवण्याच्या गडबडीत व घरातले आवरण्यात सकाळचा वेळ निघून गेला, सुमारे १० वाजता माझ्या मिस्टरांच्या लक्षात आले की त्याच्या हातातली पुष्कराजचा खडा लावलेली अंगठी कोठे तरी पडली. घरात शोधाशोध सुरू झाली. एक एक ठिकाण पाहून झाले. घरात वरच्या मजल्यावर, तळमजल्यावर, बाहेर सर्व दूर शोधून झाले. पण अंगठी काही सापडली नाही. तीन दिवस शोधल्यानंतर शेवटी निराश होऊन मी माझ्या श्री साईबाबांना प्रार्थना केली कि बाबा अंगठी सापडू द्या. माझा हा अनुभव मी साई मासिकात देईन व आश्चर्य हे कि मी सकाळी १० वाजता पूजा करून, प्रार्थना करून सकाळचा चहा घेत बसले होते व माझे मिस्टर सकाळी मुखमार्जन करून चहा वगैरे निपटून स्नानाला जायच्या तयारीत होते. तेवढ्यात त्याना वाटले की मंजनाची जुनी बाटली रिकामी झाली आहे, तिला टाकून द्यावी म्हणून त्यानी ती बाटली हातात घेतली व त्यात मंजन काढण्यासाठी बोट घातले. तर त्यांच्या बोटाला अंगठी लागली. सकाळीसुद्धा त्यांनी त्या बाटलीतूनच मंजन काढून मुख-मार्जन केले. त्यावेळेस त्यांना अंगठी दिसली नाही व प्रार्थना केल्या-नंतर लगेच पंधरा मिनिटांत अंगठी सापडावी ही श्रीसाईबाबांची कृपाच नाहीं का आम्हांला असे बरेच वेळा अनुभव आलेले आहेत. श्री बाबांची सदैव कृपा दृष्टी सर्व प्राणीमात्रावर राहो हीच श्रीसाईचरणी प्रार्थना आहे.

# बाबांचा करिता धावा !
# दुःख न येई अपुल्या गावा !

–श्री. डी. बी. जगत्पुरिया
मु. पो. विंचूर, ता. जि. धुळे.

० परमपूज्य प्रातःस्मरणीय श्रीसाईबाबांवर त्यांच्या भक्तांनी निष्ठा ठेवावी, आणि आशीर्वादाचं अनुपम दान बाबांनी सहस्त्र हातांनी भक्तांना द्यावं. यासारखे अगणित अनुभव भक्तांना येतात.

मला गेल्याच वर्षी असाच एक चिर–स्मरणीय अनुभव आला. आमची बदली विंचूर येथील हायस्कूलमध्ये झाली. मिळालेल्या खोलीत कसंतरी सामान टाकून आम्ही त्या खोलीत वीज नसल्याने लगतच्या शेजारील घरातून लाईट घेण्याचे ठरवले. श्री. डी. आर. बोरसे, बी. के चौधरी, ही मित्र मंडळीही मदतीला होती. लांब वायरच्या सहाय्याने पलिकडच्या घरातून लाईट लागतो का म्हणून बघितले. लाईट लागला. बरे वाटले. वायर बरीच मोठी असल्याने मुलांना शॉक लागू नये किंवा पाय अडकून कुणी पडू नये म्हणून दक्षता घेतलेली बरी! असा विचार करून मी ती लांब वायर गुंडाळायला सुरवात केली.

वायर एके ठिकाणी कट असल्याने गुंडाळल्यामुळे ती उघडी पडली. पलिकडून बटन सुरू असल्याने वायरमधला वीज प्रवाह तसाच सुरू राहिला. माझ्या हाताला शॉक बसायला लागले. डाव्या हातातून वीजेचा प्रवाह सुरू झाला. गुंडाळलेली वायर हाताला घट्ट चिकटली ती प्रयत्न करूनही फेकता आली नाही. मी जवळपास काही लाकडी आधार सापडतो का म्हणून चाचपून पाहिलं. मी मेलोऽ मेलोऽऽ म्हणून ओरडायला सुरवात केली. फार प्रयासाने एक दोन बोल अस्पष्ट निघाले. खोलीत अस्ताव्यस्त पडलेल्या लोखंडी कॉटला माझा शरीरस्पर्श झाल्याने क्षणार्धात मी जमिनीवर कोसळलो! समोर मृत्यु साक्षात् उभा ठाकलेला दिसला. आता वीजेचे शॉक सबंध शरीरात बसू लागलेत. वेड्या मनात श्री बाबांचे स्मरण त्या वेळी संचारले. मनोमन बाबांची आशीर्वाद देणारी मूर्ती डोळ्यापुढे तरंगून गेली! बाबांनी माझा धावा ऐकला आणि साक्षात् मृत्युच्या दाढेतून मला ओढलं. माझा अस्पष्ट आवाज ऐकून शेजारील घरी बसलेले माझे बाहेर गावचे मित्र

श्री. आर. बी. खरोटे व सी. के. मिस्तरी हे धावून आले. त्याचवेळी पलिकडच्या मित्रानेही बटन बंद केलं. अजूनही तो प्रसंग आठवला की, भीती वाटायला लागते. त्यावेळी घरातले सर्वजण बाहेर होते म्हणून ठीक झालं. नाहीतर त्यांनाही अपाय झाला असता!

आणखी काही क्षण जर वीज प्रवाह सुरूच राहिला असता तर फारच आपत्ती कोसळली असती. ऐन निर्वाणीच्या क्षणी मित्र धावून आलेत. बाबांनी माझी हाक ऐकली आणि नवजीवनाचं दान दिलं. असे अनेक लहान मोठे अनुभव येतात. बाबांवर टाकलेली जबाबदारी ते हमखास पूर्णत्वास नेतात! निर्वाणीच्या क्षणी आपल्या सहस्त्र हातांनी अदृश्यपणे मदत करतात. मन समाधानाने भरून येतं. आणि मनामध्ये —

या आशयाचे भाव घुमू लागतात.

**श्रीबाबांचा करिता धावा ।**
**दुःख न येई आपुल्या गावा ।।**

❖ ❖ ❖

# जया मनी जैसा भाव । तया तैसा अनुभव ।।

**कु. सरल प. खारकर**
'साई निवास', ३६ ए पूर्व,
सा. हौ. सोसायटी, ब्लॉक नं. ४,
पहिला माळा, शीव, मुंबई २२.

० नोव्हेंबर ८२ च्या चक्री वादळाच्या दिवशी घडलेली ही घटना. माझा भाऊ रविंद्र नेहमी सारखा कामावर गेला. रेडिओवर वादळासंबंधी निवेदन करीत होते. सकाळी अकरा वाजता वाऱ्याचा वेग अतिशय वाढला. बंद केलेल्या खिडक्या उघडू लागल्या बहिणीला खूपच त्रास झाला. दुपारच्या बातमीत सांगितले गेले की वादळ गुजराथकडे वळले असून धोका जरी टळला असला तरी मुसळधार पाऊस व तुफान वेगाचे वारे वहातील. सर्व कार्यालये सोडून देण्यात आली आहेत.

माझ्या भावाची कंपनी म्हणजे दोन रेल्वे व पुन्हा बस अशा ठिकाणी आहे. वाऱ्याचा घूं घूं आवाज बंगल्यातील अंगणातील झाडांचा डोलंबा. काहीच सुचत नव्हते वेळ, जात नव्हता, भावाच्या येण्याच्या वाटेकडे डोळे लागलेले. संध्याकाळ झाली सात वाजून गेले. मी शरीराने अपंग. काय करणार? बहिणीकडून 'साईनाथ सगुणोपासना' मागून घेतले व श्री साईबाबांना नमस्कार करून त्यातील सर्व पदे, भजने म्हटली व शेवटी बाबांना सांगितले माझा भाऊ व दुसरी इतर मंडळी सुखरूपपणे घरी येऊ द्या. सर्वांना काळजी सारखी. नंतर पुन्हा हात जोडले. बहिण माझ्याशी बोलत होती. सायनच्या टेकडीवरुन पाणी खाली येते व साचते थारा कुठेच नाहीं. थोड्या वेळाने भावाने दाराची कडी वाजवली व मी आलोय म्हणून सांगितले. श्री साईबाबांना नमस्कार केला. भाऊ आत आला. ऑफिस बॅग कोपऱ्यात ठेवली. सर्व गप्प. बहीण चहा करण्यास आत गेली. भाऊ उभा होता. वरती श्री साईबाबांची अकरा वचने लिहिलेली तसबीर लावलेली आहे. तेव्हढ्यात एकदम जोरात वारा व मुसळधार पावसास सुरवात झाली. तसा भाऊ म्हणाला, 'अरे बापरे तुमच्याकडे आता सुरवात झाली. मी आलो तेव्हा ढकलून दिल्यासारखा वारा नव्हता. थोडा थोडा पाऊस पडत होता. थोडक्यात वाचलो.' मी म्हटले रविंद्र तू उभा कुठे आहेस? तो म्हणाला अगबाई मी श्री साईबाबांच्या फोटो खालीच उभा आहे. मी त्याला सर्व घडलेली घटना सांगितली भाऊ म्हणाला खरंच ग बाई मला बाबांनी घरात येऊ दिले व नंतरच वाऱ्याचा वेग व पाऊस सुरू झाला. मला बस मिळाली नाही, ओळखीचे गृहस्थ भेटले, यांच्याबरोबर स्टेशनापर्यंत रिक्शाने आलो व दादरला गाडीत गर्दीच नव्हती. तेव्हा त्याला दिवसभरात घडलेल्या गोष्टी सांगितल्या श्री साईबाबांनी आपल्या अगम्य सामर्थ्याने थोडावेळ पाऊस व वारा थांबवला. अकरावा अध्याय डोळ्या समोर उभा राहिला. भाऊ बससाठी उभा राहिला असता खूपच भिजला होता. असो. अशा या श्रीसाईबाबांना आम्हा भावंडांचे कोटी कोटी प्रणाम.

### "श्री साईबाबांनी उदी घरी पाठवली."

माझा दुसरा अनुभव असा – मे, ८० च्या महिन्यात घडलेली घटना. माझे आजोळ पनवेल. मे महिन्यात मामाकडून पोष्टाने पाकीट आले. त्यात छोटीशी चिठ्ठी लिहिलेली होती की तुझी सौ. मामी व सौ. शैला, मिलिंद व गिरीश शिर्डीला श्रीसाईबाबांच्या दर्शनाला जाऊन आले. चि. सरलसाठी गळ्यातील काळा गोफ व सर्वांसाठी प्रसाद सोबत पाठवित आहे. परंतु तुझ्या सौ. मामीला तेथील

उदी मिळाली नाहीं ही चिठ्ठी वाचल्याबरोबर माझी वडीलबहिण बायजी चटकन उद्गारली सौ. मामीना उदी मिळाली नाही. मी आपल्या घरची उदी त्यांना पाठविन. कडक उन्हाळा, माझे सर्व करायचे. कारण आजारामुळे माझे पराधीन जीणे. सहा महिने मोलकरीण नव्हती. बहिणीला रात्री झोपावयास बारा वाजायचे. मी मोठा दिवाही लावून द्यायची नाहीं. अशा गडबडीत उदी पाठवायची राहिली, आणि जून महिन्यात अचानक आमच्या घरी शिर्डीहून उदी व प्रसाद पोस्टाने आला. आम्ही दोघीही चकित झालो. कारण दरवर्षीप्रमाणे रामनवमीची उदी व प्रसाद येऊन झाला होता. मग आता ही उदी कशी आली? रात्री भाऊ कामावरून आला त्यालाही विचारले की तुझ्या कंपनीतील कोणी शिर्डीला गेले होते काय? तू कोणाबरोबर पैसे पाठविले होते काय? त्यांनी नाही म्हणून सांगितले व तोही आश्चर्यचकित झाला. मग आमची खात्रीच झाली श्री साईबाबांनी सौ. मामींच्यासाठी आमच्या पत्त्यावर उदी पाठवली. मी बहिणीकडून मामाला छोटीशी चिठ्ठी व सर्वांसाठी घरची उदी व नुकतीच आलेली शिर्डीची उदी व प्रसाद पाठवला. आश्चर्य म्हणजे उदी व प्रसाद मामाला गुरुपौर्णिमेच्या दिवशी मिळाला. त्याची पोच मामांनी पाठविली त्याला खूप आनंद झाला. नंतर त्याला सविस्तर पत्राने कळविले. असो. श्री साईबाबांची लीला अगाध आहे. त्यांना माझे अंतःकरणपूर्वक कोटी कोटी प्रणाम.

# छातीतील कळा आणि बाबांची विभूती

—श्री. ग. रा. पालकर
२२३।२, दारूवाला चाळ,
बझार वॉर्ड, कुर्ला,
मुंबई ४०० ०७०.

० श्री साईबाबांच्या विभूती प्रसादाचे अनेक चमत्कारिक अनुभव साईलीला मासिकातून आपण वाचत आलो आहोत. ज्यांची बाबांवर नितांत श्रद्धा आहे. अंतःकरणाच्या गाभाऱ्यात बाबांच्या नामाचे नित्य स्मरण चालत असते अशा श्रद्धावान भक्तांच्या हाकेला बाबा त्वरीत धावून येतात हा सर्व भक्तांचा नेहमीचा अनुभव आहे. आणि अशा भक्तांच्या अनेक प्रकारच्या रोगांवर दुखण्यांवर बाबांची विभूती संजीवनी ठरली आहे.

त्या दिवशी मी माझ्या मेव्हण्या बरोबर एका गृहस्थाला अगदी महत्त्वाच्या कामासाठी भेटण्यास करीरोडला जात होतो. घरून निघते वेळेस कोणतीही शारिरीक तक्रार नव्हती. शरीर आणि मन कसं अगदी उत्साहित होतं. वाटेत बऱ्याच इकडच्या तिकडच्या गप्पा चालल्या होत्या. कुर्ल्याला तिकीटे काढून आम्ही गाडीत बसलो आणि कधी नव्हे त्या अचानक माझ्या छातीतून कळा येऊ लागल्या. काही अघटित घडतय अस मनाला वाटल. क्षणभर जीव घाबरा–घुबरा झाला, आणि मी अबोल झालो. कारण बोलल्यामुळे जास्तच त्रास होऊ लागला. माझ्या सोबत असलेल्या मेहुण्याला माझ्या एकाएकी अबोलपणाचे कोडं पडलं. मी त्याला खुणेनेच छातीत दुखतय म्हणून सांगितलं. तोहि क्षणार्धात नर्व्हस होऊन परत मागे फिरण्याच्या बेतात होता. मी बाबांचा धावा सुरू केला माटुंग्याहून परत घरी जायचा विचार मनात आला होता पण ज्या गृहस्थाला भेटायच होतं ते कामहि अगदी महत्त्वाच होतं. त्या दिवसा नंतरच्या भेटीला काहीहि महत्त्व नव्हत. गाडी करीरोडला आली. माझ्या मनात चटकन् मोठ्या बहिणीकडे जावं अस वाटलं. मेहुण्याला मी म्हटलं प्रथम आपण माझ्या बहिणीकड जाऊ या. तेथून नंतर त्या गृहस्थाकडे जाऊ. बहिणीकडे गेलो. बहिणीने विचारपूस करण्यास सुरवात केली. मी काहीहि न सांगता फक्त तिला म्हणालो "बाबांची विभूती आणि ग्लासभर पाणी प्रथम दे नंतर बोल."

आंतरिक हाकेने बाबांची आळवणी केली. विभूती घेतली आणि पाणी प्यालो. काही वेळानंतर छातीतल्या वेदना कमी–कमी होऊ लागल्या. चहा झाल्यानंतर आम्ही तेथून निघालो त्या गृहस्थाला भेटलो, आणि करीरोडला स्टेशनवर आलो. एव्हाना अगदी पूर्वीसारख वाटायला लागल होतं. मेहुण्या बरोबर मी पूर्ववत बोलू लागलो. त्यालाहि बाबांच्या विभूती चमत्काराचे आश्चर्य वाटले. मनोमनी बाबांचे आभार मानले. अशी बाबांची विभूती भक्तांना संजीवनी ठरलेली.

त्या सहा महिन्यानंतर अद्याप तशा प्रकारचा त्रास झाला नाही. बाबांच्या विभूती प्रसादाचे केवढे मोठे हे सामर्थ्य?

★

# नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य
# नित्य घ्या प्रचीत अनुभवे

**सौ. उषा जयवंत रेगे**
विसावा, ब्लॉक नं. ५, सरस्वती बाग,
जोगेश्वरी, मुं. ६०

० माझी मुलगी बारावीच्या परीक्षेला बसली होती. त्यावेळी प्रोफेसरांचा संप जोरात सुरु होता. परीक्षा आता होते की पुढे ढकलली जाते हे कळत नव्हत. परीक्षा वेळेवर सुरु होईलच असं सांगता येत नव्हतं. परीक्षेची सूत्र सरकारने आपल्या हातात घेतली होती परीक्षेचे नंबर्ससुद्धा दूरदूरच्या शाळातून लागले होते.

पहिल्याच पेपरला गोंधळलेल्या मनःस्थितीत माझ्या मुलीने परीक्षेच्या हॉल-मध्ये प्रवेश केला. पहिलाच पेपर पुढ्यात आल्याबरोबर नेहमीचे वाचलेले प्रश्न तिला काही केल्या आठवेनात अजूनपर्यंत ती नेहमी पहिल्यावर्गात पास होत आली आहे. त्या दिवशीचा पेपर तिने कसा तरी सोडवला. घरी आली पहिला वर्ग मिळणार नाही या भितीने ती एवढी निराश झाली की ती पुढच्या पेपराचा अभ्यास करायलाच घेईना. मी किती समजावलं पण संध्याकाळपर्यंत ती तशीच पुस्तक न घेता बसून राहिली होती. हे वर्ष ती फुकट घालवणार असं वाटत होतं.

मी त्यावेळी रजेवर होते व श्री साईंच्या पोथीचा सप्ताह करीत होते. त्या-दिवशी पोथीचा ३३ वा अध्याय 'उदी महात्म्य' वाचीत होते. तिला बळेच माझ्या-शेजारी बसवली व पुढील परीक्षेचा अभ्यास करायला लावला. अध्याय वाचता वाचता मधूनच उदी लावीत राहिले. दुसऱ्या दिवशीपासून तिने सर्व पेपर्स चांगले लिहिले व ती बारावीला सेकंड क्लासमध्ये पास झाली.

त्याचवेळी नव्हे तर ज्या ज्यावेळी संकटसमयी मी त्यांना हाक मारली त्या त्यावेळी माझी संकटे दूर झालेली आहेत. अशा अनेक अनुभवामुळे "श्रद्धा व सबुरी" या वचनावर माझा विश्वास बसला आहे.

# भक्तांच्या संकटकाळी धावून येणारे बाबा

—श्री. विलास बि. गोडबोले
एच् ४६५ रिझर्व्ह बँक स्टाफ क्वार्टर्स,
मराठा मंदिर, भायखळा, मुंबई ८.

० मी बाबांचा एक भक्त आहे. आजपर्यंत बऱ्याचवेळा मला बाबांच्या कृपादृष्टीचा प्रत्यय आला आहे. परंतु अलीकडेच आम्हा कुटुंबियांस बाबांच्या अस्तित्वाचा आलेला अनुभव मी नमूद करीत आहे.

मी, माझी पत्नी व दोन मुलं केदार व कौशिक आम्ही नुकतेच कोल्हापूरला एका लग्नास गेलो होतो. लग्न गुरुवारी संपवून, शुक्रवारी देवीची पूजा केली व शनिवारी आम्ही माझा मित्र श्री. राजन कुमठेकर, त्याची बायको व दोन मुलं व त्याची आई पन्हाळयास निघालो होतो. गाडी राजन चालवत होता. पुढच्या सीटवर मी व माझी दोन मुले बसलो होतो. (दोघांची वय ११ व ६ वर्षे) पाठीमागे माझी पत्नी, मित्राची आई, पत्नी व दोन लहान मुलं असे बसले होते.

आम्ही पन्हाळयाच्यापासून दोन मैलावर असू इतक्यात घाटामध्ये एका वळणावर गाडी बंद पडली. राजनने मला गाडी मागे ढकलण्यास सांगितले. मी खाली उतरून गाडी मागे नेण्याचा प्रयत्न करू लागलो. परंतु गाडी जाईना. त्यामुळे गाडीतील सर्व मंडळीस उतरावयास सांगितले. परंतु राजनची पत्नी मुलगी मांडीवर झोपली असल्यामुळे गाडीतच बसून राहिल्या. पुढच्या सीटवर केदार बसला होता.

आम्ही गाडी ढकलू लागलो, पण गाडी मागे जाईना म्हणून राजनसुद्धा गाडीतून उतरला व गाडी ढकलू लागला. गाडी कड्याच्या बाजूला लावली. गाडी अशा तऱ्हेने लावली कि येणाऱ्या–जाणाऱ्या गाड्यांस सहज जाता येईल. गाडी लावून झाली आणि माझा मुलगा बाहेर आला आणि उतरणीवर अचानक गाडी खाली घसरू लागली. केदार दरवाज्यामध्ये व कड्यामध्ये अडकून चेंगरू लागला. एकच कल्लोळ उठला मी गाडीचा दरवाजा ताकद लावून जवळजवळ उखडून टाकला. तरी केदारची सुटका होईना, तेवढ्यात कड्यावर मी तो दरवाजा आपटला. गाडी खाली सरकतच होती. परंतु मी गाडीचा दरवाजा खडकावरून आपटल्यामुळे म्हणा किंवा काही म्हणा गाडीची दिशा बदलली. गाडी सरळ

त्याच्याशी जायच्या ऐवजी, गाडी एकदम आडव्या दिशेने दरीकडे जाऊ लागली. माझी पत्नी जोरात ओरडू लागली. मी पटकन गाडीच्या डाव्या बाजूने उजव्या बाजूस जाऊन गाडीची खिडकी धरली व गाडी अडवण्याचा प्रयत्न करू लागलो. राजनची पत्नी मागच्या सीटवर 'मला वाचवा वाचवा' असे ओरडत होती. राजनच्या आई गाडी पकडावयास गेल्या परंतु त्या गाडी पकडू शकल्या नाहीत. व रस्त्यावर आडव्या पडल्या. राजन कसाबसा माझ्या मदतीला आला. माझ्या डोळ्यासमोर तर काजवेच चमकू लागले. गाडी दरीपासून दोन फुटावर येऊन सर्जाच खाली सरकत होती. मी अंगातली सगळी शक्ती एकवटून गाडी थांबवण्याचा प्रयत्न करत होतो. पुढचा भयंकर प्रसंग डोळ्यासमोर आला आणि पुढील दोन वाक्ये मनात म्हणालो, "बाबा वहिनींचे प्राण वाचवा. सद्‌गुरु साईनाथ" आणि काय आश्चर्य गाडी अचानक ब्रेक लागावा आणि थांबवावी तशी थांबली. आम्ही लगेच गाडी पुढे खेचून दगड लावून वहिनींना व मुलीला बाहेर काढले. माझी पत्नी व मुले ह्यांना पाच मिनिटं बोलताच येत नव्हते. हा सगळा प्रकार काही क्षणातच झाला. माझ्या पत्नीने पहिला प्रश्न विचारला, "गाडी थांबली कशी?" तेव्हां मी माझ्या पाकिटातला बाबांचा फोटो काढून सांगितले की माझ्या बाबांचा धावा केल्यावर बाबांनी गाडी थांबवली. बाबा मला मूर्तीरूपी वहिनींच्या मागे दिसले. माझी पत्नी, राजनची पत्नी व आई ह्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले.

मी व राजन जिकडे गाडी थांबवली होती त्या ठिकाणी गेलो व चाकाच्या खुणा बघितल्या. तेव्हां लक्षात आले की गाडी आणखीन सहा इंच सरकली असती तर ...! पण असं कसं होईल? माझे बाबा माझ्या पाठीशी असताना, माझ्या-साठी धावून येणार याची पूर्ण खात्री आहे.

अशीच बाबांची कृपा आम्हां सर्व भक्तांवर राहो. आम्हांस बाबांचा कधीही विसर न पडो ही बाबांस प्रार्थना.

# मुलीला शास्त्र शाखेत प्रवेश मिळाला

—सौ. अरुणा विनय साळगांवकर.
बेस्ट नगर, ए—३—१२, गोरेगाव
(पश्चिम) मुंबई ४०० १०४.

० मी सर्व देवांना मानते. सर्व देवांवर माझी सारखीच श्रद्धा आहे. आणि मला वाटते माझ्या प्रत्येक हाकेला देव धावून येतो, आणि माझे काम होते. परंतु माझ्या पतींचे त्याबाबतीत भिन्न मत आहे आणि तेही स्वाभाविक आहे. त्याला कारणेही अनेक आहेत. ते प्रत्येक माणसात देव समजून प्रत्येकाला त्याच्या अडचणीच्या वेळी मदत करतात, स्वत: संकटात पडून परंतु त्यांच्या संकटाच्या वेळी त्यांना कोणाचीच मदत मिळत नाही.

ते अनेक तीर्थक्षेत्रे फिरलेले आहेत. तीर्थक्षेत्रावरील तकलुपीपणा, दांभिकपणा, ह्याशिवाय त्यांना तेथे काहीच आढळलेले नाही. देवाच्या नावाला काळीमा फासणारे अनेक प्रकार तेथे घडतात. परंतु शिरडीचे "श्री साईबाबा" ह्याबाबतीत मात्र त्यांना वेगळाच अनुभव आलेला आहे. ते स्वत: ते कबूल करतात तो प्रसंग त्यांच्याच शब्दात खाली देत आहे.

"माझी मुलगी एस. एस. सी. च्या परीक्षेला बसलेली होती. परीक्षा पास होऊन निकाल लागला. परंतु आम्हांला ज्या मार्कांची अपेक्षा होती तेवढे मार्क तिला मिळाले नाहीत अजिबात कमी नव्हते अगर पाहिजे तेवढे जास्त पण नव्हते त्यामुळे तिला विज्ञान शाखेत पाहिजे त्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळणे शक्य नव्हते. मी अतिशय निराश झालो होतो काय करावे सुचत नव्हते अशा परिस्थितीत माझ्या सौभाग्यवतीने मला "श्री साईबाबांना" नवस बोलण्यास सांगितले. जर मला "श्री साईबाबा" पावले तर साईलीला मासिकात माझा अनुभव मी जरूर पाठवेन.

आणि खर सांगू "श्री साईबाबा" माझ्या हाकेला धावून आले. अगदी आश्चर्य करण्या सारखी घटना घडली. माझ्या मुलीला आमच्याच नात्यातील एका थोर गृहस्थाकडून तिला पाहिजे त्या कॉलेजमध्ये पाहिजे त्या शाखेत प्रवेश मिळाला. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या गृहस्थानी आमचे काम केले त्या गृहस्थांची आणि माझी पूर्वीची ओळख देखील नव्हती. नेमके ते त्याचवेळी आम्हांला भेटावे ही खरोखरच त्या साई माऊलीचीच कृपा नव्हे काय?

अशा या साईमाऊलीला माझे शतश: प्रणाम."

# आणि चमत्कारावर विश्वास बसला

—श्री. रामचंद्र महादेव जोशी,
तुकाराम म्हात्रे चाळ, म. द. ठाकुर रोड
डोंबिवली (पूर्व).

० सत्य सांगावयाचे म्हटले तर चमत्कारविषयक घटनांवर माझा अगदी गेल्या महिन्यापर्यंत विश्वासच बसत नव्हता. स्वतःला काही विशिष्ट अनुभव येईपर्यंत. इतरांचे अनुभव म्हणजे मला केवळ भारुड कथा वाटावयाच्या! मी त्या आवडीने वाचावयाचो. परंतु त्या केवळ वेळ घालविण्याचे एक माध्यम म्हणून.'

'श्रीसाईलीला' (मराठी आवृत्ती) चा मी एक वाचक आहे. त्यातील श्रीसाईनाथांच्या कथा, त्यांच्या विविध भक्तांचे अनुभव, मी प्रथम, प्रथम केवळ गंमत म्हणूनच वाचीत असे. म्हणजेच त्या वाचून सोडून देत असे. परंतु नंतर नंतर मात्र मला तसे करावेसे वाटेना. वाचनाची व त्यातील कथा अनुभवांवर चिंतन करण्याचे व मनन करण्याचे मला वेडच लागले. हे वेड लावण्यास 'श्रीसाईलीला' आणी स्वतः सद्‌गुरू साईनाथच कारणीभूत आहेत.

आणि एक दिवस मला स्वतःलाच साईनाथांनी त्यांची प्रचिती दाखवून दिली. माझ्या कंबरदुखण्याचा आजार इतका बळावला की, किती वैद्य झाले, किती हकीम झाले. सर्वप्रकारची औषधयोजना झाली परंतु कंबरेचे दुखणे काही कमी होईना. दिवसेंदिवस बेचैनी वाढू लागली. कामाच्या ठिकाणी खाडे झाल्याने आर्थिक कुचंबणाही विशेष करून जाणवू लागली.

मी जरी प्रथम साईनाथ वा अन्य कोणाही संतपुरुषाचा भक्त नव्हतो तरी कोणाची कधीही टवाळी करीत नसे. कोणाविषयी अपप्रचार किंवा अपशब्दही माझ्या तोंडून निघत नव्हते. सर्व उपाय जेव्हा थकले तेव्हा एक दिवस साई-नाथांपाशी गाऱ्हाणे नेण्याचा विचार मनांत आला. देवघरातील साईनाथांच्या प्रतिमेपाशी बसून मी त्या पालनकर्त्याला म्हटले, "हे गुरुराजा, आजपर्यंत तू अनेक भक्तांना दृष्टांत देऊन अनेक वेळा अनेक असाध्य संकटातून त्यांची मुक्तता केलीस आहेस. हे जगत् नियंत्रका, माझे कंबरेचे दुखणे जर कायमचे दूर करशील तर तो माझ्या जीवनातील सर्वात मोठा व रहस्यमय अनुभव ठरेल." त्याच रात्री मला स्वप्नात दृष्टांत दिला व ही करणीची बाधा असल्याचे सांगून तुझ्या गुरुपाशी जा असे सांगितले. मला वैयक्तिक गुरु नव्हता. परंतु आमच्या कुटुंबाचे एक गुरु आहेत. त्यांना मी काही सांगण्याच्या आतच त्यांनी

कंबरदुखी, करणी व रात्रीचा माझा दृष्टांत यावर बोलण्यास प्रारंभ केला. मी चकीत झालो. माझी कंबरदुखी जगजाहीर होती परंतु 'करणी' व रात्रीचा दृष्टांत याविषयी मी कधीही कुणापाशी बोललो नव्हतो. कदाचित साईनाथांचेच हे काम असावे असे मी मानले. गुरुंनी दिलेला उपाय योजला मात्र, गेले महिनाभर मी कंबरदुखण्यापासून मुक्त झालो आहे.

अशी ही 'साईलीला'! श्रीसाईनाथ आज आपल्यात शरीररुपाने नाहीत परंतु त्यांचे अस्तित्व मात्र अशा चमत्काराने काल जाणवत होते, आज जाणवत आहे व उद्याही जाणवत राहील.

मला आलेल्या या अद्वितीय अनुभवांवर साईनाथांच्या चमत्कारावर आता मात्र माझा विश्वास चांगलाच बसला. ●

× × ×

# मला परमपूज्य बाबांनी दिलेले दर्शन

—श्रीमती कृष्णाबाई उर्फ माई ढेपे,

बी।११९।६ गव्हर्नमेंट कॉलनी, बांद्रा (पू.) मुंबई ५१.

जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव याची प्रचिती मला अनेक वेळा आली त्यापैकी एक प्रसंग असा :

माझे वय ८० च्या घरात आहे. मी रोज नियमाने पूजेच्या वेळी साईस्तोत्र म्हणत असते व वाचतेही. माझी धाकटी बहिण शिर्डीसच हायस्कूल मध्ये शिक्षिका होती. तिला बाबांची रोज सेवा घडे. मी मनात म्हणायची बाबा मला माझ्या बहिणीसारखी आपली रोजसेवा घडत नाही. तर प्रत्यक्ष दर्शन कसे होणार? असेच एके रात्री साईप्रार्थना करुन मी नित्याप्रमाणे झोपले. झोपेत पहाटेच्या वेळी बाबांची मूर्ति प्रत्यक्षात आमच्या झोपण्याच्या हॉलमध्ये बाबांचा फोटो आहे त्याचेजवळ उभी असल्याचे दिसले. बाबांना काय भिक्षा घालावी. थोडेसे तांदूळ आणले. त्यावर बाबा म्हणाले आणलीच आहे तर घाल भिक्षा. मी तांदूळ बाबांच्या झोळीत घातले. नमस्कार केला. किती सुंदर पाय माझ्या बाबांचे होते. पदस्पर्श झाल्यावर बाबा अदृष्य झाले. सकाळी मी माझे मुलीला ही हकीकत सांगितली तेव्हा ती म्हणाली छान झाले. बाबांनी स्वप्नात दर्शन दिले. ती नित्याप्रमाणे देवघरापाशी गेली तो काय आश्चर्य! आजुबाजुला तांदूळ सांडलेले दिसले. हीच ती साई भिक्षा व प्रसाद म्हणून मी ते तांदूळ डबीत ठेवून देवघरात ती ठेवली आहे. नियमाने डबीचे दर्शन करते. माझ्या मनातील साई दर्शनाची व सेवेची इच्छा बाबांनी अशी पूर्ण केली. ☆

# साईबाबांनी दृष्टी दिली

—श्री. राजाभाऊ पटवर्धन,
८, जनार्दन, सेनापती बापट मार्ग,
दादर, मुं. २८

माझे वडिलबंधू किरकोळ आजारामुळे अंथरुणावर होते. परंतु अचानक एक दोन दिवसात त्यांचा डावा डोळा भयंकर लाल झाला. उष्णतेचा प्रकार म्हणून नाना घरगुती उपाय झाले. साईबाबांचा अंगारा हा तर होताच. परंतु जेव्हा त्या डोळ्याने दिसेनासे झाले तेव्हा नेत्ररोगतज्ञांकडे नेण्याचे ठरले. तत्पूर्वी 'ऑपरेशन टळावे, नुसत्या औषधांनी दृष्टी परत यावी.' असे मी साई-बाबांना साकडे घातले. डॉक्टरांनी बच्चू अली हॉस्पिटलमध्ये भावाला ट्रीटमेंट-साठी सांगितले. तेथेसुद्धा जनरल वॉर्डमध्ये भरपूर जागा असल्यामुळे भावाबरोबर मला रहाता आले. महत्त्वाची गोष्ट म्हणजे ट्रीटमेंट फक्त औषधे व इंजेक्शनची होती. ऑपरेशन टळले होते. काही दिवसापूर्वीच माझे बंधू घरी आले आहेत, व त्यांची दृष्टी पूर्ववत झाली आहे. ही सर्व साईबाबांचीच लीला! दुसरे काय?

त्यानंतर माझ्या स्वतःच्या डोळ्यावर क्रिकेट खेळणाऱ्या मुलांचा बॉल लागला. डोळा भयंकर सुजला. पुन्हा साईबाबांना, प्रार्थना करून डॉक्टरांकडे गेलो. आठवड्याभराच्या ट्रीटमेंटनंतर डोळा पूर्ववत झाला. अशाप्रकारे साई-नाथांच्या कृपेने माझी व माझ्या भावाची दृष्टी परत आली. जय साईनाथ!

---

# मुलगा संपूर्ण बरा झाला

—सौ. सुवर्णलता गो. गवंडे,
१९ बी, डॉ. मस्करहेन्स रोड,
मुंबई नं. ४०० ०१०.

श्रीसाईलीला अंक मी आवडीने वाचते. १९८२ चा दिवाळी अंक (भक्ता-नुभव) वाचून मला आलेले अनुभव लिहिण्याची प्रेरणा मला मिळाली. माझा मोठा मुलगा १९८२ साली बारावीच्या परीक्षेला बसला होता. १९८१ साली साली परीक्षेला बसता आले नाही कारण नेमका परीक्षेच्या आदल्या दिवशी तो तापाने आजारी पडला. डॉक्टरच्या औषधाने वेळीच गुण न आल्यामुळे वर्ष फुकट गेले. नंतर पुन्हा एकदा परीक्षेस बसला. परंतु यश आले नाही. मला चिंता

वाटू लागली कारण प्राथमिक शाळेत पाचव्या इयत्तेत असतांना टॉईफॉइडमुळे त्याची दोन वर्षे वाया गेली होती. आजारात मुलाचा स्नायुवरचा संपूर्ण ताबा उडाला होता. नाना तऱ्हा होत होत्या. मोठमोठे डॉक्टर केले पण गुण काही येईना. लोक म्हणायचे की त्याला हॉस्पिटलमध्ये घेऊन जा पण नेणार कसा? माझ्या मुलाला उभ रहायला येत नव्हत की उचलून वर घेता येत नव्हतं. सगळी लोकं बोलायची की तुम्ही त्याला घरी ठेवून त्याची वाट लावणार. आजारीपणात एकदा मागे माझे सासरे मुलाला म्हणाले की, असा किती दिवस घरी अंथरुणावर पडून रहाणार तुला हॉस्पीटलमध्ये नेऊ या. हॉस्पीटलची गाडी मागवून स्ट्रेचरवरून घेऊन जाऊ या. माझ्या मुलाने तोंड वाईट केलं अन् बाबांच्या तसबीरीकडे तोंड करून बोलला की साईबाबाच मला ठीक करतील. अखेर बाबांनाच आमची काळजी. डॉक्टरी उपचार बंद झालेले अशा वेळी माझा आतेभाऊ ज्यास होमिओपथीचे ज्ञान होते त्याचे औषधोपचार सुरू केले. बाबांच्या कृपेने यश आले व मुलगा पूर्ण बरा झाला. माझा भाऊ हा कांही डॉक्टर नव्हता. केवळ बाबांचे आशिर्वाद व कृपा.

आम्हा उभयतांची बाबांवर पूर्ण श्रद्धा अनेक संकटातून बाबांनी आम्हाला वाचवले. मला स्वतःला न्युमोनियासारख्या मोठ्या दुखण्यातून बाबांनी वाचवलं. मला हॉस्पीटलमध्ये ठेवण्याची वेळ आली होती पण ती वेळ टळली. आमचे येथे रोज साईबाबांच्या पोथीचे वाचन होत असे परंतु माझ्या आजारीपणात वाचनात खंड पडला होता. पण जेव्हा आम्ही पुन्हा पोथीवाचन सुरू केले तेव्हा त्याच दिवसापासून माझ्या प्रकृतीत आराम पडत गेला. पोथीवाचन सुरु केलं, तो दिवस गुरुपुष्य योग होता.

मला आनंद वाटतो की माझा मुलगा बारावी पास झाला. बाबांनीच पास केला माझी हाक ऐकली व अशा रीतीने बाबांनी मला माझे अनुभव लिहिण्यास उद्युक्त केले. ही सर्व साईंचीच किमया कर्ते करविते तेच आपण माणसे फक्त निमित्ताला. दृढ श्रद्धा व सतत चिंतन असल्यास साईमाऊली सदैव आपुली पाठीशी राहील.

# साईबाबांचा चमत्कार

—विजयकुमार जयदेव चिंदरकर
मु., पो., ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग-६६.

० श्री साईबाबांविषयी श्रीसाईलीलामध्ये लिहिण्याचे माझ्या मनांत पुष्कळ दिवसांपासून होते. पण म्हणतात ना, प्रत्येक गोष्टीला योग यावा लागतो. आणि गुरु (परमेश्वर) कृपा प्राप्त व्हावी लागते

आनंदाची गोष्ट म्हणजे आम्हाला दोन सद्‌गुरु लाभले आहेत. एक म्हणजे जगद्‌गुरु ओम् श्री साईबाबा व दुसरे म्हणजे, आमच्यापेक्षा थोर असलेले आमचे दोन नंबरचे सख्खे भाऊ 'श्री स्वामी संजयानंद (हिमालय)! '

श्री साईबाबांची भक्ती करायला आम्हाला आमच्या बंधूंकडून स्फूर्ती मिळाली. स्फूर्तीच नव्हे तर त्यांच्या मार्फत आम्हा कुटुंबियांना श्री साईबाबांचे पुष्कळ चमत्कार पहायला मिळाले आहेत. उदा. बाबांच्या फोटोवरती पवित्र विभूती येणे, कुंकूम तसेच मध वगैरे येणे. एके दिवशी सकाळी नाश्त्याच्यावेळी. साडेआठ ते नऊच्या सुमारास श्री बाबांच्या फोटोसमोर थालीपीठ (दशमी) ठेवले असता त्यावर बाबांनी स्वतःची प्रतिमा असलेली चांदीची अंगठी ठेवली. मोठ्या बाटलीत हिमालयातील पवित्र गंगा बाबांच्या फोटोशेजारी ठेवलेली आहे. या गंगेत बाटलीचे बूच बंद असताना स्वतःचे सोन्याचे लॉकेट निर्माण केले. श्री साईबाबा सर्वव्यापी असल्याचीच जणू ही साक्ष आहे. आमचे श्री सच्चिदानंद साईबाबा सदैव सर्वत्र असतात. बाबांना कुठेही प्रवेश करायला दारे वा खिडक्याची सुद्धा आवश्यकता नाही.

जो अध्यात्म व शास्त्र जाणतो, तोच परमेश्वरी लीला जाणतो!

आमच्या गाठीशी श्री साईबाबांचे पुष्कळ चमत्कार साठविलेले आहेत. मला वाटतं, बाबांचे निरनिराळे चमत्कार पहाणारा ह्या उभ्या महाराष्ट्रात तरी आमच्या इतका दुसरा कोणी मिळणे विरळा, आणि हे खरच आहे; कारण श्री साईबाबांच्या लीला (चमत्कार) आम्ही स्वतःच्या डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिल्या आहेत. श्रद्धा असल्यावर कोणालाही अनुभव हा येतोच; पण आमच्याकडे मात्र पुष्कळ अनुभव आहेत. श्री साईबाबा आम्हाला मदत करतात.

आमचे बंधू श्री स्वामी संजयानंद व त्यांची धर्मपत्नी म्हणजेच आमची वहिनी मीरा यांच्या बाबांवरील प्रगाढ भक्तीमुळे श्री बाबांची कृपा आम्हा

कुटुंबियांना लाभ शकली आहे. वर्षं दीड वर्षांने एकदा तरी ते नित्यनेमाने सपत्निक शिरडीला श्री बाबांच्या दर्शनाला जातात, व मनात आल्यास कणकवलीलासुद्धा आम्हाला भेटण्यासाठी येतात. आम्हाला मात्र अजून बाबांच्या पावन शिरडीला जाण्याचा योग आलेला नाही. पाहु या ते दयाळू बाबा केव्हा बोलवतात ते!

श्री साईबाबा आता सशरीर ह्यात नसले तरीसुद्धा आमचे बंधू श्री स्वामी संजयानंद व मीरादेवी यांना दर्शन देतात. दर्शन देण्याचा काळ कोणताही असतो, पण रुप बदललेले असते. रुप जरी बदललेले असले तरी जाताना आपणच साईबाबा आहोत, ही खूण पटवून जातात.

काळाच्या दाढेतून व यमाच्या पाशातून आपल्या भक्तांना वा त्यांच्या नातेवाईकांना श्री साईबाबा ओढून आणून कसे वाचवतात, ते पहा!

तारीख ८ जून १९८३ रोजी आमचे पिताजी (वडिल) आप्तेष्टांना भेटण्यासाठी मुंबईला जात होते. उन्हाळी सुटीचा मोसम असल्याने एस. टी. ची रिझर्व्हेशन्स तिकीटे 'हाऊस फुल्ल' होती. म्हणून प्रायव्हेट लक्झरीमधून आमचे वडिल जाण्यास निघाले. दुपारी दिड वाजण्याच्या सुमारास बस कणकवली-मधून सुटली. रात्री दहाच्या दरम्यान बसमधील सर्व प्रवाशांना डुलकी येवू लागली. त्या बसमध्ये दोन ड्रायव्हर होते. त्यापैकी एक कणकवली ते चिपळूण पर्यंत बस चालवत होता. बस चालवत असताना त्याने थोडी नशापाणी केली होती. चिपळूण स्टँडवर तो अधिकच दारु प्यायला आणि बसमध्येच झोपी गेला. तो ड्रायव्हर झोपल्यामुळे दुसरा ड्रायव्हर गाडी चालवू लागला. रात्रौ साडे-अकरा ते पावणेबारा वाजण्याच्या दरम्यान (सर्व प्रवासी झोपेत असताना) ह्या दुसऱ्या ड्रायव्हरला झोप लागली की काय झाले हे स्वतः झोपेत असल्यामुळे कुणालाही कळले नाही. पण ह्या ड्रायव्हरच्या हातून चिपळूणच्या पुढे पोलाद-पूरच्या अलिकडे कशेडी घाटाच्या खाली शेवटच्या वळणावर मोठा अपघात झाला. घसरंडीवरुन ती बस पंधरा ते वीस फूट खाली कोलांटया घेत गेली. कल्पनेत नसताना अचानक जोराचा धक्का बसल्यामुळे बसमधील प्रवासी जागे झाले. बस झाडाला अडकली होती रात्रीचा भयानक अंधार, बसचे दिवे गेलेले असं असताना बसमधील प्रवाश्यांच्या रडारडीने व आरडा ओरडाने संपूर्ण आसमंत दणाणून गेला. आमच्या वडिलांना मुका मार लागला. बस उलटी होऊन राहिल्यामुळे त्यांच्या अंगावर माणसे पडली होती. वडिल कसेबसे उभे राहिले. दार उघडून बसच्या बाहेर आले. अपघात झाला त्या ठिकाणी मग

र्गीच वाहने थांबू लागली. विशेष गोष्ट सांगायची म्हणजे भगवान श्री साई-बाबांची आमच्यावर कृपा कशी आहे ते पहा!

आमचे एक गांधी नावाचे परिचीत सद्गृहस्थ आहेत. ते खेड येथे रहातात. त्यांची एल.पी. लॉरी आहे. अपघात झाला, त्यावेळी त्या ठिकाणी पहिले वाहन कोणाचे थांबले असेल तर ते म्हणजेच श्री. गांधी यांचेच! बाबांनीच त्यांना वडिलांच्या मदतीला पाठवले जणू! टॉर्च घेवून श्री. गांधी लॉरीमधून उतरले व स्वतःच्या क्लिनरबरोबर बोलू लागले. त्यांचा आवाज वडिलांनी ओळखलाच. त्यांनी त्यांना हाक मारली. आवाज ओळखून गांधी वडिलांजवळ आले. गांधी त्यांना पाहून आश्चर्यचकीत व आनंदीत झाले. त्यांनी मग वडिलांना रस्त्यावर येण्यास मदत केली. गांधींच्या लॉरीमध्ये लांजा येथील माल भरलेला होता. सामान वगैरे शोधून आमचे वडील त्यांच्याबरोबर लॉरीत बसले. आणि सकाळी लांज्यापर्यंत आले. तिथून रत्नागिरी मालवण एस. टी. बसमधून दुपारी एक वाजण्याच्या सुमारास कणकवलीला आले. श्री बाबांची केव्हढी मोठी ही कृपा!

वडील कणकवलीला आल्यावर त्यांच्या बसला अपघात झाला हे आम्हा सर्वांना समजले. ज्या ज्या कुणाचे नातेवाईक त्या लक्झरी बसमध्ये होते, ते आमच्या घरी चौकशीसाठी भयभित मनाने येऊ लागले. कुणाला किती मार लागला हे काही वडिलांनी त्या अंधारात पाहिले नाही. पोलीस पंचनाम्यात उगाचच दिवसभर रखडावं लागू नये म्हणून आणि इकडे आम्हाला अपघाताची बातमी समजली तर घरातील आम्ही सर्व घाबरून जाऊ म्हणून वडिल पुढे मुंबईला न जाता परत माघारी फिरले. श्री साईबाबांची आम्हा कुटूंबियांवर एवढी कृपा की, श्री. गांधींच्या रुपाने बाबांनी आमच्या वडीलांना कणकवलीला सुखरूपपणे यायला मदत केली.

आमच्या सौ. मातोश्रींचे की ज्या पहाटे पाच वाजल्यापासून रात्री दहा वाजेपर्यंत आमच्या सर्वांसाठी अविरत श्रम करणाऱ्या, योगमहर्षी संन्यासी श्री स्वामी संजयानंद यांच्या मातेचे कुंकू सौभाग्याचे म्हणुनच आज भगवान श्री साई-बाबांच्या कृपेने आमचे वडील आम्हाला जिवंतपणे परत मिळू शकले!

काही दिवसांनी आम्हाला असे कळले की, त्या बसला अपघात झाला तेव्हा जागच्या जागी तीन ठार आणि नंतर दवाखान्यात पाच मिळून आठ माणसे मृत्यूमुखी पडली. केवढा हा भयंकर व अंगावर भितीने शहारे आणणारा अपघात! त्या बसचे दोन्ही ड्रायव्हर्स कोल्हापूरचे असून लक्झरी बसच्या प्रवाशांच्या तिकीटाच्या पैशाच्या रिपोर्टसह फरारी झाले आहेत. आणि पोलीस त्यांच्या शोधात आहेत

जगद्गुरू भगवान श्री साईबाबांच्या पवित्र चरणाचे पुन्हा एकदा स्मरण करून व बाबांचे पुन्हा कृतज्ञतापूर्वक आभार मानून हा लेख मी श्री बाबांच्या पवित्र चरणावर अर्पण करतो.

जगातील माझ्या सर्व साईबांधवांना माझा सप्रेम साईराम!

---

# कान बरा झाला

—कु. डी. म्हात्रे
दादर, मुंबई नं. १८.

० श्री साईबाबांवर आमची सर्वांची श्रद्धा आहे. बाबा हेच आमचे पिता आहेत. तेच आमचे गुरु आहेत. तसेच सर्वस्व देखील आहेत. बाबांचे अनुभव आम्हाला नेहमीच येतात. बाबांची उदी आम्ही नेहमीच लावतो, व प्रसंगी साईमाऊलीलाच हाक मारतो. बाबासुद्धा आपल्या भक्ताच्या हाकेला नेहमीच धावून येतात.

एके दिवशी माझा कान दुखू लागला. कानातून पाणी येऊ लागले व माझे डोके बधीर झाले. कानामध्ये आठवडाभर इयर ड्रॉप्स घातले परंतु कान बरा झाला नाही, व पाणी येतच होते. बाबांची उदी कानाला व डोक्याला लावतच होते, परंतु बाबांनी श्रद्धेबरोबर सबुरी सुद्धा सांगितली आहेच. नंतर मी शिरडीहुन आणलेले बाबांचे पाणी (बाबांना रात्री पिण्याकरता ठेवतात ते पाणी) कानामध्ये घातले व डोक्याला लावले व बाबांना सांगितले " मला बरे वाटले तर, हा अनुभव साईलीलेत देईन " दुसऱ्या दिवशी कान पूर्णपणे बरा होऊन डोकेही बरे झाले. अशी ही आपली सर्वांची साईमाऊली आमच्यासाठी नेहमीच धावत येते. मी रोज अंतःकरणापासून बाबांना म्हणते " बाबा असाच आशिर्वादाचा हात आमच्या पाठीवर ठेवा. "

" दुःख संकटे आली तरी करु नका फिकीर
अंतरी ठेवा श्रद्धा सबुरी आपोआप निवारील शिरडीचा फकीर. "

◆ ◆ ◆

# साईची कृपा

—श्री. दिगंबर गणपत पेनूरकर,

सहजीवन सोसायटी, साईदत्त बंगला नं. ६ पुणे ३०.

० साईबाबांचे प्रत्येक वर्षी वारी करण्याचे व्रत आज २५ वर्ष मी करतो. बाबांचे कृपेमुळे मला आजपर्यंत अनेक मोठे मोठे कार्यक्रम सिद्ध झाले, त्याचे ताजे उदाहरण म्हणजे माझ्या आवडत्या मुलीचे लग्न ता. ५ जानेवारी १९८२ ला होते, सध्या मी चार महिन्यापूर्वी पेन्शनर झालो, वयोमानाने एकट्याला हे कार्य पार पाडता येणे कसे शक्य आहे. म्हणून मी बाबांना सांगितले, माझे घरात बाबांचा मोठा फोटो आहे. दररोज पुजा अर्चा करतो, त्याप्रमाणे मी बाबांजवळ मला तुमची मदत पाहिजे असे सांगितले. त्याप्रमाणे ता. ३ जानेवारी १९८२ पहाटे पाच वाजता साक्षात बाबांनी माझे डोक्यावर हात ठेवून सांगितले, "मी आहे काळजी करू नकोस." त्यानंतर उठून पाहतो तो कोणी नाही, मी उठून बाबांचे फोटोचे दर्शन घेतले, व माझ्या अंगात एवढी मोठी शक्ती निर्माण झाली की मला भिती कशाची वाटेना, जेवणा करता सातशे आमंत्रणे होती, प्रत्यक्षात दिड हजार लोक जिलबीचे अन्न भरपूर खाऊन तृप्त झाली. लग्न समारंभ, भरपूर गर्दी, सर्वांना पान सुपारी, गुच्छ व्यवस्थित मिळाले. लग्न समारंभ फारच मोठ्या प्रमाणात पार पडला. एवढे मोठे अन्नदान होऊन संध्याकाळी शंभर लोक जेवतील एवढे अन्न शिल्लक राहिले, पुन्हा तुपाचे डब्यात भरपूर तूप शिल्लक, साखर, मैदा, गोडेतेल भरपूर शिल्लक राहिले, मी अजब झालो, माझ्या बाबांनी एवढे मोठे अन्नछत्र घालून पुन्हा वस्तू शिल्लक राहिल्या, एवढ्या मोठ्या समारंभात कोणाचीही वस्तू म्हणून हरवली नाही, की साधी चप्पल पण चोरीला गेली नाही, माझे सर्व नातेवाईक, मित्रमंडळी व कॉलनीतील लोक माझी वाहवा करू लागली, पण त्यांना सर्वांना मी सांगितले हे सर्व साईबाबांची लीला आहे, मी काहीच करू शकलो नाही. माझ्या मुलीचे कॉलेजचे शिक्षण झाले, परंतु बाबांची सेवा अत्यंत आवडीने ती करते, तिने बाबांचे ग्रंथाचे तीन वेळा पारायण केले, व साईलीला मासिकाची ती अनेक वर्षाची सभासद आहे, मुलगी ज्या घरी दिली तेथील सर्वजण बाबांचे भक्त आहेत. लग्नानंतर प्रथम शिर्डीला बाबांकडे दोन दिवस राहिले याचा आनंद माझ्या मुलीला फार झाला. त्या पेक्षा दुप्पट आनंद मला झाला. साईबाबांचे किती मोठे उपकार आहेत की त्यांनी मला शेवटपर्यंत साथ दिली. अशा अनेक लीला साईबाबांनी केल्या. अशीच भक्तावर बाबांची कृपा राहो ही नम्र विनंती प्रार्थना. ●

# मला झालेले साईंचे अकल्पित दर्शन

—श्री आर. एस. केकरे
ब्लॉक सी, रुम नं. १ हरिनिवास,
लेडी जमशेटजी रोड, माहीम, मुंबई-१६.

० १९८१ चे जानेवारी चे पहिल्या आठवड्यात मी आणि माझी पत्नी सौ. कुसूम राजकोटला माझे मावशीकडे गेलो होतो. मावशीचे यजमान श्री. मुकुंदराव पंडीत बँक ऑफ इंडियात ऑफीसर म्हणून निवृत्त झाले व राजकोटला त्यांनी बंगला बांधला तो प्रथमच पाहायाला म्हणून आम्ही गेलो होतो. माझी मावशी सौ. लीलाताई पंडीत आणि रा. रा. आण्णासाहेब (मुकुंदराव पंडीत) दोघेही साईभक्त आहेत. प्रवेश दाराशीच श्री साईबाबांची तसबीर उत्तम सजावटीने त्यांनी लावली आहे. त्यांच्या बंगल्यातील एक खोली तर पूर्णपणे साईधाम आहे. आत प्रवेश केल्यावर असे वाटते आपण शिर्डीतील समाधी मंदीरात उभे आहोत.

आम्ही दहा दिवस तेथे होतो. आम्हाला तेथे श्री साईबाबांची अनेक भक्तीपर पुस्तके आणि त्यांच्या जीवनावरील अनेक पुस्तके आम्हाला वाचावयास मिळाली. तसेच माझ्या मावशीला आणि रा. रा. अण्णासाहेबांना अनेक वेळा श्री बाबांचे दर्शन घडले, तसेच त्यांना आलेले अनेक अनुभव ते सांगत असत आणि आम्ही ते ऐकण्यात तल्लीन होत असू. ते दिवस आम्ही अगदी साईमय झालो होतो. त्या वर्षीचा दिवाळी अंक रोहिणी मासिक हा पूर्णपणे श्री साईबाबांचे जीवनावर आधारित होता. तो भारदस्त अंक मी वाचायला घेतला आणि त्या अंकाने मी तर पूर्णपणे साईमय झालो असे वाटू लागले. माझ्या मावशीला आणि रा. रा. अण्णासाहेबांना इतके वेळा साईबाबांनी दर्शन दिले आपल्याला असे दर्शन घडेल कां? एवढी माझी पुण्याई आहे कां? असे विचार मनात यायचे. आमचे जायचे दिवस आले. अंक अर्धा अधिक वाचून झाला होता. उद्या आपल्याला निघायचे आहे. आज रात्रीत अंक वाचून पुरा केलाच पाहिजे अशा निर्धाराने वाचायला बसलो. रात्री २ वाजता अंक वाचून पुरा केला व समाधान वाटले. आणि अंक उशा जवळच्या टेबलावर उभा ठेवला कारण मुख पृष्ठावर श्री बाबांचा भव्य फोटो होता सकाळी उठताच त्यांचे दर्शन व्हावे हा हेतू. बाबांना हात जोडून मनात म्हटले बाबा तुमचे दर्शन व्हावे एवढा मी पुण्यवान नसेन तरी आपली

कृपा मजवर असू द्या. मी गाढ झोपी गेलो. सकाळी ४॥ ते ५ चे दरम्यान मी एकदम जागा झालो तो माझे पलंगाला कोणाचा तरी धक्का लागल्याचे जाणवले आणि पायाची चाहूल लागली म्हणून मी समोर पाहिले तर टेबलाचे जवळ दिव्य आकृती. पांढरी शुभ्र दाढी पांढरेच उपरण्यासारखे कापड फडफडताना दिसले ती भव्य बाबांचीच आकृती आहे अशी माझी खात्री झाली, आणि मी हात जोडले आणि ती आकृती त्या बाबांच्या फोटोजवळ विलीन झाली, श्री साई बाबांनी माझी "दर्शन मिळावे" ही इच्छा तात्काळ पूर्ण केली. याबद्दल मी बाबांचा कायमचा ऋणी आहे. माझे मनाला फार मोठे समाधान लाभले. सकाळी ही गोष्ट मी माझे मावशीला रा. रा. अण्णासाहेबांना सांगितली तेव्हा त्यांनाही फार आनंद झाला. माझे इच्छेप्रमाणे त्यांनी मला त्या रोहिणी मासिकावरील बाबांचा फोटो काढून दिला आणि मी तो मुंबईला आल्यावर फरेम करून देवघरात लावला. माझी पत्नी सौ. कुसूम हीने लागलीच श्री बाबांचा सप्ताह बसविला. तेव्हा पासून आम्ही उभयता रोज श्री बाबांचे पोथीचा एक एक अध्याय नियमित वाचतो, आणि श्री बाबांची मनोमन सेवा करतो. राजकोटची दहा दिवसाची सफर कारणी लागली कारण त्यानंतर आम्ही दोघे साईमय झालो, साईभक्त झालो. श्री साईबाबांचे चरणी शतशः प्रणाम.

---

## श्रीबाबांनी मंत्रदिला

—सौ. सिंधू कृष्णराव स
साईनगर, काटोल, जि. नाग

० शुद्ध अंतःकरणाने केलेल्या प्रार्थनेला बाबा धावत येतात, पावतात प्रत्यक्ष दर्शन सुद्धा देतात. तुम्ही बाबांच्या कसोटीत उतरा, बाबा तुम् जवळच आहेत म्हणून समजा.

"दे गा इसका भी भला, न देगा इसका ही भला."

हे ध्येय समोर ठेवा, जास्तीत जास्त चांगले करा. वाईट चिंतू नका. बाबां मागण्याची इच्छा करू नका. ते न मागता देतात.

बाबांनी मला अमोल देणगी दिली आहे, आणि तिही घरपोच. आ आश्चर्य वाटेल नाही का? कोणती असेल सांगा पाहू? आपण ओळ नाही. मीच सांगते "मंत्र" आणि तोही दिवाळीचा शुभ संदेश.

दिनांक २२ नोव्हेंबर १९८२ ची घटना आहे. आम्हां उभयतांचा पैशासाठी वाद चालू होता. रात्री मला स्वप्न पडले. हनुमानाची भव्य प्रतिमा समोर उभी होती. त्यांनी मला हे घे असे म्हणाले, मी म्हणाली "मला नको. मी घेऊन काय करणार!" दुसऱ्या बाजूला होमहवन चालू होते. त्यात मंत्राचा आवाज स्पष्ट ऐकू येत नव्हता. खून झाला, खून झाला अशा अवस्थेत एकदम जागे झाले. मी पतीना म्हणाले मला स्वप्न पडले. मन स्थीर नाही, घरात रमत नाही. कुठे तरी जावे असे झाले आहे का बरे असे वाटते. रात्री मंत्राचा अर्थ कळला नाही. या विषयावर बोलत होतो. तोच पोस्टमन घरी आला. व पत्र दिले. पत्रातील मजकूर असा—"साईनाथ, आपला साईलीला मधील लेख वाचला, आपण रोज घरी आरती करीत असालच; आरतीनंतर हा मंत्र म्हणावा.

श्रद्धा सबुरीच विदमेही। द्वारकामाईच धीमही त नमो साई प्रचोदयाति: असा मंत्र म्हणून पुष्पांजली अर्पण करावी. नंतर "अनंत कोटी ब्रम्हांडनायक राजाधिराज योगीराज सदगुरु सच्चीतानंद साईनाथ महाराज की जय. आपला साईराम. के. एम. धूपकर, गोरेगाव वेस्ट, मुंबई."

माझ्या पतीच्या डोळ्यातून आसू पडत होते. बाबा आपण आज मला खरोखरच मार्गदर्शन केले. आमच्यात असलेली उणीव आपण भरून काढली. सिंधू तू महान आहेस, तुझ्या पाठीशी बाबा असतांना तुला काय कमी आहे? तुला बाबांनी मंत्र दिला. एवढे भाग्य कुणाला लाभले आहे.

मला तीस वर्षापासून स्वप्नात मंत्र कानावर पडत होता. परंतु ते स्वप्नच असायचे. पण माझे स्वप्न खरे ठरले, आणि खरोखरच मंत्र मिळाला आम्ही दररोज मंत्र म्हणतो. मी धूपकरांना ओळखत नाही. यांना बाबांनीच संदेश पाठविला, व तो संदेश यांनी माझ्यापर्यंत पोचविला.

असे आहेत आमचे बाबा, तुम्हीच माझे सदगुरू, तुम्हीच माझे साई, कांचनाच्या पेटीत मोत्याच्या अक्षरांनी लिहून ठेवण्यासारखे नाव म्हणजे "साई"

"हृदयी नाम घ्या साईचे"
"सार्थक होईल जीवनाचे"

# बाबांमुळे हृदयपालट


—श्री मुकुंद रामचंद्र इंगळे
डी।४१, गणधिराज सोसायटी,
मिठागर मार्ग, मुलुंड (पूर्व)
मुंबई ४०० ०८१.


माझ्या समाधीची पायरी जो चढेल।
दु:ख हे हरेल सर्व त्याचे ।।

० मी ज्या बँकेत नोकरी करतो तेथे एके दिवशी मी तात्पुरता रोखपाल (कॅशियर) म्हणून जबाबदारी संभाळीत होतो. यावेळी माझ्याकडून रु. २,००० ची चुकी झाली. एका व्यक्तीने रु ७,००० भरले व याच्या पावतीवर त्याने . ९,००० असे लिहीले होते. नजर चुकीने "पैसे मिळाले लहान मुल ज्याप्रमाणे पडल्यावर प्रथम आईचा धावा करते त्याप्रमाणे प्रथम साईचा धावा संकटकाळात केला. मला केवळ तोच एक आधार होता.

चूक लक्षात आल्यावर मी त्या व्यक्तिशी संपर्क साधला. परंतु त्याने रु. ९,००० च भरल्याचे ठासून सांगितले. सतत तीन दिवस त्याच्याशी बोलून देखिल तो काही दाद लागू देईना. रु. २००० मला स्वत:ला भरावे लागणार होते. चवथ्या दिवशी सकाळी बाबांचे स्मरण करून, मी पैसे भरण्याची व्यवस्था करून बँकेत गेलो, आणि माझ्या दृष्टीने चमत्कारच घडला.

माझा बाबांवरचा भरवसा सार्थ ठरला. आदल्या दिवशी रात्रीपर्यंत पैसे नाकारणारी व्यक्ति बँकेत आली. तिने रु. २,००० माझ्या हातात ठेवले व क्षमा मागितली.

शब्द सुचत नव्हते. उर दाटून आलेला होता. एकच निश्चय केला की लवकरात लवकर शिर्डीला जाऊन यायचे, व त्याप्रमाणे जाऊन आलो. खरंच, श्री साई कृपेची सावली माझ्यावर असताना मला अशी भिती का वाटावी. साई लीलेच्या असंख्य वाचकांना याचे प्रत्यंतर वारंवार येत असेलच.

**येऊ दे काळ कसाही, मनी ठेवेन सदगुरु साई।**
**निर्धारे सम्यक् साही, देई प्रेरणा सद्गुरु साई ।।**

# बाबांनी शंका निरसन केली

–श्री. दिलीप शंकरराव लांडे
मु. पो. तऱ्हाळा,
ता. मंगरूळनाथ जि. अकोला.

० आमच्या वडीलांची शेगावच्या गजानन महाराजांवर खुपच श्रद्धा. गजानन महाराजांशिवाय इतर संतांचा विचारसुद्धा त्यांच्या मनात येत नसे. सन १९६९ साली सावरा (मंचनपुर) ह्या गावी वडील नोकरीला असताना तेथील दवाखान्यात म्हणून डॉ. डाहाके नावाचे गृहस्थ बदलून आले. ते साईभक्त होते. त्यांची साईबाबांवर खूपच श्रद्धा दरवर्षी शिर्डीची वारी करणे, साईग्रंथाचे पारायण इत्यादी धार्मिक विधी त्यांच्याकडे होत असत. वडीलांचा व त्यांचा परीचय झाल्यानंतर त्यांनी साईबाबांविषयी बरीच माहिती सांगितली. शिवाय साईस्तोत्राच्या एक दोन प्रती सुद्धा वाचण्यासाठी दिल्या. व एखाद्यावेळी शिर्डीस जरूर या असा सल्लासुद्धा दिला. परंतु वडीलांची श्रद्धा काही बसेना.

अशातच एक दिवस वडील शेगावला गजानन महाराजांच्या दर्शनाला गेले असता त्यांचा शेगावला मुक्काम झाला. रात्री झोपले असताना त्यांना रात्री स्वप्नात एक दिव्य दिगंबर पुरुष दिसला ती तेजोमय व्यक्ती म्हणजे गजानन महाराज होते. वडीलांना ते म्हणाले, "अरे शंकर उठ, आज तू स्तोत्र वाचले नाहीस तुझ्या थैलीत असलेले साईबाबांचे स्तोत्र वाच आणि रोजच वाचत जा, शिर्डीला माझ्या भेटीसाठी ये" इतके बोलून ते अदृश्य झाले. वडीलांना स्वप्नाचे खूपच आश्चर्य वाटले. त्यांना आपल्या थैलीत स्तोत्र आहे. याची कल्पनाही नव्हती. सकाळी उठून त्यांनी साई स्तोत्राचे वाचन केले व लगेच शिर्डीला जाण्याची तयारी केली.

शिर्डीला गेल्यानंतर बाबांच्या समाधीचे दर्शन घेतले त्या दिवशी शिर्डीत मुक्काम झाला. त्या दिवशी रात्री स्वप्नात एक दिव्य पुरुष आला पांढरी कफनी डोक्याला पांढरेच फडके, पांढरी शुभ्र दाढी असा त्याचा वेश होता. ते साईबाबा होते. ते वडीलांना म्हणाले, "अरे शंकर उठ तू आज गजाननाचे स्तोत्र वाचले नाहीस वाच उद्या जरूर वाच व रोजच वाचत जा. गजानन माझा भाऊ आहे. अरे, तो आणि मी एकच" इतके बोलून ती दिव्य मूर्ती अदृश्य झाली.

खरोखरच बाबांनी स्वप्नात येऊन वडीलांची शंका दूर केली, व दाखवून दिले की आम्ही सारे संत एकच आहोत. जरी शरीर वेगळे असले तरी आत्मा एकच आहे. त्या दिवशीपासून आमच्या देव्हाऱ्यात गजानन महाराज व साईबाबा यांची वडीलांनी आणलेली तसबीर अद्यापही आहे, व आम्ही दोन्ही संतांची उपासना करतो.

साईबाबांच्या व गजाननाच्या आशिर्वादे सगळे सुरळीत चालू आहे. त्या महान संत द्वयांच्या चरणी कोटी कोटी प्रणाम.

# उदीचा महिमा

–सौ. प्राजक्ता अरविंद गवंडी
पलुस्कर वाडी, चायना बाग,
वाकोला मसजिद, सांताक्रूझ (पूर्व)
मुंबई, नं. ४०० ०५५.

० शिरडीच्या श्री साईबाबांच्या उदीचे महात्म्य कोणाला पटले नाही? मला तर याचा अनुभव प्रत्येक प्रसंगी आलेला आहे.

माझा छोटा मुलगा प्रतीक, हॉस्पिटलमध्ये जन्मल्याच्या सहाव्या दिवशी काविळीच्या संशयावरुन डॉक्टरने त्याच्या डाव्या पायाच्या जांघेतील रक्त काढून घेतले. रक्त काढून घेतल्यावर त्यांनी मला त्याच्या पायाला शेकवणे किंवा चोळणे याची कल्पना दिली नाही. त्या सुईच्या भीतीमुळे माझा मुलगा पाय हलवेनासा झाला. परंतु ही गोष्ट घरी आल्यानंतर पंधरा दिवसांनी आमच्या लक्षात आली. जेव्हा त्याचा तो पाय मालिश करताना सुजून काळानिळा पडला तेव्हा ते पहाताक्षणीच आमच्या तोंडचे पाणी पळाले. २–३ डॉक्टरांना दाखविले. त्यांनी ताबडतोब औषधे चालू केली. पण त्याच्या पायात काही फरक दिसून येईना. म्हणून मी बाबांनाच साकडे घालून म्हटले की, "माझा मुलगा ८ दिवसात पाय हलविण्यास लागू दे मी साईलीलेत माझा लेख प्रसिद्ध करीन" असे म्हणून त्याला बाबांची उदी पाजून पायाला पण सतत ती लावत राहिले. झाले, ८ दिवसात तो चांगलाच पाय हलवू लागला व आता तर तो साफ बरा झाला आहे.

आताही मी जेव्हां जेव्हा संकटात सापडते तेव्हा तेव्हा श्री साईबाबा उदीच्या रूपात माझ्या मनाला दिलासा देऊन जातात.

## ॥श्री सद्गुरु प्रसाद॥

श्री. स. व्यं. कुलकर्णी एम्. ए.
रिटा. डे. कलेक्टर,
२४६५ 'ए' वॉर्ड, वरुणतीर्थ वेस,
कोल्हापूर ४१६ ००२.

० श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथांच्या कृपेची व भक्तांवर होणाऱ्या अनपेक्षित प्रसादाची कैक उदाहरणे आपण पाहतो, ऐकतो व श्री साईलीलेतून वाचतो. असाच श्रींचा प्रसाद मी नुकताच अनुभवला तो असा –

माझी पत्नी गेले वर्षभर दम्याचे विकाराने आजारी आहे. तशी ती गेली १२–१४ वर्षे आजारीच आहे. त्यात ३–४ वेळेला दवाखानेही झाले, पण गेल्या २०–११–८१ पासून जी आजारी झाली ती सुधारली नाही, तर उलट बिघडतच चालली. कोल्हापुरातील डॉक्टर्स व औषधोपचार झाले. सर्वानुमते दवाखान्यात ठेवावे असे ठरले. भवति न भवति होऊन ९–१०–१९८२ रोजी सकाळी ११ वाजता मिरजेच्या मिशन हॉस्पिटलमध्ये ठेवावे असे ठरले, व लगेच सांगलीच्या थोरल्या मुलास फोन करून कळविले. आम्ही सोमवारी जावे अशा विचारात होतो. परंतु मुलाने रविवारीच सांगलीस चला असा आग्रह धरला व तो व नंबर २ चा असे दोन्ही मुलगे रविवारी सकाळीच कोल्हापूरला सांगलीहून आले. दुपारी ३ वाजता निघण्याचे ठरवून त्या प्रमाणे टॅक्सी सांगितली व इतर सर्व व्यवस्था केली. दुपारी अडीच (२–३०) वाजेपर्यंत सर्व सामानसुमान आवरून झाले. आता चहा घ्यावयाचा व टॅक्सी आली की निघायचे, तेवढ्यात आमच्या शेजारील मुलगा आपला ट्रक घेऊन मुंबईस गेला होता तो परत येताना शिरडी-हून आला. आल्या आल्याच त्याने आपण शिरडीहून उदी–प्रसाद घेऊन आल्याचे सांगितले व लगेचच प्रसाद व उदी (श्री बाबांनी पाठविलेली) आणून दिली आम्ही प्र साद घेत असतानाच टॅक्सी आली. प्रसाद घेऊन आम्ही लगेच निघालो.

श्री बाबा ह्यात असतांना श्रींनी परमसाईभक्त श्री. नानासाहेब चांदोरकर यांची मुलगी अडली असतांना श्री रामगीरबुवा यांचे बरोबर उदी पाठवून तिला संकटमुक्त केले होते. हाही चमत्कार म्हणा, लीला म्हणा अगर श्री बाबांची आमचेवरील कृपा म्हणा, तशीच नव्हे काय? आज दोन महिने मिरजेच्या दवा-

खान्यात राहून मरणाच्या दाढेतून बरे होऊन चार दिवसात घरी निघालो ही श्रींचीच कृपा नव्हे काय? असेच चमत्कार हरघडी दाखवून श्री सद्‌गुरु साई नाथ क्षणोक्षणी रक्षण करीत आहेत. त्यांचे वचनच आहे --

**"तुमचा मी भार वाहीन सर्वथा**
**नव्हे हे अन्यथा वचन माझे"**

आणि म्हणून --

**"शिशु मातेच्या कडेवर असल्या निर्भयसहजची"**

श्री साईनाथ आपले भक्तावर पोटच्या मुलाप्रमाणे प्रेम करतात त्यामुळे मागणे काही रहातच नाही, तथापि श्री चरणी एवढीच एक प्रार्थना की, त्यांनी आम्हांस त्यांच्या चरणाची भक्ती अखंडपणे जन्मोजन्मी द्यावी.

० श्री सद्‌गुरु सच्चिदानंद साईनाथांच्या अलौकिक कृपा प्रसादाचा आमचा आणखीन एक अनुभव असा.

माझ्या मुलीचे लग्न श्री बाबांचे आज्ञेनेच झाले. लग्न श्री बाबांचे घरचेच असलेने निमंत्रणाचा प्रश्नच नाही. पण निवेदन सादर करण्यासाठी लग्नापूर्वी शिरडीस गेलो. तेथील सर्व कार्यक्रम आटोपून परत निघणेपूर्वी द्वारकामाईत श्रींचे दर्शन घेऊन श्री बाबांचे बाजूला उदीचा खांब आहे. तेथे हात जोडून प्रार्थना, मनातल्या मनात करीत, डोळे मिटून उभा होतो. त्यावेळी कोणीतरी 'प्रसाद घ्या' असे म्हणत होते. मी एकाग्र चित्ताने व मिटलेल्या नेत्रांनी श्रींचे समोर ध्यान करीत स्तब्ध उभा होतो. मनोमन मी ही श्रींच्याकडे प्रसादासाठी प्रार्थना करीत होतो. मी तसाच मागे वळलो तर माझी पत्नी व मुलगी खाली उभ्या होत्या. त्याही प्रसाद घ्या, प्रसाद घ्या, म्हणू लागल्या. मी गोंधळलो. कोणास म्हणतात ते समजेना. तेवढ्यात मागून एका गृहस्थानी "हा प्रसाद घ्या" म्हणून सांगितले. मी श्रींच्या पुढे पसरलेली ओंजळ तशीच होती त्यात त्या गृहस्थानी ओंजळभर जिलेबी घातली. मी श्रींचा प्रसाद मागत असताना श्रींनी अशाप्रकारे प्रत्यक्ष प्रसाद माझ्या ओंजळीत घातला.

श्री 'साईसच्चरितकार' श्री दाभोलकर यांचेवर श्रींनी प्रसाद केला त्यावेळी त्यांचेही हातात ओंजळभर खडीसाखर घातली. त्या घटनेची मला आठवण झाली.

म्हणजे मी माझी त्यांचेशी तुलना करतो असा याचा अर्थ नाही. परंतु ही घटना त्या घटनेशी सदृश आहे असे वाटते तेवढेच

"तुमचा मी भार वाहीन सर्वथा
नव्हे हे अन्यथा वचन माझे"

या श्री बाबांचे वचनाचा प्रत्यय साईदासांना पदोपदी येत असतो. ही कृपा अशीच अखंड रहावी ही श्री चरणी प्रार्थना.

☆

# नातवाची मोशन्सबद

–सौ. पद्मावती वैद्य
७–बी जीवनआशा,
६० ए पेडर रोड,
मुंबई ४०० ००६.

० आमचे घरी श्री. पू. साईबाबांची पूजाअर्चा चालू असते. मी दर गुरुवारी माळ घालते. पू. साईबाबांची कृपा आमच्यावर आहे. पू. बाबांचे सांगणं आहे "जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव" याची प्रचिती नेहमी येतेच. पण ह्यावेळी अगदी लौकरच बाबांनी आमच्यावर दया केली.

त्याचं अस झालं. माझा नातू ३ वर्षाचा आहे, त्याच नाव राजीव. राजीव गेले १५–२० दिवस आजारी होता त्याला काही खाल्ल की लगेच खूप मोशन होत. काही म्हणून काही पचत नव्हते. सारख म्हणायचा पोट दुखतय काही खायचा नाहीं. तसेच घातल की लगेच मोशन व्हायची. डॉक्टर २–३ झाले. होमिओपेथिक डॉक्टर झाले. कशा कशाने गुण नाही. डॉक्टर म्हणाले त्याची आतडी सैल होऊन एरिटेशन होतय. २–३ दिवस औषध दिले. बर नाहीच वाटलं. मग डॉक्टर म्हणाले औषध आता देवू नकाच. तसाच बरा होईल. पण कसलं, सारख मोशन होतच होत. सगळे उपाय थकले.

आता पू. बाबांशिवाय कुणी नाहीं. आमच्या घरी पू. बाबांचा मोठा फोटो आहे. त्या फोटो पुढे उभी राहिले व बाबांची प्रार्थना केली. बाबा ह्या मुलाला बर करायला आता तुम्हीच डॉक्टर आहात याची मोशन थांबवा. सारखं म्हणतो "आजी पोट दुखतय तुमच्या फोटोला तो नमस्कार करतो व म्हणतो, साईबाबा सुखी ठेवा" हे सारं बघून माझ्या पोटात तुटतय. एवढासा मुलगा आणि इतक्या वेळा मोशन झाली तर त्याला ताकद कशी राहिल? बाबा दयाळू होवून ह्या मुलाला बरा करा. तुम्हालाच दया येवू दे. तुमचाच तो प्रसाद आहे. तुम्हीच त्याला संभाळा. उद्यापासून मोशन थांबू दे हा अनुभव मी "साईलीला" मासिकात पाठविन. बाबा दयाळू होवून कृपा करा. अत्यंत भक्तीने प्रार्थना केली.

आमचा भरवसा पू. बाबांचेवर आहे. प्रार्थना केली आणि काय चमत्कार! खरच दुसरे दिवशी मोशन बंद झाली. नेहमी सारखा मुलगा खेळू लागला. खावू लागला. आता ३–४ दिवस झाले. एकदाच मोशन होते. तब्येत उत्तम झाली. ज्यादा मोशन बंद झाली. आता तो संपूर्ण बरा झालाय.

भक्तीने पू. बाबांना हाक मारली, की ते पाठीशी उभे रहातातच. बाबांना मात्र किती त्रास होत असेल. पण आम्ही मानव तरी काय करणार? उपाय थकले की श्री बाबांना साकड घालावं लागतच, आणि ते त्यातून पार करतातच. अशीच त्यांची कृपा रहावी हेच चरणी मागण आहे.

**साई महाराज कृपासागर । साक्षात् ईश्वरी अवतार**
**पूर्ण ब्रम्ह महान योगेश्वर । साष्टांग नमस्कार तयासी**

## श्रीसाईसच्चरित्र कोरडे ठणठणीत राहिल

–श्री. माधव गजानन गोरे
विनायक बाग, बालाजी मंदीर मार्ग.
कुर्ला (पश्चिम), मुंबई ४०० ०७०.

मे १९८३ मध्ये मला पहाटे एक स्वप्न पडले ते असे –

"मी शिरडीस गेलो आहे. प्रथम गुरुस्थान समोर आलो, तेथे माझी सुटकेस खाली जमिनीवर ठेवली व गुरुस्थानचे दर्शन घेतले. नंतर सुटकेस बरोबर न घेताच मी इतर सर्व दर्शनाला निघालो, जरावेळाने येऊन पहातो तो गुरुस्थान-समोर समुद्राचे भरपूर पाणी आले आहे व त्यात लहान मुले डुंबत होती. मला वाटले की कोणीतरी मुलगा माझी बॅग पळविणार. म्हणून मी आत पाण्यात जाऊ लागलो तेव्हा गुरुस्थानचा सेवक म्हणाला, ओहोटी, आली की मग तेथे जा. थोड्यावेळाने ओहोटी आली व मी आतमध्ये गेलो. पहातो तर माझी सुटकेस वाळूमध्ये पूर्ण रुतली होती, व फक्त तिचे हँडल वर होते. मी हँडल धरुन सुटकेस बाहेर काढली व उघडली तर आश्चर्य वरच छोटेसे पुस्तक अष्टोत्तर शतनामावली होते, व त्याच्याखाली सच्चरित्र होते. सुटकेसमध्ये पाणी गेल्याने अष्टोत्तरशत-नामावली इतके भिजले होते की मी ते अक्षरशः हातानी पिळले, व त्यातील पाणी काढले. व त्याच्याखालील साईसच्चरित्र अगदी कोरडे ठणठणीत होते. सच्चरित्र तर पूर्ण कोरडे होतेच परंतु ज्या रेशमी वस्त्रात बांधले होते तेही पूर्ण कोरडे होते व सच्चरित्राखाली माझे कपडे होते ते पूर्ण ओले होते ह्यामध्ये बाबांना काय सुचीत करायचे आहे ते बाबच जाणोत.

---

## साईराय माझे बाप–माय

–सौ. नीलम दिपक देशपांडे
११३९ 'ई' मार्केट एक्सटेंशन
कोल्हापूर.

"नित्य मी जीवंत, जाणा हेची सत्य
नित्य घ्या प्रचीत अनुभवे॥"

या श्री बाबांच्या उक्तीनुसार श्री साईनाथांच्या लीलेचे अनेक अनुभव दैनंदिन जीवनात पदोपदी येतच असतात त्यातील एक अनुभव मी येथे देत आहे.

श्री साईनाथांच्या कृपेनेच माझे लग्न झाले. सासरी जाताना मी श्री बाबांचा छोटासा फोटो बरोबर नेला होता. घरी सौ. सासुबाईंना विचारून तो फोटो पूजेस ठेवला. त्यांनी हरकत तर काही घेतली नाहीच. उलट त्याही त्या फोटोची पूजा करू लागल्या, व त्यांनाही हळू हळू त्याची प्रचीति वारंवार येऊ लागली. पुढे दोन वर्षानंतर माझे आईवडील एकदा नरसोबा वाडीस गेले होते. तेथून त्यांनी श्री गणपतीची व श्री साईबाबांची अशा दोन मूर्ती आणल्या. त्यातील तुला जी हवी असेल ती तू घेऊन जा असे सांगितले. 'बरं बरं म्हणत त्याकडे थोडे दुर्लक्षच झाले. शेवटी एक दिवस सौ. आईने 'आजच्या आज कोणती तरी एक मूर्ती ने म्हणजे दुसरी आम्हांला लावता येईल' म्हणून बजावले. तेव्हा मी श्री बाबांची मूर्ति घेऊन आले. घरी आणून ती सौ. सासूबाईंना दाखवली. थोड्या दिवसांनी बाहेरच्या बैठकीच्या खोलीत भिंतीवर ती लावली. आणि आश्चर्य म्हणजे त्याच रात्री सौ. सासूबाईंना स्वप्न पडले ते म्हणजे श्री साईनाथ नाथपंथी शिष्यसमुदायासह आमच्या बाहेरच्या खोलीत म्हणजे जिथे ती मूर्ती लावली होती त्याच खोलीत आले त्यांनी सासूबाईंकडे बोट दाखवून त्या नाथपंथीयांना सांगितले की "आपण इथे मुलगी दिली ना, तिच्या या सासूबाई बरं का!" आणि त्या सर्वांना (नाथपंथीयांना) वाकून नमस्कार कर असे सौ. सासूबाईंना सांगितले. सासूबाईंनी नमस्कार केल्यावर ते सर्वजण त्याच खोलीत पाट मांडून बसले व त्यांनी काहीतरी मंत्रोच्चार करण्यास सुरुवात केली. इतक्यात त्यांना जाग आली.

वास्तविक इथे प्रत्यक्ष दर्शन श्री नाथांनी दिले ते सासूबाईंना, मला नाहीच. पण त्यांनी आपल्या तोंडून मला आपली मुलगी, आपण दिलली मुलगी म्हटले यापेक्षा जास्त त्यांच्याकडे काय मागायचे? आईवडिलांकडे कोणती गोष्ट कधी मागावी लागते कां? अपत्याची तहान-भूक हित, आईवडिलांशिवाय कळकळीने कोण पाहिल? आणि एकदा साईनाथांनीच मला आपली मुलगी म्हटल्यानंतर मग माझी काळजी मी कशाला करू? या पामराची काळजी वाहण्यास श्री साई समर्थ उभे आहेत आणि खरोखरच संकटात हात द्यायला ते माझ्या सन्निध सदा सर्वकाळ जागरूक असतात व याचेही प्रत्यंतर मला वारंवार येत असते. किती म्हणून सांगू? त्यानींच सांगितले आहे की,

**तुमचा मी भार वाहीन सर्वथा**
**नव्हे हे अन्यथा वचन माझे ।।"**

# ही तर श्रींची कृपा

**********************

श्री. सूर्यकांत मा. गर्जे
जे (मेस) माउंट आबू
३०७५०१ (राजस्थान)

० गुरुवारचा दिवस. शिवाजी नगर, पुणे येथील श्री साईबाबा मंदिरात दिवसभर भक्तांची रीघ लागली होती. सायंकाळी आरतीच्या समयाला तर मंदीराचे सभागृह स्त्री–पुरुष भक्तांनी फुलून गेले होते. श्री बाबांची प्रसन्न हसरी मूर्ति पाहून मनात आनंदाच्या लहरी उसळत होत्या. उदबत्ती आणि धूपाचा संमिश्र सुगंध सर्वत्र दरवळत होता. मांगल्याने मंदिराचा परिसर भरून गेला होता. घंटी वाजली. पेटीने स्वर धरला आणि तालबद्ध, एका सुरात, एका लयीत श्री बाबांची आरती सुरू झाली. प्रत्येकजण देहभान विसरून श्री बाबांच्या चरणी नत–मस्तक झाला. आरती झाली. प्रसाद वाटला गेला. भक्तगण एका हातात प्रसाद सांभाळीत पुनः पुन्हां श्री बाबांचे दर्शन घेत परतू लागला. मी पण श्री बाबांना एक साष्टांग प्रणिपात केला आणि मंदिरातून बाहेर पडणार इतक्यात माझे एक स्नेही श्री. देसाई यांची व माझी नजरानजर झाली. खूप दिवसानंतर आज त्यांची भेट झाली, आणि तीसुद्धा श्री बाबांच्या मंदिरात. स्वाभाविक आनंद द्विगुणित झाला. गप्पा झाल्या.

श्री. देसाई यांच्या हातात एक कागदाचे भेंडोळे पाहून मी सहज त्यांना विचारले–

"हे कसले कागद आहेत हातात?"

"ओनरशिप फ्लॅटचा महाराष्ट्र हाउसिंग बोर्डाचा फॉर्म आहे. मला नको आहे. तुला हवा असेल तर घे. दहा रुपये किंमत आहे." तो उत्तरला आणि पैसे देऊन मी तात्काळ फॉर्म घेतला.

फॉर्म देण्यासाठी एक–दोन दिवसांचीच मुदत शिल्लक होती म्हणून त्वरित फॉर्म भरून बोर्डाच्या ऑफिसात जाऊन फॉर्म देऊन आलो.

असाच एक गुरुवारचा दिवस. संध्याकाळची वेळ. श्री बाबांच्या आरतीसाठी मंदिरात गेलो होतो. आरती झाली. मंदिराचे पुजारी श्री. राम बेलसरे यांना बाजूला घेऊन मी माझे मनोगत सांगितले

"गुरुजी, महाराष्ट्र हाऊसिंग बोर्डतर्फे फ्लॅट मिळावा म्हणून मी एक फॉर्म भरून दिला आहे. त्यासाठी हजारो लोकांकडून अर्ज आलेले आहेत. तेव्हां यात आपला नंबर लागेल का! श्री बाबांचा कौल घेता कां?"

"हो, विचारू की बाबांना" गुरुजी पटकन उत्तरलें आणि श्री बाबांच्या मूर्ति समोर येऊन आम्ही हात जोडून उभे राहिलो. गुरुजींनी श्री बाबांची मनोमन प्रार्थना केली. एक झेंडूचे फुल घेतले. श्री बाबांच्या गळयात हारांचा खच पडला होता. तसेच मागे भिंतीवर श्री बाबांच्या फोटोच्या दोन्ही बाजूला अनेक हार लटकून ठेवले होते. गुरुजींनी झेंडूचे ते फूल श्री बाबांच्या मूर्तीच्या डाव्या बाजूला मानेजवळ हारांमध्ये खोचून ठेवले. अगदी अलगतपणे गुरुजींनीं अगोदरच सांगून ठेवले होते. की, फूल किंचित् तसे विकसित होते व खाली पडते. श्री बाबांच्या मूर्तीच्या उजव्या बाजूस पडले तर मनोवांछित सफल होणार. डाव्या बाजूला पडले तर मनातील इच्छा पूर्ण होणार नाहीं. आणि फूल कुठल्याही बाजूला पडलेच नाही तर श्री बाबा कुठलाही निर्णय देत नाहीत, असा याचा अर्थ होतो.

मी श्री बाबांच्याकडे एकटक पहात होतो. आशाळभूतपणे मनातून प्रार्थना चालू होती. श्री बाबांची आराधना करीत होतो. त्यांच्या निर्णयाची वाट पहात होतो इतक्यात गुरुजी म्हणाले –'तुमचे काम नक्की होणार. तुम्हांला बोर्डात जागा मिळणार फूल उजव्या बाजूला पडले."

"पण गुरुजी फूल पडलेले मला दिसलेच नाहीं!" असे मी म्हणालो मात्र आणि काय आश्चर्य! श्री बाबांच्या फोटो जवळचा, उजव्या बाजू कडील एक सबंध हारच खाली पडला! जणू श्री बाबांना म्हणायचे होते, "तुला फूल दिसले नाही तर मग हार पहा."

महाराष्ट्र हाऊसिंग बोर्डाचा "लकी ड्रॉ" झाला आणि माझा त्यात नंबर लागला. फ्लॅट पण मिळाला. ही सर्व श्री बाबांची कृपा. पुढील निर्णयाची चाहूल श्री बाबांनी अगोदरच करून दिली. श्री बाबा अंतरज्ञानी आहेत. सर्व विश्वाची सूत्रे त्यांच्या हातात आहेत. ते विश्वनाथ आहेत असा विश्वास ज्या भक्ताच्या मनात दृढ आहे तो खरा भाग्यवान!

# बाबा भक्ताला संकटाची सूचना अगोदर देतात संकटातून मुक्त करतात.

–श्री. डी. बी. पोतनीस
२६।७ एच. बी. पिंपरी

जरी हे शरीर गेलो मी टाकून
तरी मी धावेन भक्तांसाठी

० श्री साई सद्भक्त गुरु बंधूना व भगिनींना श्री बाबांचे वचनाप्रमाणे अनुभव येत आहेत.

मला बाबांनी संकटांतून कसे मुक्त केले ते मी वाचकांना सांगणार आहे.

" १२ ऑगस्ट १९८२ रोजी संध्याकाळी सात वाजता आमचे घरासमोरील मोकळ्या जागेत मी लघुशंकेस गेलो. दोन सेकंदातच मला समोरून एक मोठा साप माझ्या रोखाने येताना मी पाहिला. तसेच माझे कानावर "मागे फिर मागे फिर" असा मोठ्याने आवाज आला. मी धापा टाकीतच घरापर्यंत आलो व भीतीमुळे दारातच बेशुद्ध पडलो. माझी पत्नी, मुले घाबरून गेली. आजूबाजूस राहणारे लोक जमा झाले व डॉक्टर टांकसाळे, डॉक्टर चोभे यांची ट्रीटमेंट चालू केली डॉक्टरांचे सल्ल्यानुसार मला पुणे येथील के. ई. एम. हॉस्पिटल-मध्ये नेले होते. अँम्ब्यूलंस मधून नेतांना थंड हवेमुळे मी के. ई. एम. हॉस्पीटल मध्ये थोड्याच वेळात सावध झालो. मला काहीच झालेले नव्हते फक्त भीतीने माझी शुद्ध हरपली होती.

श्री साईबाबांनी मागे फिर असा हुकूम जर केला नसता तर माझेवर कोणते संकट ओढावले असते हे सांगणे नकोच!

# अक्षय तृतियेला बाबा माझ्याकडे आले

—लीलाताई शं. गोलतकर
(ताईचे साईबाबा)
अभंग बिल्डिंग, परेल व्हिलेज, मुंबई

सद्गुरु वाचोनि सापडे ना सोय।
धरावे ते पाय आधि त्याचें।।

० ह्या अभंगाप्रमाणे मी माझ्या साईबाबांना माझे गुरु मानले. १९८० साली अक्षततृतियेच्या शुभ मुहूर्तावर ह्या घटनेला आज १५ मे रविवारी, अक्षय तृतीयेला ३ वर्षे संपून चौथे वर्ष लागलं.... म्हणून मी माझ्या गुरु माऊलीला जेवायचं आमंत्रण केलं..... बाबा, उद्या अक्षय तृतीया मी केळ्याच श्रीखंड करणार आहे तुमच्यासाठी. तुम्ही जेवायला या मी वाट पहाते. गुरु म्हटले की, आपल्या गुरुसाठी काहीतरी आवडती वस्तु सोडायची असते. ती वस्तु वेलची केळी सोडली.... माझी खात्री होतीच बाबा कुणाच्या तरी रुपाने माझ्याकडे जेवायला येतील.... परंतु बाबांचे येणं वेगळच होतं. ध्यानी मनी नसतांना ११–३० वाजता बाबा फोटो फ्रेमच्या रुपाने आले. मी अगदी आश्चर्य चकित झाले. शिरडीत द्वारकामाईत बाबाजवळ दगडावर बसलेली बाबांची फोटोफ्रेम आहे ना अगदी तशीच. परंतु तिच्यापेक्षा मोठी. एका साईभक्तान मला आणून दिली. ह्यांच माझ्या बाबांनी फार मोठ काम केलं म्हणून... त्यांना प्रेम वाटलं. त्यांच्या बरोबर ७–८ माणसे होती. कारण बाबाचं केवढे मोठे. गाडीने आले. माझ्या आनंदाला पारावारच उरला नाही. माझी गुरु माऊली आली. अगदी कायमचीच. मलाच नाही पण आपल्या असंख्य साई भक्तांना दर्शन देण्यासाठी. साक्षात् शिव शंभो. शिव शक्ती भोलेनाथ.... त्यांच्या म्हणण्याप्रमाणे. मी माझ्या भक्तांच्या अंकीला। आहे उभा पाशिच ठाकला। प्रेमाचा मी सदा भुकेला : हाक हाकेला देतसे।

त्याप्रमाणे माझी गुरु माऊली माझ्याकडे आली. माझ्या नजरे समोरुन न हलण्यासाठी, आणि म्हणूनच....

सद्गुरुवाचोनी सापडे ना सोय।
धरावे ते पाय आधि त्याचे

त्या सद्गुरु माऊलीला माझ्या असंख्य साईभक्तांसह कोटी कोटी प्रमाण..

× × ×

# भारत जिंकणार हे बाबांनीच सांगितले

—श्री. रमेश डी. चव्हाण
साईनिकेतन, गुजरलेन कार्नर
मु., पो., ता. नवापूर, जि. धुळे
नवापूर पिन ४२५४१८

० श्री साईनाथांचा अवतार मानवजातीच्या कल्याणासाठी झालेला होता. ते नेहमी म्हणत असत की, तुम्ही माझ्यावर आपला भार सोपवा मी तो सहन करीन! तुमच्यासाठी तो भार मी उचलीन! साऱ्या जीवनभर त्यांनी दुसऱ्यांची दुःखे नाहीशी करून त्यांना सुखी करण्याचा अहर्निश प्रयत्न केला; व जगाचा निरोप घेण्याची वेळ समीप आली तेव्हांही त्यांनी सर्वांना अभिवचनपूर्वक सांगितले की, माझा देह पंचत्वात विलीन झाला तरी दुःख शोक करु नका. निराश होऊ नका. माझी समाधी तुमच्या प्रार्थनेला पावेल! केवढा हा दिलासा आणि तसाच अनुभव आजकाल भक्तांना येत आहे.

श्री साईनाथांची वाणी म्हणजे देववाणी असेच अनुभव भक्तांना येत असतात. आपण आपल्या घरी साईबाबांच्या मुर्तीसमोर अगर छबीसमोर अथवा त्यांचे नाव घेऊन चिठ्ठी टाकली तर त्याप्रमाणे घडते याचे उदाहरण म्हणजे लंडन येथे चाललेल्या दि. २५ जून १९८३ रोजी लॉर्डस मैदानावर झालेल्या भारत विरुद्ध वेस्टइंडीज यामधील प्रुडेन्शियल विश्वकप सामन्याच्या निर्णय निमित्तांचा अनुभव.

याआधी भारतने झिम्बावे, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड' वेस्टइंडीज यांना पराभूत केले होते. आस्ट्रेलियाला पराभूत करून सेमीफायनलमध्ये इंग्लंडशी गाठ पडली आणि इंग्लंडला सुद्धा सेमीफायनलमध्ये पराभूत करून भारताने फायनल राऊंडमध्ये प्रवेश केला. इथपर्यंत भारताची चढती कमान असल्याने ' एक धक्का और दो ' अशीच भारतीय नागरीकांची अपेक्षा होती आणि म्हणूनच साऱ्यांचे लक्ष फायनलकडे लागलेले. मलाही सारखे वाटायचे हा सामना भारत जिंकल्यास भारताची मान उंचावली जाईल.

सामना सुरु होण्यापूर्वी मी माझे आराध्यदैवत साईबाबांना मनोभावे प्रार्थना केली व मुर्तीपुढे 'भारत जिंकेल' भारत हरेल 'या मजकूराच्या दोन चिठ्ठ्या टाकल्या व एक चिठ्ठी उचलली. नेमकी भारत जिंकेल अशी चिठ्ठी निघाली मनाला आनंद झाला. चिठ्ठी जिंकल्याची निघाल्यावर घरातील

सर्वांना सांगितले. आज फायनलमध्ये भारत जिंकेल असा बाबांचा कौल असून कोठल्याही परिस्थितीत भारत जिंकणार अशी माझी श्रद्धा आहे.

वेस्टइंडीजने टॉस जिंकून भारताला फलंदाजी दिली. सलामीच्या जोडीतील गावस्करचा बळी घेऊन वेस्टइंडीजच्या गोलंदाजानी भारताला पहिला धक्का दिला. त्यानंतर श्रीकांतने चौफेर फटकेबाजी करून ३८ धावा केल्या, अमरनाथ, यशपाल, श्रीकांत असे मोहरे कोसळले. संदीप पाटील, कपिलदेवने थोडाफार डाव सावरला. परंतु वेस्टइंडीजपुढे भारताचा फारसा निभाव लागला नाही व भारताच्या सर्वबाद १८३ धावा झाल्या. तेव्हा भारताचा पराभव निश्चितच मानला जाऊ लागला. माझी मुले मनोज व बिपीन, भावाची मुले राजू व सुनील तसेच भाऊ मनोहर चव्हाण मला म्हणाले. "साईबाबांपुढे निघालेली चिठ्ठी खोटी ठरणार." तेव्हा मी म्हणालो, "भारताचे गोलंदाज कमाल करून वेस्ट इंडीजला कमी धावात गुंडाळण्याची कामगिरी करतील." परंतु तरीसुद्धा मन साशंक होते. मी बाबांना म्हटले, "भारत जिंकला तर अनुभव प्रसिद्ध करीन.

वेस्टइंडीजने १८४ धावा करण्याचे आव्हान स्विकारून फलंदाजी सुरू केली. भारताच्या कपिलदेवने गोलंदाजीची सुरुवात करून पहिलेच निर्धाव षटक टाकले. त्यानंतर चौथ्या षटकात वेस्टइंडीजच्या भरवशाचा फलंदाज ग्रिनीज यास संधुने पायचित केले, त्यामुळे वेस्टइंडिजवर संकटच कोसळले. येथून वेस्टइंडीजचा चमू दबावाखाली खेळू लागला. नंतर रिचर्डने डाव सावरण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. एका मागून एक फलंदाज बाद होऊ लागले. सर्वबाद १४० धावा झाल्या आणि जगाचे लक्ष लागून असलेला प्रुडेंशियल कप भारताने जिंकला.

क्रिकेट हा खेळ नशिबाचा असला तरी खेळाडूंच्या प्रयत्नानेच तो जिंकता येतो. हा सामना भारतीय खेळाडूंनी कौशल्याने प्रयत्नांनी जिंकला असला तरी श्री साईबाबांपुढे मी टाकलेली चिठ्ठी जिंकेल अशी निघून त्याप्रमाणेच घडल्याने मला स्वतःला आनंद झाला. साईकृपेने शब्द खरा ठरला म्हणून साईबाबांविषयी सुरुवातीस लिहिल्याप्रमाणे अनुभव आल्याने साईबाबांना माझे प्रणाम।

शेवटी सर्वांना एकच सांगणे आहे—

"जगात फक्त साई समर्थ<br>
साऱ्या भक्तांचा घेतात बोज.....<br>
भक्ती शाबूत असेल तर<br>
अनुभव सुद्धा मिळतील रोज!

☆

# दयेचा सागर

–कु. सुषमा गोध
शासकीय वसाहत वांद्रे पूर्व.

○ प्रथम माझ्या आराध्य दैवतास कोटी कोटी प्रणाम.

आपण सारेच श्री साईबाबांचे भक्त आहात. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात आपणास बाबांविषयी अनेक अनुभव आले असतील व यापुढेही ते येत राहतील. मी स्वतःला बाबांची छोटी भक्त समजते व त्याबद्दल मला अभिमानही वाटतो. माझ्या अल्पशा भक्तीने, बाबा "नित्य जिवंत" आहेत याचे अनेकवेळा अनुभव आले आहेत. बाबांना अंतकरणापासून हाक मारा त्याला प्रतिसाद निश्चितच मिळतोच. "शरण मज आला आणि वाया गेला दाखवा दाखवा ऐसा कोणी."

बाबांनी त्याच्या "श्रद्धा" व "सबुरी" या दोनच शब्दात आपल्या भक्त-गणांना सर्वस्व दिले आहे. "श्रद्धा" व "सबुरीचा" हा अनमोल ठेवा आपण जपला तर आपल्याला आयुष्यात काहीच कमी पडणार नाहीं. कारण बाबा कुबेर आहेत, ब्रम्हडांनायक आहेत. बाबां विषयी बोलू लागले तर दिवस पुरणार नाहीत लिहू लागले तर कागद अपुरे पडतील.

आमच्या घरातील लहानापासून थोरापर्यंत सर्वच बाबांचे भक्त आहेत. कोणत्याही छोट्या–मोठ्या प्रसंगी आम्हीं बाबांनाच हाक मारतो व त्या प्रसंगाला बाबा कोणत्याही रूपात धावून येवून, आलेल्या संकटाचे निवारण करतात, अशा या संकट विमोचकास "श्री गजानन" म्हटले तर ते वावगे होणार नाहीं. आमचे बाबा कोण नाहीत ते सर्वच आहेत. श्रीराम तेच, महाविष्णु तेच, गोपालकृष्ण तेच, गुरुदत्त तेच. भोलाशंकर तेच फार काय आई जगदंबा तेच.

हेच पहाना, माझ्या शाळेची सहल जानेवारी १९८२ मध्ये माथेरानला जाणार होती तत्पूर्वी माझी आई माझ्या काकांबरोबर शिर्डीला गेली होती. सहलीला जाण्याचा दिवस जवळ येत होता. माझ्या सर्व मैत्रीणींनी सहलीला जाण्याची नावे दिली होती. त्यानी मलाहि सहलीला येण्याचा खूपच आग्रह केला

सहलीला जाण्याची माझी तीव्र इच्छा होती. पण मला सहलीला जाण्याची माझ्या घरुन परवानगी मिळणे ही अशक्य कोटीतील गोष्ट होती. सहलीला जावयास मला मिळणार नाही याचे मला फार दुःख होत होते. त्यातून परवानगी मिळविण्याचा मी प्रयत्नही करून बघितला असता. परंतु लाड पुरविणारी आई घरी नव्हती. वडिलांजवळ परवानगी मागणे म्हणजे सूर्याकडून शीतलतेची अपेक्षा करण्यासारखे होते. अशा चिंतातूर परिस्थितीत असतानाच आमच्या देव घरातील "श्री साईबाबांच्या फोटोकडे माझे चटकन् लक्ष गेले व माझ्या तोंडातून नकळत "बाबा" –असे शब्द बाहेर पडले. बाबा तुमच्याशिवाय आता माझी इच्छा कोण पुरविणार? जवळच उदीची डबी होती. त्या डबीतील थोडी उदी घेवून माझी आई शिर्डीहून लवकर घरी परत येण्यासाठी मी ती बाहेर फुंकली. बाबांच्या फोटोसमोर उभे राहून उदी फुंकण्याचा माझा कार्यक्रम मी काही दिवस चालू ठेवला. बाबांनी माझी हाक ऐकली व आई काकांसह लवकरच घरी परत आली. सहलीला जाण्याचा दिवस अगदी जवळ येवून ठेपला. परंतु परवानगी मिळण्याचे चिन्ह दिसत नव्हते. त्यामुळे मला जेवण, अभ्यास, झोप काही म्हणून काहीच सुचत नव्हते. मी अगदी निराश झाले. शेवटी मला रडूच कोसळले. माझे काका माझ्या शेजारीच बसले होते. त्यांनी माझ्या आईला हा काय प्रकार आहे म्हणून विचारले. आईने त्यांना

माझ्या सहलीविषयी सांगितले. काकांनी लगेच मला सहलीसाठी ३० रुपये दिले व मला सहलीला पाठविण्याविषयी माझ्या वडिलांकडे रदबदली करून, त्यांची परवानगी मिळविली. जादुची कांडी फिरल्याप्रमाणे अचानक सारे जुळून आले. मला तर आश्चर्याचा धक्काच बसला. ही अशक्य गोष्ट केवळ बाबांच्या किमयमुळे शक्य झाली. मी सहलीला गेले. तेथे आम्ही मुलींनी खूप मजा केली व आम्ही आम्ही सर्व सुखरूप घरी परतलो.

बाबा तुम्ही माझ्या हाकेला सदैव धाव घेता. परंतु मी माझा तुम्हांला दिलेला शब्द मात्र पाळू शकले नाही. मी किती कृतघ्न आहे. मी तुम्हांला कबूल केले होते की, मला सहलीला जाण्यास मिळाले तर मी साईलीला मासिकात हा लेख देईन.

माझे बाबा दयेचा सागर आहेत. त्याविषयी माझा ताजा अनुभव मी असा सांगणार आहे.

मे महिन्यात आम्ही आमच्या काकांकडे गेलो होतो. तेथे मला अचानक पोटाचा त्रास सुरू झाला. पोटात असह्य वेदना होवू लागल्या. पाण्याशिवाय तडफडणाऱ्या माशासारखी मी तडफडत होते. त्या गावातील तीन डॉक्टरांनी माझ्या रोगाचे निदान तीन प्रकारचे केले. कोणी म्हणाले कावीळ आहे. कोणी सांगितले अपेन्डिक्स आहे तर तिसऱ्या डॉक्टरचे मत पडले की हा स्टोन (खडा) असावा. त्यामुळे प्रत्येक डॉक्टरने त्यांच्या त्यांच्या निदानानुसार माझ्यावर औषधोपचार केले. पण मला अजिबात गुण आला नाहीं. डॉक्टरांचे औषधाबरोबरच मी बाबांची उदी पाण्यातून घेत होते व पोटालाहि चोळत होते व बाबांचे नामस्मरण चालू ठेवले होते. गावी रहाण्यात उपयोग नाही. मुंबईला आल्याशिवाय योग्य उपचार होणार नाहीं म्हणून आम्ही सर्व आमच्या घरी (मुंबईला) परत आलो. तेव्हा मला दोन सत्पुरुषांची दर्शने घडली. त्यांना मी बाबांच्या रूपात पहात होते. त्या दोघानीही सांगितले की मला काही झाले नसून माझा एक्सरे जरी काढला तरी काहीच सापडणार नाहीं. परंतु मानवी प्रयत्न म्हणून मी जी. टी. हॉस्पिटलमध्ये गेले. हॉस्पिटलचे एकूण वातावरण बघून मला तर भितीच वाटली व मनोमन मी बाबांचा धावा केला व त्यांना सांगितले की जर या आजारातून ऑप्रेशनशिवाय मी लवकर बरी झाले तर फक्त फलाहार करून साई चरित्राचे सप्ताह करीन.

हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतर माझ्या ब्लड, यूरिनची तपासणी झाली. एक्सरेही काढण्यात आला व आश्चर्याची गोष्ट म्हणजे सर्व काही नॉर्मल होते. तीन दिवसानंतर लगेच मला मामुली औषधोपचाराने घरी पाठविण्यात आले. वास्तविक डॉक्टरी औषधाचा माझ्या दुखण्यावर फारसा उपयोग झाला नाहीं. परंतु बाबांची संजीवनी उदी व त्यांचे नामस्मरण हाच माझ्या दुखण्यावरील रामबाण उपाय ठरला.

बाबा हे जगविख्यात सर्जन असताना डॉक्टरांच्या औषधाचा काय उपयोग? या जगप्रसिद्ध सर्जनचे सर्व रोगांवरील रामबाण औषध म्हणजे उदी. उदी घेतली की सर्व रोग हमखास बरे होतात. परंतु हे औषध घेताना श्रद्धेचे पथ्य पाळावे लागते असे आहेत माझे दयासागर बाबा. बाबा मी तुमच्याजवळ एकच दान मागते. "हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा".

"हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा".

× × ×

# मना सारखा निकाल लागला

–शुभांगी हरिश्चंद्र चुरी
पुनित गंगा, डहाणुकर वाडी,
कांदिवली (वेस्ट) मुंबई.

जया मनी जैसा भाव
तया तैसा अनुभव

हे वाक्य श्री साईबाबा यांच्याबाबतीत बोलले जाते याचा मला प्रत्यक्ष अनुभव आला.

माझा इयत्ता १२ वीचा रिझल्ट १५ तारखेला लागला आणि एका विषयात मी नापास झाले. मला अतिशय वाईट वाटले कारण माझे एक वर्ष फुकट जाणार. परंतु मला बाबांची आठवण झाली नि त्यांच्या समोर जावून मी करुणा भाकली.

तिथेच मला पेपर फेरतपासणीची सुबुद्धि सुचली नि मी लगेच फार्म व पैसे भरले. थोडयाच दिवसात मी पास झाल्याचा रिझल्ट मिळाला. त्याक्षणी मला इतका आनंद झाला अर्थात बाबांनीच बुद्धि दिली म्हणून मी पेपर फेरतपासणीचा अर्ज केला.

शेवटी बाबांकडे एकच मागणे आहे की मला तुमचा विसर कधीच पडू देवू नका.

# श्रीबाबांच्या उदीचे चमत्कारिक अनुभव

-श्री. प्रभाकर आर. काटदरे
द्वारा एच. सी. सी. लि.
मेट्रो रेल्वे सेक्सन ४ बी.
चितपूर रोड,
कलकत्ता ७०० ०३७.

**जयां मनी जैसा भाव । तया तैसा अनुभव ॥**

० दोन वर्षापूर्वी माझ्या एका मित्राच्या पायाच्या आंगठ्या जवळ इसब झाला
होता. डॉक्टरी औषधे झाली. आयुर्वेदिक औषधेही झाली पण उपयोग झाला नाहीं.
त्यातच त्याच्या तळपायाला बटणाच्या आकाराचे फोडही येऊ लागले. तळपायाला
असल्यामुळे चालीमुळे ते फुटत व जागा लालभडक होत असे. तो एकदम त्रस्त
झाला होता. नेमकी त्याचवेळी माझ्याजवळ श्री साईबाबांची उदी नव्हती पण
बाजवळ रोज अगरबत्ती लावतो तो अंगारा मात्र होता. त्यातलाच त्याला
पायाला लावायला दिला व थोडा पाण्यात टाकून पिण्यास दिला. २-३ दिवसांत
त्याला आराम वाटू लागला. ७ दिवस तो पायाला लावीत होता. त्यानंतर पाय
एकदम ठीक झाला आजपर्यंत परत तेथे इसब झाला नाहीं.

दुसऱ्या एका मित्राच्या पत्नीची संपूर्ण अंगाची आग व्हायची. पोटातही आग
व्हायची. डॉक्टरी उपाय झाले. गुण आला नाहीं त्याने मला सांगितले. उदी
वापरून गुण येईल असे मला वाटले व त्याला उदी पाण्यात टाकून पिण्यास
सांगितले अवघ्या १५ मिनिटांत बाईला बरे वाटले. नंतर २ दिवस ती उदी घेत
होती. मित्राने लगेच १० रुपये वर्गणी भरून श्री साईलीला मासिक सुरू केले.

गेल्या महिन्यात माझ्या मुलाच्या पोटात भयंकर दुखत होते. उलटी पण
व्हायची. उलटीतून एक जंत पडला. डॉक्टरांनी पोट दुखीवर औषध दिले. जंत
नाशकही दिले पण जंत पडले नाहींत दुसऱ्या दिवशी मी बाबांजवळ प्रार्थना केली.
उदीमुळे मूतखडा विरघळल्याचे श्रीसाईचरित्रात वाचले आहे. जंत त्याप्रमाणे
लेजाणार नाहीत का? मी उदी पाण्यातून दिली. पोट दुखी थांबली मेव जंत

पण कोठ गेले समजले नाहीं. त्यानंतर परत जंत नाशक देऊन पाहिले. पडले नाहींत स्टूलची परिक्षा झाली पण त्यातही जंताविषयी रिपोर्ट मिळाला नाहीं अशी ही बाबांच्या उदीची किमया आहे.

१९६४ सालापासून आजपर्यंत बाबा मला नेहमीच संकटाच्यावेळी मदत करीत आले आहेत व अशीच सर्वांना मदत करोत हीच प्रार्थना.

श्री साईबाबांना शतशः प्रणाम.

## जया मनी जैसा भाव । तया तैसा अनुभव

कु. सुधा ग. देशपांडे
१२, स्वावलंबी नगर, नागपूर.

• श्रीसाई वचने जी आहेत त्यांच्या सत्यतेचा अनुभव सर्वांनाच येतो. आपण मनोभावे साईनाथास हाक मारली तर ते आपल्या भक्ताकडे धावून जातात व त्यांचे संकट आणि अडचणी दूर करतात. आमच्या घरी साईची भक्ती सर्वजण करतात. कोणतेही काम करताना श्री साईचे नामाने सुरुवात केली जाते. तीन बहिणी एक भाऊ आईवडील असे आमचे सहाजणांचे कुटुंब माझ्या मोठ्या बहिणीसाठी वडील वरसंशोधन करीत होते. नोकरीनिमित्त जवळ जवळ ३० वर्षे महाराष्ट्राबाहेर राहिल्यामुळे इकडील नाते संबंध पुसट झाले विवाहाचा योग येत नव्हता. नित्य साईची भक्ती करूनही साईला तिची का दया यत नाहीं असे आम्हां सर्वांनाच वाटत असे. तेव्हा एके दिवशी श्रीसाईचे तसबीरी समोर बसून आईने म्हटले की हे दयासागरा माझ्या मुलीला सुयोग्य वर मिळावा व हे मंगल कार्य यंदा लवकर घडवून आणावे. माझे मुलीचे लग्न यंदा झाल्यास मी हा अनुभव साईलीला मासिकात पाठविन.

थोडेच दिवसात हा योग आला आम्हां सर्वांना अत्यानंद झाला.

श्रीसाई कृपेने माझ्या बहिणीचे लग्न दि. २३ मे १९८३ रोजी मोठ्या थाटात झाले.

## श्रीसाईकृपा

**श्री. गौरूराम उरणकर**
मू. पो. ता. पनवेल जि. रायगड.

० पनवेल येथील रेल्वे स्टेशनजवळ "श्रीसाईबाबांचे" मंदिर आहे. बाबांवर श्रद्धा असलेले अनेक भक्तगण त्यांच्या दर्शनासाठी आणि आपले गाऱ्हाणे सांगण्या-साठी बाबांच्या मंदीरात जात असतात त्याप्रमाणे मी आणि सौ. ही जात असू. एके दिवशी साईंनां आम्ही आमचे गाऱ्हाणे सांगितले की बाबा आम्हांला मुलगा हवा आहे. दुसऱ्या दिवशी सौ. प्रसुत होणार त्याच्या आदल्या रात्री घरात रात्रभर मिणमिण जळत रहाणाऱ्या दिव्या (नाईट लॅम्प) मध्ये बाबांनी आपले रूप मला दाखविले आणि श्रीसाईच्या कृपेने दुसऱ्या दिवशी सौ. प्रसुत होऊन मुलगा आला. तो दिवस देवदिवाळीचा असून मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेचा होता. जणू काय साईने आमचे गाऱ्हाणे ऐकले आणि त्यांच्या कृपेने माझे घराल मुलगा झाला तो दिवस देवदिवाळीचा असून मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेचा होता. जणू काय साईने आमचे गाऱ्हाणे ऐकले आणि त्यांच्या कृपेने माझे घरांत हरिचे पूजा पाठ करणारा हरिभक्त जन्माला आला.

★

## साईचा स्वप्नातील दृष्टांत व उदीचा चमत्कार

**सौ. वसुंधरा रामराव चोरे**
८०३ सी लक्ष्मी भुवन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुं १४

० त्या दिवसाची आठवण झाली की अजूनही माझ्या अंगावर काटा उभा रहातो. माझी आईही अत्यंत साईभक्त आहे. एकदा ती दमा व मधुमेहाच्या विकाराने आजारी झाली. दिवसें दिवस तिचा आजार बळावत चालला. तिच्या पोटात पाण्याचा थेंबसुद्धा ठरेना. अशावेळी डॉक्टरांनी तिला ताबडतोब दवाखान्यात भरती करण्यास सांगितले. तिथे ठेवूनसुद्धा तिची प्रकृती वरखाली होतच होती.

सुधारणा होण्याचे काहीच चिन्ह दिसत नव्हते. दवाखान्यात तिच्या सोबतीला रात्री मीच रहात असे. ती तिथे असतानाच दत्तजयंतीच्या दिवशी पहाटे श्री साईबाबा तिच्या स्वप्नात येऊन तिच्या शेजारी बसले व तिला म्हणाले, "तू काही काळजी करू नकोस ह्या आजारातून तू लौकरच बरी होशील." व तिला जाग आली. हे स्वप्न तिने मला सकाळी उठल्याबरोबर सांगितले त्यावर मी तिला म्हणाले बाबांच्या आशिर्वादाने आता तू लौकरच नक्की बरी होशील. बाबांचे नाव सारखे तिच्या मुखी होतेच. ह्या स्वप्नानंतर एकच दिवस मध्ये गेला व तिची प्रकृती एकदमच गंभीर झाली. लगेच तिला आय. सी. सी. (युनीटरूम) मध्ये हलविले तेथील डॉक्टर व परिचारीका हुषार व चांगले असल्यामुळे तिला वाचविण्यासाठी खूपच प्रयत्न केला. पण त्यांना काही यश आले नाही. शेवटी जेव्हां तिचे शरीर थंड पडू लागले व नाडीचे ठोके अगदी मंद झाले त्यावेळी तिला लावलेला ऑक्सिजन, सलाईन व फिडींगची नळी काढून टाकली व आम्हांला बाहेर येऊन सांगितले की एकेकजण तिला लौकर लौकर पाहून या. त्यांचे उद्‌गार ऐकून मी ताबडतोब आईजवळ गेले व तिच्या उशाखालची उदी तिच्या सबंध अंगाला लावून बाजूला जाऊन बाबांचे नाव घेत उभे राहिले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे थोड्याच वेळात तिच्या देहाची हालचाल व डोळ्यांची उघडझाप सुरू झाली. एकदोन तासातच तिला थोडे थोडे बरे वाटून तिने मला व माझ्या भावांना जवळ बोलावले व आता मला पुष्कळ बरे वाटते असे सांगितले. तिचे हे शब्द ऐकून आम्हांला खूपच आनंद झाला, व चटकन माझ्या तोंडून शब्द निघाले केवळ बाबांचा स्वप्नातील दृष्टांत व उदीच्या प्रभावामुळे माझ्या आईचा पुर्नजन्म झाला लगेच मला बाबांचे बोल आठवले, "जरी या देहाचा त्याग केला तरी धावेन भक्तांच्या हाकेला" हे बोल माझ्या आईच्या बाबतीत अगदी खरे ठरले.

# नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य
# नित्य घ्या प्रचित अनुभवे ॥

**–श्री. विठ्ठल राधाकृष्ण पै**
१–१ चौधरी निवास, आंबेडकर रोड,
मुलुंड (पश्चिम) मुंबई ८०.

० मी अग्रवाल क्लासेसचा आय. आय. टी. साठी कॉरसपॉन्डिन्स कोर्स जोडला होता. दुसरा प्रश्नसंच आणण्यासाठी मी चर्नीरोडला गेलो होतो. प्रश्नसंच घेऊन मी दादरला आलो. संध्याकाळची वेळ असल्यामुळे स्टेशनवर खूप गर्दी होती. माझा दुसऱ्या वर्गाचा पास होता. मला दादरहून मुलुंडला यायचे होते. गाडीत खूप गर्दी असल्यामुळे मला दुसऱ्या वर्गात चढता आले नाहीं, त्यामुळे मी पहिल्या वर्गात चढलो. गाडी माटुंगा स्टेशनवर आली. माझ्या मागे उभे असलेल्या प्रवाशांना माटुंगा स्टेशनवर उतरायचे होते. त्यामुळे मला माटुंगा स्टेशनवर उतरावे लागले. तेव्हां मला व दुसऱ्या एका मनुष्याला तिकीट निरिक्षकाने अडविले. माझ्याकडील दुसऱ्या वर्गाचा पास पाहून त्याने माझ्याकडे सतरा रुपयांची मागणी केली. दुसऱ्या मनुष्याकडे त्याने वीस रुपयांची मागणी केली. आम्हांला तो रेल्वे कार्यालयात घेऊन गेला. त्या दुसऱ्या मनुष्याकडून त्याने वीस रुपये घेतले व त्याला सोडून दिले. तेव्हां मला वाटले की हा आपल्याकडून पैसे वसूल केल्याशिवाय आपल्याला सोडणार नाहीं. तेव्हां मी साईबाबांचा मनात धावा केला व सुटकेसाठी विनवणी केली. माझ्याकडे असलेल्या पिशवीत अग्रवालचा प्रश्नसंच, साईबाबा संस्थानची डायरी व पाकीट होते. त्या डायरीत तीन व पाकिटात दहा रुपये होते. तिकिट निरिक्षकाने माझ्याकडे पैसे मागितले तेव्हां मी त्याला पाकिटातून दोन रुपये काढून दिले व पाकिट पिशवीत ठेवले. निरिक्षकाने माझी पिशवी तपासली. त्याने माझे पाकिट तपासले परंतु त्यात त्याला पैसे आढळले नाहीत. परंतु साईबाबांची डायरी बघताना त्याला त्यात तीन रुपये आढळले. मी त्याला ते तीन रुपये दिले. तेव्हां तो साईबाबांच्या डायरीतील साईबाबांचे चित्र पाहू लागला. तेव्हां त्यास काय वाटले कोणास ठाऊक? त्याने माझे पाच रुपये मला परत केले पुन्हा पहिल्या वर्गात न चढण्याची ताकीद दिली व सोडून दिले. त्याक्षणी मला साईबाबांच्या अस्तित्वाची जाणीव झाली मला तेव्हां

**"जरी हे शरीर गेलो मी टाकून**
**तरी मी धावेन भक्तांसाठी"** ह्या साईबाबांच्या वचनातील सत्य पटले.

# आवाज नसतानाही सुंदर गाणे !

–डॉ. इंदुताई नाईक
मुक्ता सुतिकागृह, लोणावळा.

१९२२ फेब्रुवारीतील साईलीला मासिकाच्या लेखक कवी संमेलनाच्या वेळची गोष्ट. संमेलनाचा दिवसभराचा कार्यक्रम झाल्यावर पहिल्या दिवशी श्री साईबाबांच्या दरबारात प्रत्येक साईभक्त आपल्या स्वतःच्या कवीता बाबांपुढे म्हणतो व गातो त्या कवीता म्हणण्यात अगर गाण्यात कुणाच्या आवाजाचा किंवा त्याच्या गान कौशल्याचा बिलकूल विचार केला जात नाहीं. प्रत्येकजण स्वतःला विसरून बाबांपुढे त्यांची कला पेश करीत असतो. कुणाचा आवाज बारीक तर कुणी मोठा आवाज काढतो. कुणाचा आवाज बेसुर तर कुणी खरोखरच सूरात गातो.

अशा या दरबारात मला माझी कविता म्हणण्याचा प्रसंग आला आयुष्यात कधीच गाणे न म्हटल्यामुळे व आता माझ्या पुढे ठेऊन कविता म्हणायला बसल्यावर शब्द तोंडातल्या तोंडात घोळू लागले. आजूबाजूची "ताई धाबरू नका येईल तसं म्हणा" असे आवाज कानी पडले. मी वर तोंड करून बाबांकडे बघितले त्या एका क्षणात मी बाबांना म्हणाले, 'बाबा तुझी स्तुती सुद्धा गाऊन मला म्हणता येऊ नयेना. का नाहीं मला चांगला आवाज दिलात. असे म्हणून मी सुरवात केली. आणि मलाच समजले नाहीं की मी न घाबरता बाबांची स्तुती जी मीच लिहिली होती ती मी खड्या आवाजात म्हणून दाखवली. आसावरी रागातले ते गाणे इतके छान झाले की, गाणे संपल्यावर ताई, बऱ्याच छुप्या रुस्तुम दिसला, काय सुंदर म्हटले हो तुम्ही गाणे. वाऽऽ" असे आवाज आले

माझेच मला पण आश्चर्य वाटले. मी बाबांकडेच बघून गाणे म्हणत होते. गाणे संपताच डोळे आनंदाने ओले झाले. बाबांची आपल्या लेकरांवरची हीच माया आम्हां लेकरांना तारून नेते.

★

# अखेर साईबाबांनी इच्छा पूर्ण केली

—श्री. अनिल नारायण रिसबूड
द्वारा श्रीमती मनोरमा र. भागवत
२२३, नवी अमृतवाडी, वि. प. रोड,
गिरगाव, मुंबई-४०० ००४

० आमच्या ऑफिसमध्ये (युनायटेड इंडिया इन्श्युअरन्स कं.) आमच्याच खात्यात काम करणारे श्री. नीलवर्ण नावाचे सद्‌गृहस्थ होते. ते माझ्या शेजारीच बसत असत. अत्यंत शांत, मनमिळाऊ व स्वभावाने अतिशय गरीब होते. त्यांची प्रकृती पहिल्यापासूनच नरम मधुमेह, व रक्तदाबाच्या विकाराने ते नेहमीच आजारी असत. दोन-तीन वर्षांपूर्वीच ते अतिशय आजारपणामुळे बॉम्बे हॉस्पिटल-मध्ये होते. केवळ श्रीसाईबाबांच्या कृपेनेच ते त्यातून वाचले. त्यांचा तो पुनर्जन्मच म्हटला पाहिजे. ते स्वतः व त्यांचे कुटुंबिय साईभक्त आहेत. आपल्या कुटुंबियांना घेऊन एकदा तरी शिर्डीची वारी करून यावी अशी जबरदस्त इच्छा त्यांच्या मनात होती. श्रीरामनवमीला आम्ही (श्रीसाईनाथ मित्र-मंडळ गिरगाव) दर-वर्षी शिर्डीला जातो. त्यावेळी ते मला नेहमी म्हणायचे, "तुमची मजा आहे. तुम्ही दरवर्षी एकदा तरी शिर्डीला जाऊन येता. आम्हांला एकदासुद्धा शिर्डीला जाण्याचा योग येत नाही." मी त्यांना सांगत असे, "तुम्ही काही काळजी करू नका. तुमच्या मनातून शिर्डीला जावयाची इच्छा आहे तसेच श्रीसाईबाबांवर तुमची श्रद्धापण आहे. तेव्हां श्रीसाईबाबा स्वतः तुम्हांला शिर्डीला दर्शनासाठी घेऊन जातील. याची खात्री बाळगा." ते आपले हे बोलणे हसण्यावारी नेत व म्हणत "तो शुभदिन कधी येणार आहे कुणास ठाऊक?

दरवर्षीप्रमाणे आम्ही एप्रिलमध्ये श्रीरामनवमीच्या उत्सवाला शिरडीला जाण्यास निघालो. सहजच मी श्री. निलवर्णांना विचारले की "काय निलवर्ण येणार काय रामनवमीला शिरडीला?" त्यावर ते म्हणाले 'रामनवमीला शिर्डीला खूप गर्दी असते. तुम्ही जाऊन या. रामनवमीनंतर मी जावयाचा विचार करतोय."

आम्ही शिर्डीहून आल्यानंतर मी उत्सवाचे सर्व वर्णन केले. तसेच रामनवमीला आम्हांला आलेला बाबांच्या कृपेचा अनुभवही सांगितला. तेव्हां त्यांच्या मनात

शिर्डीला जाण्याची इच्छा उत्पन्न झाली मी त्यांना सांगितले की, "तुम्ही फक्त तारीख नक्की करा मी माझ्या ओळखीने तुमची एस्. टी. ची तिकिटे व रहाण्यासाठी जागेची व्यवस्था करून देतो." त्यांनी मे महिन्यात बायका–मुलांना घेऊन शिर्डीला जाण्याचे नक्की ठरवले. व त्याप्रमाणे मी एस्. टी. ची तिकिटे काढून दिली, व आमच्या श्रीसाईधाम (मुंबई) आश्रम शिर्डी येथे राहण्याची व्यवस्था करून दिली.

ठरल्याप्रमाणे ते मे महिन्यात तीन दिवस शिर्डीला गेले व श्रीसाईबाबांची समाधी तसेच त्यांच्या लीलालाघवांशी निगडित असलेल्या स्थानांचे दर्शन घऊन मोठ्या प्रसन्नतेने ते मुंबईला परत आले. दोन दिवसांनी त्यांची रजा संपल्यावर ते ऑफि.ला आले. सर्वांना शिरडीचा प्रसाद वाटला. मी विचारले, "कसा काय झाला शिर्डीचा प्रवास?" त्यावर ते म्हणाले "शिर्डीचा प्रवास तर उत्तमच झाला. तसेच शिर्डीला गेल्यावर गुरूस्थान, बाबांच्या समाधीचे दर्शन, श्रीसाईबाबांच्या मूर्तीचे दर्शन, द्वारकामाई, चावडी वगैरे बघून मन प्रसन्न झाले. आज इतक्या वर्षांची माझी इच्छा पूर्ण झाली. भोजनगृहामधील प्रसादरूपी भोजन खूपच आवडले." शिर्डीला जाऊन आल्याचे एक प्रकारचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते. शिर्डीला जाण्याची इच्छा पूर्ण झाल्याचा आनंद त्यांच्या डोळ्यांतून येणाऱ्या आनंदाश्रुंमुळे स्पष्ट दिसत होता. एस्. टी. ची तिकिटे काढून दिल्याबद्दल व रहाण्यासाठी उत्तम व्यवस्था केल्याबद्दल माझे आभार मानू लागले, मी म्हटले "अहो, माझे कसले आभार मानता! श्रीसाईबाबांच्या मनात तुम्ही शिरडीला यावे असे वाटल्यामुळेच त्यांनी स्वतःच सर्व व्यवस्था करून दिली. निमित्तमात्र मी असलो तरी करता करविता तो तेथे बसला आहे. तुमची इच्छा पूर्ण झाली. बस्स! मलाही समाधान वाटले आणि माझ्याही डोळ्यातून एक समाधानाचे आनंदाश्रु नकळत बाहेर पडले."

नंतर दोन दिवस ते ऑफिसला आले नाहीत आम्हांला वाटले की, शिर्डीला जाऊन आले आहेत. एखादेवेळीस त्यांना प्रवासाचा त्रास झाला असेल. कारण त्यांची तब्येत तशी नाजूकच होती. तब्येत बरी झाली की येतील ऑफिसला असा विचार करून दुर्लक्ष केले परंतु . . .

परंतु तिसऱ्या दिवशी ऑफिसला गेल्यावर साडेदहा वाजता ऑफिसमध्ये फोन आला आणि ती बातमी ऐकून आम्हांला आश्चर्याचा धक्का तर बसलाच

परंतु त्या बातमीवर आमचा विश्वासच बसला नाहीं.

हाय! ती बातमी जरी कटू होती तरी शंभर टक्के सत्य होती. पुष्कळवेळा सत्य हे कल्पनेच्या भरारीपेक्षाहि वैचित्र्यपूर्ण असते हेच खरे. श्री. निलवर्ण आम्हां सर्वांना सोडून गेले होते. आम्हां सर्वांना कमालीचा धक्का बसला आपल्या नात्यातलाच एक दुरावा नाहीसा झाल्याचे वाटत होते. लगेच आम्ही मुलुंडला त्यांचे घरी जाण्यास निघालो.

वाटेत जात असताना मनात विचार येत होते, आज अनेक वर्षे श्री. नीलवर्णांच्या मनातून शिर्डीला जाण्याची इच्छा होती. तरीपण ती त्यांची इच्छा पूर्ण झाली नाहीं. एकदम त्यांनी आत्ताच शिर्डीला जाण्याचा निश्चय का केला? ह्याचे उत्तर म्हणजे श्री साईबाबा हे अंतर्ज्ञानी होते. ज्याप्रमाणे मानस सरोवराची प्रदक्षिणा करावयास निघालेल्या मद्रासकडील विजयानंद नावाच्या संन्याशाचे भवितव्य श्रीबाबांना प्रथमपासूनच कळून चुकले होते. त्यांचा अंत:काळ जवळ आला होता हे जाणूनच श्रीबाबांनी त्याला अखेरचा निर्वाणपद गाठण्याचा भक्तीचा मार्ग दाखवून दिला, व आपल्या भक्त मंडळींकडून त्याच्या संन्यासी धर्माला साजेल असाच अग्निसंस्कार त्याला देवविला. त्याचप्रमाणे श्रीसाईबाबांना श्री. निलवर्णांचा अंतिम काळ जवळ आल्याचे नक्कीच समजले असणार. तेव्हां अखेर त्यांची शिर्डीला येण्याची इच्छा आपण पूर्ण केलीच पाहिजे हे जाणून श्रीसाईबाबांनी श्री. निलवर्णांना शिर्डीचे दर्शन घडविले. श्रीसाईबाबांनी म्हटलेच आहे की,

अखेर श्रीसाईबाबांनी श्री. निलवर्णांची शिर्डीला जाण्याची इच्छा पूर्ण केल्याबद्दल त्यांच्या आत्म्याला निश्चितच शांती मिळाली असेल.

> **"जन्मोजन्मी माझा ज्यांचेजवळ**
> **ऋणानुबंध आहे त्यांची मी कधीच**
> **उपेक्षा करीत नाहीं. त्यांची मनोकामना**
> **मी पूर्ण केल्याशिवाय रहात नाहीं."**

★

# बाबा संकटाची सूचना देतात

—सौ. प्रमोदिनी डी. पोतनीस
२६१७ एच. बी. पिंपरी, पुणे १७

० मी श्रीसाईलीला लेखक—कवी संमेलनासाठी शनिवार दिनांक २९—१—८३ रोजी शिर्डी येथे गेले होते. माझे पती माझे बरोबरच होते. रविवार दिनांक ३०—१—८३ रोजी संमेलनास सकाळी ९—३० वाजता सुरवात झाली. तो सर्व दिवस भराचा कार्यक्रम फारच आनंदात पार पडला.

सोमवार दिनांक ३१—१—८३ संकष्ट चतुर्थीचे दिवशी पहाटे साडेपाच वाजता मी बाथरूमला गेले. माझे डोळ्यापुढे अंधार अंधार झाला काहीच दिसेना. माझे डोके बाथरूमचे भिंतीवर आपटून मी खाली पडले. माझी शुद्ध गेली.

मंगळवार दिनांक १—२—८३ रोजी पहाटे मी अर्धवट शुद्धीवर आले तेव्हा मी हॉस्पिटलमध्ये आहे पण कोणी आणले कसे काय झाले याची काहीच जाणीव झाली नाहीं. मला पंधरा दिवस श्रीसाईनाथ हॉस्पिटल शिर्डी येथे ट्रिटमेंट देण्यात आली. मला आता पूर्ण आठवते की मी बाथरूमची कडी लावलेली होती आणि मला कोणीतरी सूचना करीत होते की "संकट आहे कडी काढ कडी काढ" मी कशी कडी काढली ते मलाही काही आठवत नाहीं.

मला जर ही श्री बाबांनी सूचना केली नसती तर पुढील प्रसंग म्हणजे माझी मुले "आईविना भिकारी" झाली असती. माझ्या पतीच्या निरिसम साईभक्तीमुळे श्रद्धा व सबूरीनेच मी आज हे लिहिण्याबद्दल माझे पतीराजांना प्रार्थना केली आहे. मी आता श्रीसाई छत्राखाली तब्येतीने सुधारत आहे."

# साईकृपा आणि विजय

***********************

श्री. मधुकर गजाननराव अंबाडे
लकडी पुला समोर, दांडिया बाजार, बडोदा

० सांज सकाळ नियमित पूजाअर्चा करणारा हा श्रद्धाळू विजय जीवनातील काही तीव्र दुःखामुळे त्रस्त झाला होता. सहनशक्तीपेक्षा जास्त दुःख पडल्यावर मनःस्थिती विचलित झाल्यावाचून रहात नाहीं. त्यातून विजय हा एक सरळ स्वभावाचा समजुतदार एकमार्गी गृहस्थ होता. शरीरयष्टी सुदृढ, बांधा गोंडस, आणि सदा हसतमुख रहाणाऱ्या विजयवर घरातील सर्वांचेच फार प्रेम होते. सदैव मदतीसाठी धाऊन जाणारा विजय सर्वांचाच फार आवडता होता. आपल्या साई-भक्त वडिलांचे तर विजयवर अमर्याद प्रेम होते. चारच दिवसांसाठी विजय बाहेर-गावी असला की वडिलांना अन्न गोड लागत नसे. विजय घरात वावरत आहे असा भास होत असे. दिवसातून दहा–एक वेळा तरी 'विजू–विजू' असं तोंडातून निघून जात असे.

सर्वांचेच प्रेम संपादन करून वागणारा हा विजय आता बऱ्याचवेळा चिडू लागला. केवळ दुःखाकडे पहाण्याचा दृष्टिकोन चुकीचा असल्यामुळे स्वभावात किती विचित्र बदल होतो? सर्वांचाच आवडता विजय आता सर्वांशीच काहीं विचित्र वागू लागला असेच काही दिवस निघून गेले. सुख असो वा दुःख असो जीवन मात्र जगावच लागतं. मग ते आनंदात राहून का जगू नये? असा विचार करून विजय दुःखाला तोंड देत होता. आनंदात रहाण्याचा प्रयत्न करत होता.

सतत मनाला टोचत रहाणारं विजयचं एक दुःख काही नवीन नव्हतं. योग्य शिक्षण प्राप्त केलेल्या विजयच्या हाती कौशल्य होतं, बुद्धी होती. कष्ट करण्याची तयारी होती. विशेष म्हणजे विजय सुस्वभावी होता. असा सद्गुण संपन्न विजय बेकार बनला होता. निरपराध विजयची नोकरी एकाएकी सुटली. विजयचे आई-वडील आणि पत्नी ह्याच्या तिघांच्याही चित्ती एकच चिंता चटके देत होती. विजयने आपलं हे दुःख पत्नीला सांगताच तिचे डोळे स्थिर झाले चिंतेने भुवया थोड्या वर झाल्या उजवा हात आपल्या कपाळी ठेऊन ती मुटकन् खाली बसली. त्या आईला डोळ्यासमोर फक्त आपले मुलं दिसत होते; आणि मुलांच्या पुढच्यात

रिकामे ताट दिसत होते. अनेकवेळा आपण भविष्याच्या नुसत्या काल्पनिक दुःखा-मुळे आपलं आणि इतरांचं वर्तमान जीवन अधिक बिघडवत असतो.

ती शांत अबला, विजयची पत्नी, एकदमच विचित्र हसू लागली. आपल्याच हातानं आपल्या केसाच्या बटा तिनं उपटल्या. विजयच्या पत्नीला आता वेड लागल होत. दुःखानंतर दुःखच आल्यावर देवही दयाळू नाही अस वाटू लागतं. विजयलाही तसच वाटू लागल होत. आता मात्र जीवनाशी टक्कर घेणं जवळ जवळ विजयला अशक्य वाटू लागलं.

विजयच्या सर्व दुःखांपेक्षाही एक जास्त दुःखाची गोष्ट होती. विजय आता नास्तिक झाला होता. ईश्वरावर श्रद्धा म्हणजे जीवनातील दुःखांना तोंड देण्यासाठी मोठ्यात मोठा आधार. तो आता तुटला. होता साधुसंतांवर कधीही विश्वास न ठेवणाऱ्या विजयची आता देवावरचीही श्रद्धा नष्ट झाली. सतत अपयश आणि दुःख आल्यामुळे काही माणसं नास्तिक बनतात तर काही सतत यश आणि सर्व बाजूने सुख लाभल्यामुळेही नास्तिक बनतात.

अतूट साईश्रद्धा असलेले विजयचे वडील मात्र थकलेल्या म्हातारपणात सुद्धा मनोबलतेच्या आधारे साईचरित्राचे अनेक पारायणं करीत असत. अतिशय प्रेमळ आणि भावनाप्रधान अशा ह्या विजयच्या वडिलांना विजयची ही मनस्थिती पहावत नव्हती. आपल्यासाठी व्याकूळ होणाऱ्या, दुःखीकष्टी होणाऱ्या वडिलांची स्थिती विजयला पहावत नव्हती, आणि त्यांची दोघांची ही स्थिती साईमाऊलीला पहावत नव्हती.

विजयच्या जीवनातील एकच मोठा आधार होता तो पण एकाएकी तुटला. कायमचा तुटला. विजयचे वडील गेले. स्वतः काठीच्या आधाराने चालणारे विजयचे वडील विजयच्या मनाला मात्र खूप आधार देत. ते वडील गेले. देह तसाच टाकून त्यांचा प्राण निघून गेला होता. आता हुंदके देऊन रडणाऱ्या विजय-ला प्रेमाने पाठीवरून हात फिरवून धीर देणारं कोणी राहिल नव्हत. अंगावर डोंगर कोसळल्यासारखं झालं.

विजयची ही स्थिती झाली, मग आता त्या विधवा आईची काय स्थिती झाली असेल? आईचं सांत्वन कोणी करायचं? त्या निराधार अबलेला धीर

कोणी द्यायचा? सुन्न मनानं विजय सगळं पहात होता. पण विजयच्या आईला आता हे दुःख पहावत नव्हतं. आपल्या लेकराला फक्त सुखीच पाहू इच्छिणाऱ्या माऊलीला आपला मुलगा फक्त असह्य दुःखानीच गुरफटलेला पहावा लागत होता. ती आई होती. दुःखी लेकरू कसं पाहू शकेल? विधिलिखित दुःखापुढे कोण काय करू शकतो? ती तर एक अबला होती. पण आई ती आईच! एक अबला असूनही तिच्याच श्रद्धेचं फार मोठं सामर्थ्य होतं. साईश्रद्धा असलेल्या तिच्या मनानं साईमाऊलीला हाक मारली. लेकराचं दुःख पाहून ती दुःखी होत होती. रोज रडत होती. रडून रडून पदर ओला होत असे. एक दिवस तो ओलाच पदर तिने साईबाबांपुढे पसरला बाबांना दया आली एकदा.

साडेतीन–चार वाजण्याचा तो सुमार होता. नुकताच दुपारचा आळस झटकला जाऊन वातावरणात हालचाल सुरू झाली होती. विजय मात्र दुपारची झोप न घेताच सज्जात उभा होता. तेवढ्यात एक फकीर घरासमोर आलेला विजयने पाहिला. त्या फकिराने फक्त थोडावेळ घराकडे वरमान करून पाहिलं आणि परत माघारी गेला. फकीराने पै–पैसा मागितला नाहीं आणि तोंडातून शब्दही उच्चारला नाहीं. पण तेवढ्यात एक चमत्कार मात्र घडला. ह्या अश्रद्धाळू नास्तिक बनलेल्या विजयला त्या फकीराचे एक वेगळेच आकर्षण वाटले. धावतच घरात येऊन विजयने मुलाला खाली दवडला, आणि त्या फकीराला वर घरात बोलावलं.

विजयच्या वडिलांनी एकतीस वर्षापूर्वी साईबाबांना एक चादर चढविण्याचे मनात नक्की केले होते. विजयच्या आईला ही गोष्ट चांगली माहित होती, परंतु कालांतराने विसर पडला. ह्या गोष्टीची आठवण त्या फकिराने करून दिली. नंतर त्याने एक नवाकोरा कपडा फक्त मागितला. कपड्याऐवजी पैसे विजयने फकीराला दिले. पण ते त्यानं घेतले नाहीं. घरात लहानसा तुकडा असेल तरी चालेल, असे फकीराने सांगितले. फक्त ऋण–मुक्त करण्याचीच त्या फकीराची इच्छा होती. साईबाबा दान दक्षिणा मागून नेहमीच आपल्या भक्तांना ऋण–मुक्त करीत असत. श्री साईसच्चरितात अशी अनेक उदाहरणं आहेतच.

त्या फकीराच्या चेहेऱ्यात आणि साईबाबांच्या फोटोतील चेहेऱ्यात तीळमात्र फरक नव्हता. साक्षात भूतली साईबाबा पुन्हा अवतीर्ण झाले असं म्हटलं तर जराही अतिशयोक्ती होणार नाहीं. त्या फकीराच्या आवाजात एक विलक्षण

गांभीर्य होतं. एक प्रकारचं विशेष आकर्षण वाटत होतं. फकीराच्या नुसत्या अस्तित्वानं कुणीही भावविवश होऊन जाईल, असं वातावरण निर्माण झालं होतं.

त्या फकीराने घरातील कुणालाही माहित नसलेल्या काही गोष्टी सांगितल्या. विजयच्या भावाला, 'चिडत जाऊ नको' असा सल्ला दिला. 'मुलांचेच खेळण्याचे दिवस असतात — त्यांना सारखं टोकू नका, त्यांना आनंदात ठेवत जा. हे तुमचं कर्तव्य आहे" अशा अनेक अत्यावश्यक गोष्टी त्या फकीराने सांगितल्या. शेवटी प्रेमळ अंतःकरणाने दाटून येऊन, भिंतीवरील साईबाबांच्या फोटोकडे बोट दाखवून विजयला तो फकीर म्हणाला, 'बेटा! फिकीर मत कर, इसपर श्रद्धा रख, सबुरीसे काम ले, स...ब ठीक हो जायगा!!"

विजयच्या मनात अढळ अशी श्रद्धा निर्माण करून विजयला त्या नंतर तो फकीर कुठेही कधीही दिसला नाही. विजयमध्ये त्या फकीराने मात्र चमत्कारिक परिवर्तन घडवून आणलं. फकीराने विजयला एक गुरुमंत्र दिला होता "हा मंत्र रोज सकाळी उठताचक्षणी आसनस्थ होऊन नियमितपणे म्हणत जा, स्नानाच्याही आधी हा मंत्र मनःशुद्धिसाठी प्रथम म्हणत जा." असं त्या फकीराने शेवटी जाताना सांगितलं. विजयनेसुद्धा मनःशुद्धिवर विशेष भर देऊन गुरु आज्ञेचं योग्य असंच पालन केलं.

आता मात्र विजयला पहिल्यापेक्षाहि चांगली नोकरी आहे. योगायोग म्हणावा तर तेही कसं शक्य आहे? विजयने नोकरीसाठी जाहिरात पाहिली तर ती गुरुवारी मुलाखतीला बोलवण्यात आलं तर तेही गुरुवारी! नोकरीवर हजर होण्यासाठी पत्र आलं तर तेही गुरुवारी!! अर्थात विजय नोकरीवर हजर झाला तर तेही गुरुवारी!!!

विजयने आपल्या बुद्धीच्या चातुर्याने खूप प्रयत्न केले होते. खूप धडपड केली होती. पण कधीच यश मिळालं नव्हतं. जीवनाशी लढत असताना विजयचा पराजयच होत होता. यश प्राप्तीसाठी माणूस आपल्या बुद्धीच्या जोरावर खूप धडपड करत असतो; परंतु ती धडपड करत असताना काहीवेळा, बुद्धी आणि शक्ती देणाऱ्या ईश्वरालाच मात्र तो विसरून जातो. यश न मिळाल्यामुळे तो परिस्थितीला वश होतो.

असं म्हणणारा आपला साई कर्मभोगानुसार थोडसं भौतिक अपयश देऊन त्याच्या मनात अतूट श्रद्धा निर्मिण्याचं महान कार्य करत असतो. विजय आज पत्नी आणि सर्व कुटुंबियांसह साई चिंतनात म्हणजेच आनंदात जीवन जगत आहे.

आपल्या भावपूर्ण वाणीनं फकीर जाताना जे म्हणाला होता, ते शब्द विजयला अजूनही नुसती आठवण केली असता कानात घुमत असल्याचा भास होतो. फकीर एवढच म्हणाला होता – "अल्ला भला करेगा!" तो फकीर म्हणजे साक्षात् साईबाबा! हे सांगणे नकोच. आज केवळ साईकृपेनेच विजयचा विजय झाला!

कृतांताच्या दाढेतून । काढीन मी निजभक्ता ओढून ।
करिता केवळ मत्कथा श्रवण । रोग निरसन होईल ।
कथाकरा सादर श्रवण । त्यावरी करा पूर्ण मनन ।
मननावरी निदिध्यासन । समाधान पावाल ।।

★


## ।। हरिः ॐ बाबा ।।

प्रपंच आणि परमार्थ ह्या दोन्हीतही यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शक ग्रंथ, दुसऱ्या आवृत्तीत पदार्पण.

# श्रीसाई अमृतानुभव

लेखक : पां. शं. भुजबळ उर्फ श्रीसाईरंगमहाराज किंमत १५ रु. फक्त

२७७, सोमवार पेठ सातारा २.

**ग्रंथाची ठळक वैशिष्ठे**—(१) डेमी साईज ३६० पाने. (२) पंचरंगी श्री साईबाबांचे शिळेवर बसलेले मुखपृष्ठ. (३) देशात व परदेशात प्रसार पावलेला ग्रंथ. (४) नास्तिकाला आस्तिक करणारा साक्षात्कारी ग्रंथ.

# लेखक-कवी दहावे स्नेहसंमेलन-शिरडी १९८४

श्रीसाईलीला मासिकाच्या लेखक-कवींचे स्नेहसंमेलन श्रीक्षेत्र शिरडी येथे **रविवार दिनांक २९ जानेवारी व सोमवार दिनांक ३० जानेवारी १९८४** रोजी भरविण्यात येत आहे. या दोन दिवसांच्या स्नेहसंमेलनात श्री बाबांचे जवळून दर्शनसुख मेळावा, सांस्कृतिक कार्यक्रम, परस्पर परिचय, श्रीसाईलीला विकास प्रचार-प्रसार इ. दृष्टीने चर्चा व विचार विनिमय, परिसंवाद इ. असा भरगच्च कार्यक्रम आयोजित केलेला आहे.

या स्नेह संमेलन प्रसंगी फक्त श्री साईलीलेच्याच लेखक-कवींना निमंत्रित केले जाणार असल्याने गेल्या पाच वर्षात कमीत कमी निदान **तीनवेळा** तरी आपले गद्य वा पद्य साहित्य श्री साईलीलेतून प्रसिद्ध झालेले आहे, अशाच लेखक-कवींना निमंत्रित केले जाईल. हे निमंत्रण बंधन पाळून श्रीसाईलीलेच्या ज्या लेखक कवींना स्नेहसंमेलनास हजर रहाण्याची इच्छा असेल त्यांनी याच अंकात दिलेला तक्ता रितसर बॉलपेननेच लिहून संपूर्ण भरून तो खाली दिलेल्या पत्त्यावर १ जानेवारी १९८४ चे आत शिरडी येथे मिळेल असा पाठवावा. तो येताच त्यांना अधिकृत आमंत्रण पत्र पाठविण्यात येईल. ता. १ जानवारी १९८४ नंतर या संमेलनाचे बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

संमेलनास येणाऱ्या मंडळींनी शनिवार दिनांक २८-१-८४ रोजीच यावे.

या स्नेहसंमेलनास हजर रहाणाऱ्यांची निवास, चहापान, व भोजन प्रसादाची सारी व्यवस्था श्रीसाईबाबा संस्थानतर्फे केली जाईल. तक्ता पाठविण्याचा पूर्ण पत्ता –

मे. श्री. कोर्टरिसिव्हर, श्रीसाईबाबा संस्थान,
मु. पो. शिरडी, जि. अहमदनगर,
ता. कोपरगाव, पिन ४२३ १०९.

**डॉ. श्री. दि. परचुरे**
**श्री. सदानंद चेंदवणकर**
कार्यवाह

**क. हि. काकरे**
**कोर्टरिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान**
निमंत्रक

**लेखक–कवी १० वे स्नेहसंमेलन शिरडी येथे रविवार २९ व सोमवार ता. ३० जानेवारी १९८४ रोजीचे ...**

माननीय श्री. कोर्टरिसिव्हर साहेब यांना –

सा. न. वि. वि.

शिरडी येथे भरणाऱ्या १० व्या लेखक–कवी संमेलनास मी हजर राहू इच्छितो–इच्छिते. आपणास हवी असलेली माहिती खाली लिहित आहे.

(१) संपूर्ण नाव – (प्रथम आडनाव) ______________________

(२) संपूर्ण पत्ता ______________________

______________________

(३) व्यवसाय ______________________

(४) शिक्षण ____________ (५) वय ______________________

(६) श्रीसाईलीलाचे वर्गणीदार आहे–नाहीं ______________________

(७) वर्गणीदार असल्यास मराठी–इंग्रजी वर्गणीदार क्रमांक ______________________

(८) श्रीसाईलीलामधून गद्य की पद्य लिहितां ______________________

(९) लेख वा काव्याची शिर्षके (केवळ संदर्भासाठी)

महिना प्रसिद्धी वर्ष

१) ____________________

२) ____________________

३) ____________________

४) ____________________

५) ____________________

६) ____________________

(१०) सोबत कुणी येणार आहे? होय–नाहीं.____________________

(११) कोण येणार? (नातू, पती, पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ, बहिण, सून यापैकी कुणाही एकासच आणता येईल.)____________________

(१२) संमेलनात काही ठराव मांडणार? होय–नाहीं ____________________

ठराव मांडणार असल्यास ते वेगळया कागदावर त्वरीत लिहून पाठवा.

स्वाक्षरी

____________________

# उदीचा प्रभाव

सौ तारा कृ. गाडगीळ
२८, सोमवार पेठ,
कराड, ४१५ ११०.

० आमचे एक मांजर आहे. त्याचे नांव मन्या. जानेवारी १९८३ च्या सुमारास त्यास हगवण लागली. म्हणून काही दिवस आम्ही घरगुती उपाय केले. मग पुढे व्हेटरनरी डॉक्टरना सांगून त्यांचे औषध दिले; पण म्हणावा तसा गुण आला नाहीं. असे एकदोन महिने गेले; मन्या फार अशक्त झाला. श्री साईबाबांची उदी घातल्यास गुण येईल असा मनात विचार आला व गुरुवार पाहून उदी रोज घालणेस सुरवात केली. पी हळद हो गोरी अशा प्रकारे लगेच गुण आला नाहीं; तथापि त्याची हगवण कमी होत असल्याचे आढळून आले व महिन्याभरात त्यास पूर्ण गुण आला. मन्या आता पूर्ववत झाला आहे. केवळ श्रीसाईबाबांचे उदी मुळेच गुण आला.

मन्या दिसण्यात सुंदर नाहीं; पण गुणी आहे. मी श्री व्यंकटेश स्तोत्र रात्री १२ वाजता उठून ४२ दिवस म्हणत असता १८ वे दिवशी रात्री १२ वाजले तरी मी उठले नाहीं हे पाहून मन्या माझे डोक्याशी येऊन म्याव म्याव असे ओरडू लागला व मला झोपेतून उठणे भाग पडले. त्याला बाहेर जायचे असेल म्हणून मी दार उघडले. पण हा पळत्या पलंगावर जाऊन पडला. देवाच्या ठिकाणी माझे लक्ष गेले व खंड न पडता व्यंकटेश स्तोत्राचे पारायण पूर्ण केले. हे आमच्या मन्यामुळे घडले.

# साईकृपा

—श्री. विश्वनाथ श्रीधर वरुणकर
५–३, वक्सिंग चाळ,
कुडार व्हिलेज, दफ्तरी रोड,
मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०६४

० गेल्या वर्षी मी सहकुटुंब बाबांच्या दर्शनाला शिरडीला गेलो होतो. गर्दी असूनही नेहमीप्रमाणे बाबांच्या कृपेने रहाण्याची व्यवस्थित सोय झाली. दोन दिवस केव्हां निघून गेले ते समजलेच नाहीं. परत यावयाच्या दिवशी मी नेहमीच बाबांच्या समाधिजवळ तासभर बसतो. त्याही दिवशी बाबांच्या समाधिजवळ मूर्तीकडे टक लावून बसलो होतो. हे रूप डोळ्यांसमोरून केव्हाही हलू नये असे वाटत होते. बाबांचे हे गोंडस रूप असेच सतत नजरेसमोर असावे असे सारखे मनात येत होते. मी माझ्या सद्गुरु दयाघन साईंना भक्तिपूर्ण हात जोडून प्रार्थना केली. "बाबा आज आम्ही सर्वजण मुंबईला परत जाणार. पुढचे येणे आपल्या इच्छेनुसार होईलच. परंतु आपले हे सुंदर मुखकमल सतत माझ्या नजरेसमोर असावयास हवे. जेव्हां जेव्हा आपली मूर्ती पाहाण्याची माझी इच्छा होईल त्या त्या वेळी आपले हे गोंडस रूप माझ्या डोळ्यासमोर यावयास हवे." बाबांना मनःपूर्वक वंदन करून आम्ही सर्वजण त्या रात्री मुंबईला येण्यास निघालो.

त्यानंतर दोन–तीन दिवसांची गोष्ट नेहमीप्रमाणे मी ऑफिसला निघालो होतो. मित्रांशी गप्पागोष्टी करीत रस्त्याने चाललो होतो. ऑफिसजवळ आलो. चालता चालता अचानक वर उचललेले पाऊल तसेच वरच्यावर राहिले. कारण जर ते पाऊल खाली आले असते तर? तर मी स्वतःला क्षमा करू शकलो नसतो. पायाखाली असे काय दिसले असेल बरे, की ज्याच्यामुळे माझे पाऊल वरच राहिले. पायाखाली रंगीत असे एक छोटेसे चित्र होते. खाली वाकून पाहिले आणि काय सांगू! प्रत्यक्ष अंगावर शहारे आले. आनंदाने गहिवरून आले. कसले चित्र असेल बरे ते ? तो होता माझ्या ब्रम्हांडनायक बाबांचा फोटो अगदी त्यांच्या समाधि-जवळच्या मूर्तीचा कॅमेऱ्याचा रंगीत फोटो. आणि तो सुद्धा फक्त त्यांच्या गोंडस मुखकमलाचा. रस्त्यावरून फोटो उचलून घेतांना डोळ्यांतून आनंदाश्रू आले. एवढ्या लवकर बाबांनी माझी इच्छा पूर्ण केली होती. आजही त्यांची ती छबी माझ्या पाकिटात आहे. जेव्हां जेव्हां मला इच्छा होते तेव्हां तेव्हां मी तीचे दर्शन घेतो.

खरोखर तो प्रसंग आठवला की सद्‌गुरु साईबाबांच्या "जो जो मज भजे, जैसा जैसा भावे ॥ तैसा तैसा पावे मीही त्यासी" या वचनाची आठवण होते. बाबांचा माझ्या कुटुंबावर व माझ्यावर पूर्ण कृपाशिर्वाद आहे. आणि अनंत काळापर्यंत तो असाच राहो ही त्या सद्‌गुरुचरणी प्रार्थना.

# कैवल्याचा चांदण्याला भुकेला चकोर

–सौ. मेधा विवेक केळकर.
नाडकर्णी ब्लॉक्स, लॉरेन्स रोड,
देवळाली, नासिक

० श्री साईबाबांवर कॉलेजमध्ये असल्यापासून श्रद्धा होती. परंतु माझं लग्न झाल्यावर मला आलेल्या काही अनुभवानंतर ही श्रद्धा आणखीनच दृढ झाली. युनिव्हर्सिटीच्या परीक्षेच्या वेळेस आमच्या नातेवाईकांपैकी कुणीतरी शिर्डीस जाऊन येत असे. आणि बाबांचा प्रसाद मला परीक्षेच्या आधी मिळत असे. त्यामुळे त्यांची उदी व प्रसाद घेतल्यावर मी परीक्षेत पास होणार याची मला खात्री असे. त्यांच्या आशिर्वादाने मला परीक्षेत यश प्राप्त होत असे.

श्री साईबाबा हे अंतर्ज्ञानी व उच्चकोटीतले सत्पुरुष होते. भक्ताच्या मनातील इच्छा ते अंतर्ज्ञानाने जाणत असत. तसच भक्ताच्या मनातील भाव ते सहजतेने ओळखत अनेकवेळा ते भक्ताची पण परीक्षा पहात.

'दोनवर्षापूर्वी मी प्रथमच हेमाडपंत लिखित "श्रीसाईसच्चरीत या ग्रंथाचे पारायण करायच ठरवलं. पोथीची समाप्ती मी दसऱ्याच्या दिवशी करणार होते,

बाबांना तुपाचा सांजा नैवेद्य म्हणून करायचा ठरविला. परंतु त्या दिवशी आमच्या दादर येथील परिसरात सकाळपासून नळाला पाण्याचा थेंब आला नाहीं. मी तर अगदी रडकुंडीला आले. मनात म्हटलं आता आंघोळ झाली नाहीं तर नवेद्य कसा होणार? त्या दिवशी बाबांनी जणू माझी परीक्षा घ्यायचं ठरवलं असावं. मग आम्ही दादरहून माहिमला माझ्या मावशीच्या घरी आंघोळी करता गेलो, व तेथून पाण्याच्या बादल्या भरून घेतल्या व घरी येऊन नैवेद्य दाखवला. अशा प्रकारे बाबांनी माझं पहिलं पारायण माझी परीक्षा घेऊन पार पाडलं.

दुसऱ्या पारायणाच्यावेळी मला आणखीन एक अनुभव आला तो खालील प्रमाणे, पारायणाच्या समाप्तीच्या दिवशी बाबांना मी मनासारखा नैवेद्य दाखवला. पण त्यात मला पेरूची उणीव भासू लागली. साईबाबांना पेरू खूप आवडत. आणि तो मोसम पेरूचा नव्हता. त्यामुळे बाजारात जाऊनही पेरू मिळतील की नाही अशी शंका वाटू लागली. आणि मनाला सारखी हुरहूर लागली. पेरू मिळाले असते तर बरं झालं असतं. काही वेळाने आमच्या घरातील काम करणारी मुलगी मला येऊन म्हणाली पेरूवाला ओरडतोय असं वाटतं. मी म्हटलं आता लगेच धावत जा. असं म्हणत मी तिला पर्समधले पैसे घाईघाईने काढून दिले. खाली गेल्यावर तिने त्याला शोधलं. पण तो कुठे दिसेना. एवढ्यात रस्त्याच्या बाजूने एक टोपली डोक्यावर घेऊन येणारा माणूस तिला दिसला. आणि त्याच्या टोपलीत खरोखरच पेरू होते. अशा प्रकारे बाबांना पेरूचा नैवेद्य दाखवायची इच्छा त्यांनी स्वतःहून पूरी करून घेतली.

भक्ताच्या मनात काय इच्छा आहे हे जाणून घेण्याच अलौकिक सामर्थ्य त्यांच्या ठायी होतं. चकोर पक्षी ज्याप्रमाणे चांदण्याला भूकेला असतो. त्याचप्रमाणे साईबाबा हे भक्ताच्या प्रेमाचे भूकेले होते.

दुर्दैवाची गोष्ट अशी की काही महिन्यापूर्वी माझ्या वडिलांचं अकस्मात निधन झालं, त्यांच्या मृत्युचा माझ्या मनावर विलक्षण परीणाम झाला, ह्या अकस्मात बसलेल्या धक्क्याने मी ह्या नजिकच्या काळात खूपच खचून गेले. माझ्या बाबांच्या मृत्युनंतर माझा एक आधारस्तंभच कोसळला, मायेचा एक पाश तुटून पडला. आतापर्यंत माझ्या इच्छा व लाड पुरविणारं एक माणूस या जगातून निघून गेलं होतं. त्यानंतर मी बरेचदा आजारी पडले. माझी शक्तीच निघून गेली परंतु साईबाबांच्या उदीने मला अनेकदा गुण आला. त्यांच्या कृपेमुळे मी ह्या

दुःखातून बरीच सावरली गेले. आता ह्यापुढे माझ्या मनातील सर्व इच्छा आकांक्षा श्री साईंच्या कृपेने पूर्ण होतील अशी खात्री आहे.

श्री साईबाबांचे आपल्या भक्तांना हेच सांगणे होते. या जगात अमर कुणीहि नाही. प्रत्येकाला एक दिवस मरावयाचे आहे हे मरणाचे भूत नित्य डोळ्यासमोर ठेवा. म्हणजे तरी तुम्हांला परमेश्वराची आठवण होईल. आणि आपण ह्या जन्मात काहीतरी सत्कर्म केले पाहिजे याची जाणिव होईल.

परमेश्वराची प्राप्ती करून घेण्याचे अनंत मार्ग आहेत. पण सर्वात अगदी सोपा आणि सहजसुलभ मार्ग कोणता असेल तर तो गुरुकृपा होय. गुरुकृपेशिवाय संसार—सागर पार करण अशक्य आहे. योग्य सद्गुरुची भेट होण्यास देखील पूर्व जन्मीची पुण्याई लागते. भक्ताच्या भक्तीची तीव्र आच उत्पन्न झाली पाहिजे. म्हणजे त्याला योग्य मार्गदर्शन करणारा साईसारखा सद्गुरु योगायोगाने आपोआप भेटतो.

म्हणूनच शिर्डीला गेल्यानंतर साईंच्या समाधीसमोर नम्र भावाने आपले मस्तक नमविल्यानंतर खऱ्या भाविक भक्ताच्या अंतःरंगात शुद्ध पवित्र भावनांचे आंदोलन आपोआप सुरु होते. हृदय प्रेमाने गहिवरून येते. मनाला खरा आनंद वाटतो.

साईसारख्या सद्गुरुची पूजा कशी करावी याविषयी हेमाडपंतांनी आपल्या ग्रंथात फार सुंदर विवेचन केले आहे. पंत म्हणतात, बाबांची पाद्यपूजा करताना डोळ्यातील प्रेमाश्रूंचे थेंब पडू द्या. पवित्र प्रेमाच्या चंदनाने त्यांच्या कपाळावर टिळा लावा. पवित्र भक्तीची चादर त्यांच्या अंगावर घाला. सात्विक विचारांची फुलपुष्पे त्यांना वहाण्याचा प्रयत्न करा. म्हणजे साई संतुष्ट होतील, कुणाही भक्ताला प्रसन्न होतील. साईंच्या पूजेला. नवरत्नाची अत्तर, गुलाबदाणीची कशाचीही जरुरी नाही. साई प्रेमाचे, खऱ्या भक्तीचे भुकेले आहे. मनात थोडा जरी विकल्प आला तरी घाबरण्याचे, संशयग्रस्त होण्याचे काही कारण नाही, साई आपल्याला सांभाळून घेतील.

साईमाऊलीने आपल्या उपदेशात म्हटलच आहे की जो आपल्या मनातील अहंकार सोडून माझ्यावर निरपेक्ष भावाने, हृदयाच्या तळमळीने प्रेम करील त्या-लाच माझ्या खऱ्या, सत्य स्वरूपाची ओळख पटेल. माझ्याशिवाय त्याला सर्व जग

शून्य दिसेल. जो मला अनन्य भावाने शरण जाईल त्याला मी ह्या जन्मांतच नाही तर जन्मोजन्मी कधीही अंतर देणार नाहीं.

माझा दुसरा अनुभव असा.

गेल्या दिवाळीतले ते दिवस, माझी प्रसूतीची वेळ जवळ आल्यामुळे मला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आलं. पहिलटकरीण असल्यामुळे मनातून खूप घाबरले होते. पण साईबाबांवर माझी नितांत श्रद्धा असल्याने त्यांच्यावरच सर्व भार टाकला होता.

डॉक्टरांनी तपासून मला अजून काहीं तास थांबाव लागेल असं सांगितलं. पोटात दुखायला सुरवात झाली होती. त्यामुळे मी अगदी बेचैन झाले होते. सारखी साईबाबांच्या नामाचा जप करीत होते.

त्या दिवशी नरक चतुर्दशीचा दिवाळीचा दिवस असल्यामुळे माझी आई हॉस्पिटलच्या जवळच असलेल्या दुकानातून काही खरेदी करून आली त्या दुकानदाराने तिला एक कॅलेंडर दिलं. तिने हॉस्पिटलमध्ये येऊन ते गुंडाळी केलेले कॅलेंडर उघडले. तेव्हां त्यावर साईबाबांच्या आशिर्वादाचा सुंदर फोटो होता. योगायोग असा की त्या दुकानात इतर अनेक देवदेवतांची कॅलेंडर असतानासुद्धा माझ्या आईच्या हातात त्याने बरोबर बाबांचं कॅलेंडर आम्हांला भेट म्हणून दिलं होत.

माझं मन त्याचक्षणी बाबांची अतर्क्य लीला पाहून आनंदाने गहिवरून आलं. त्या कॅलेंडरच्या रूपाने बाबा जणू काही मला धीर देत होते. अग माझ्यावर श्रद्धा आहे ना तुझी, मग कशाला घाबरतेस, सुखरूप सुटका होईल बघ, नंतर आईने ते कॅलेंडर माझ्या कॉटच्या समोरच्या भितीवर अडकवून ठेवलं. माझ्या वेदनेकडे माझं दुर्लक्ष व्हावं याकरता माझ्या आईने सांगितल्याप्रमाणे मी "साईनाथ महाराज आता कृपा करा गुरुराज असं म्हणत मी माझ्या वेदना सहन करत होते. त्यानंतर मी शिर्डीहून आणलेली पवित्र उदी पाण्यात कालवून साईबाबांचं नाव घेऊन घेतली. त्यानंतर नर्सने मला इंजेक्शन दिलं व ऑपरेशन थिएटरमध्ये नेलं. तोपर्यंत डॉक्टर आले नव्हते. त्यामुळे ज्यांच्यावर साईबाबांप्रमाणे मी भार टाकला होता ते नसल्यामुळे माझा सारा धीरच खचून गेला होता. मी सारखी साईबाबांचा धावा करत होते आणि खरोखरच माझा आर्तस्वर त्यांना तेव्हां एकू गेला असावा.

डॉक्टरांच्या अनुपस्थितीतही एका सामान्य वाटणाऱ्या नर्सच्या हातून साई-बाबांनी माझी प्रसूतीतून सुखरूप सुटका केली बाबांच्या कृपाप्रसादाने मला मुलगा झाला होता. त्याचक्षणी माझं अंतःकरण प्रेमाणे गहिवरून आलं.

त्यांच्या वचनाची सार्थकता मला त्याचक्षणी पटली "जरी मी ह्या शरीराचा त्याग करून तुमच्यातून निघून गेलो आहे, तरी कोणताही विकल्प मनात आणू नकात.

माझ्या भक्ताचा आर्तस्वर ऐकून मी त्यांचे दुःख निवारण करण्याकरिता धावून आल्याशिवाय कदापि रहाणार नाही.

अशा प्रकारे माझ्या हाकेला सदैव ओ देणाऱ्या कृपाळू साईमाऊलीला माझे शतशः कोटी कोटी प्रणाम!

"बिकट मोठी जीवन यात्रा ठायी ठायी संकटे सतरा
जपूनी तव नामाच्या मंत्रा मार्ग पुढे चालते"
"साई आहेत उभे पाठीशी, दृढ भरवसा हा मानसी
भय मिती शिवेल कैसी ।
निर्धास्त मी जाहले

# बाबांमुळे ऑपरेशन टळले

—श्री बाळकृष्ण नाखवा
४१।९६४, बी. पी. टी न्यू कॉलनी,
वडाळा, मुंबई ३७

० माझी सून सौ. शालिनी ही गरोदर होती. तिचे नाव बी. पी. टी. हॉस्पिटलमध्ये घातले होते. प्रत्येक महिन्याला डॉक्टर तपासणीसाठी बोलवायचे. नवव्या महिन्यात सुद्धा सून तपासणीसाठी गेली असता डॉक्टरना काही शंका आली आणि तिला हॉस्पिटमध्ये त्यांनी अॅडमिट केले. दुसऱ्याच दिवशी मी हॉस्पिटलमध्ये वाचण्यासाठी साईलीला मासिके व बाबांची उदी नेली. घरातल्या सवयीमुळे नित्यनियमाने उदी लावी, व पाण्यातून प्यायची. दुसरे दिवशी आम्ही सूनेला हॉस्पिटलमध्ये बघायला गेलो. परंतु तेथील सिस्टरने सांगितले की, तिला ४ वाजता प्रसूतिगृहामध्ये नेले.

आम्ही प्रसूति—गृहाकडे गेलो आणि तेथे चौकशी केल्यावर असे कळले की ती प्रसूत झाली नाहीं. थोड्यावेळाने डॉक्टर बाई बाहेर आल्या आणि सांगितले की, तुमच्या सुनेचे जर वेळ आली तर ऑपरेशन करावे लागेल. एवढे ऐकल्यावर घरातील सर्वत्र माणसांना धक्काच बसला. सगळ्यांचे चेहरे उतरले. पण बाबांची श्रद्धा — सबुरी ह्या वचनांची आठवण झाली आणि मनपूर्वक बाबांना हाक मारून विनवणी केली की, बाबा अनेकांचे अनुभव वाचून मन आनंदित व्हायचे. पण आता माझ्या सुनेवर प्रसंग आलेला आहे. तरी ऑपरेशनविना सुखरूप सुटका व्हावी हीच सदिच्छा. बाबांना नवस केला की, सर्व ठीक झाले.

कृष्णजन्माष्टमीच्या दिवशी रात्री मुले कृष्ण कधी आपल्या बरोबर नाचायला येतोय ह्याचप्रमाणे आम्ही हॉस्पिटलमध्ये साईनामाच्या जल्लोषात डोळे टवकारून वाट पहात होतो.

तोच, बाबांचा चमत्कार म्हणा, अथवा बाबांचा अवतार म्हणा, प्रसुति—गृहामधून नर्स बाहेर आली आणि सांगितले. तुमची सून ११.३५ वाजता ऑपरेशन-

विना सुखरूप सुटली. मुलगा झाला. आम्हांला एवढा आनंद झाला की बाबांच्या आरतीमध्ये तल्लीन व्हायचो त्याचप्रमाणे आनंदात झालो होतो. नातवाचा जन्म गुरुवारी झाल्यामुळे "स" वरूनच "सत्कार" असे नाव ठेवले. सहाव्या महिन्यातच नातवाला घेऊन सहकुटुंब शिर्डीला गेलो.

बाबा तुम्हा, आम्हां सर्वांना सुखी ठेवोत, व आमच्यावर सदैव छत्र असलेल्या बाबांना आमचे कोटी–कोटी प्रणाम.

❖ ❖ ❖

# कृपाळू साईमाऊली

–सौ नयना व बिरमोळे
९, लक्ष्मी सदन, साई हिल,
टेंबापाडा रोड, भांडूप,
मुंबई ४०० ०७८.

० तशी मी पहिल्यापासूनच गणेश उपासक पण लग्नानंतर प्रथम आम्ही शिरडीला गेलो. तेव्हांपासून श्रीगणेशाबरोबर बाबांच्या सेवेची देखील मनात प्रेरणा उत्पन्न झाली. माझे पतीदेखिल या सेवेत सहभागी आहेत. बाबांचे अनेक अनुभव आम्ही वाचले व मलाही काही अनुभव आलेत. त्यापैकी एक अनुभव.

जून १९८२ मध्ये अचानकपणे माझे लहानसे ऑपरेशन करायचे ठरले. ऑपरेशनचा दिवस गुरुवार म्हणजे बाबांचाच वार होता. मी ऑपरेशन रूममध्ये गेले. बाबांची आशिर्वादाची तसबीर समोर होती. तिला वंदन करून सर्व भार त्यांचेवर सोपवून डोळे झाकले. शुद्धीवर आले तेव्हां उजव्या हातावर गुंगीचे

इंजेक्शन दिले होते तो हात वर पर्यंत सुजला होता व फार दुखत होता ऑपरेशन पेक्षा हाताचाच त्रास जास्त झाला त्यावर जवळ जवळ दोन तीन महिने घरगुती व डॉक्टरी उपचार केले. तरी हात दुखतच होता नंतर एका गुरुवारी दादरला बाबांच्या देवळात गेले त्यांच्या चरणावर हात ठेवला व सांगितले की या हाताला आता औषधे बंद करून तुमच्या उदीचेच औषध लावेन व हात जर दुखायचा बंद होऊन पहिल्यासारखा झाला तर साईलीलेत अनुभव देईन. त्यानंतर औषधा-शिवाय हात दुखायचा कमी झाला. त्या आधी बोटे हालत नसत, लिहावयास जमत नसे ती तक्रार बंद झाली आता मी चांगल्याप्रकारे लिहू शकते. सर्व कामे करू शकते. ही साईमाऊलीचीच कृपा होय काही कारणामुळे हा लेख आठवण असूनही लिहावयास जमला नाहीं. आता तो बाबांच्याच कृपेने या हाताने लिहिला गेला आहे. लेख लिहावयाचा लांबला तरी बाबा आपल्या भक्ताला कधीच अंतर देणार नाहीत याची मला पूर्ण खात्री आहे. त्यांचे नाव घेऊन कोणतेही काम केले तरी ते पूर्ण होते. हा माझा अनुभव आहे.

अशीच श्री साईमाऊली सर्व भक्तांच्या मागे सावलीप्रमाणे राहून हाकेला धावो, हीच साईचरणी प्रार्थना हरी ओम साई.

पुत्राचे सहस्त्र अपराध माता काय मानी तयाचा खेद
तेवी तु कृपाळू साईनाथ माय बाप मजलागी.

# उदीचा चमत्कारीक अनुभव

श्री. मनोहर शां. राजे
ई-१२ माधवनगर,
वडाळा, मुंबई ४०० ०३१.

० माझ्या डाव्या डोळ्याच्या पापणीवर एक लहान गाठ आली होती ती मोठी होऊन जवळ जवळ डोळा झाकला गेला होता. मी लगेच आमच्या फॅमिली डॉक्टरांकडे जाऊन दाखविला. त्या म्हणाल्या "ह्याला काहीं औषध नाहीं. तुम्हांला ती हॉस्पिटलमध्ये जाऊन दाखवावी लागेल, व कापून घ्यावी लागेल ती पिकण्याची शक्यता नाहीं. मी फारच घाबरलो व श्री साईबाबांचा धावा केला व तुमची उदी लावून ही गाठ फुटली पाहिजे फुटल्यास हा अनुभव साईलीला मासिकात प्रसिद्ध करण्यासाठी पाठविन मी त्या गाठीला सारखी उदी लावली व काय आश्चर्य ती गाठ फुटून त्यातून पाणी वाहू लागले व दुसऱ्याच दिवशी ती कमी झाली व डोळयाची सूज जाऊन डोळा बरा झाला हा अनुभव मला मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात आला व हॉस्पिटलमध्ये जाण्याचे बाबांनीच टाळले. त्याबद्दल त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानले. हा अनुभव आज लिहिन उद्या लिहिन असे करता करता राहून गेले तर थोडयाच दिवसांनी माझ्या डाव्या दंडावर तशीच गांठ आली व तीही कापल्याशिवाय जाणार नाहीं असे डॉक्टर म्हणाले परत मी उदीचा मारा चालू केला व आलेला अनुभव प्रसिद्धिस पाठविला नाही त्याबद्दल श्री बाबांची क्षमा मागितली, व मी कंटाळा केला असला तरीसुद्धा श्रीबाबा माझ्या हाकेला धाऊन आले व आजच ती गाठ फुटून वाहू लागली व हॉस्पिटलमध्ये जाण्याचे त्यांनीच टाळले त्याबद्दल त्यांना माझे शतशः प्रणाम. असा श्री साईबाबांच्या उदीचा ताजा अनुभव मला आला.

# भक्तांच्या हाकेला धावणारे बाबा

—सौ. शीला म्हात्रे
२१ नारळवाडी, माझगाव, मुंबई १०

० मी एक साईभक्त आहे. म्हणजे आमचे कुटुंबच साईभक्त आहे. दरवर्षी "साई निकेतन" दादर मधून निघणाऱ्या मुंबई शिर्डी पदयात्रेस माझे मिस्टर जात असतात आमच्या घरातील प्रत्येक व्यक्तीला बाबांच्या अगाध लीलेचे अनुभव आलेले आहेत. मलाही यापूर्वी अनेक अनुभव आलेले आहेत. त्यातीलच आताच आलेला हा ताजा अनुभव.

बाबांच्या कृपाप्रसादाने मला दोन मुलगे आहेत. त्यातील मोठा प्रसाद व दुसरा साई. साईच्या वेळेचा हा अनुभव देत आहे. साईच्या वेळेस मला दिवस गेले तेव्हां मी खूप घाबरले होते कारण यापूर्वी माझी दोन अबॉशन्स झाली होती. बाबांच्या आशिर्वादाने प्रसाद झाला आणि मला आशाही नव्हती की मला आता मुल होईल अशी. परंतु प्रसादच्या जन्मानंतर चार वर्षांनी पुन्हा दिवस गेल्यामुळे मला सारखे वाटत होते की हे तरी नीट होईल कां? त्यामुळे मी रोज सकाळ, संध्याकाळ, रात्री झोपतानाही बाबांच्या फोटोपुढे उभी राहून बाबांना नेहमी सांगत असे "बाबा हे जे तुम्ही फळ देता ते परिपूर्ण होवू दे, व योग्य दिवशी मुलीची नीट सुटका करा." हा माझा मंत्र रोजच बाबांसमोर चालूच होता त्यामुळे मला नऊ महिने कोणताच त्रास झाला नाहीं. परंतु पुढ नऊ महिने पूर्ण झाले, डॉक्टरांनी दिलेली ३० एप्रिल तारीख होऊनही गेली. तरीही माझे काही सुटकेचे चिन्ह दिसेना. असं करता करता आणखी बारा दिवस वर गेले त्यामुळे घरातील सर्वच माणसे घावरली. शेवटी सासूबाई पंचांग घेऊन दिवस मोजत बसल्या कुठे चुकलेत का ते पहाण्यासाठी पण त्या म्हणाल्या तुझे तर १७ दिवस जास्त होतात एवढे दिवस जात नाहींत हे त्यांचे शब्द ऐकताच मला रडूच कोसळले. त्या दिवशी सबंध दिवस बाबांच्या पुढ्यात उभी राहून रडून रडून बाबांना सांगत होते "बाबा आता तरी मुलीची सुटका करा असे किती दिवस जाणार आहेत अजून योग्य दिवस आला नाहीं का?" आणि खरोखर बाबांनी मुलीची हाक ऐकली तिचे अश्रू पुसले आणि योग्य दिवशी म्हणजे स्वतःच्या वारी गुरुवार १२ मे या दिवशी कसलाही त्रास न होता विलंब न लागता सुटका केली. तोहि मुलगाच झाला म्हणूनच त्याचे नाव साई ठेवले.

अनेकांचे लहान मोठे लेख मी साईलीलेतून नेहमीच वाचत असते मला नेहमी वाटत असे की आपणही आपले अनुभव पाठवावेत परंतु तसे लिहिण्याचे होत नव्हते. परंतु ह्या वेळेला मी बाबांना म्हणाले होते. माझ्या हाकेला धावलात तर मी हा अनुभव साईलीला मासिकात लगेच पाठवून देईन आज मी १५ दिवसांची बाळंतिण असूनही केवळ बाबांनी लिहिण्याची प्रेरणा दिल्यामुळेच हा अनुभव लिहून पाठवित आहे.

अशा ह्या माझ्या बाबांना माझे शतशः प्रणाम —

# माझे परम पूज्य दैवत—साई

—श्री. विजय यशवंत सहानते
मु., पो. चिंचणी
तालुका डहाणू, जिल्हा ठाणे.
पीन ४०१५०३

जो जो मज भजे, जैसा जैसा भावे।
तैसा तैसा पावे मीही त्यासी॥

वरील वचनांचा अर्थ मात्र बाबांनी माझ्या बाबतीत पूर्णपणे खरा करून दाखविला आहे. माझे आराध्य, परमपूज्य श्री साईबाबा आपल्या वचनासाठी कटिबद्ध आहेत. बाबा आपण माझे पाठीराखे, आपला अभय हस्त व कृपादृष्टी असल्याने ह्या संसाररुपी भवसागरात माझ्या जीवन नौकेला सुखःदुखाचे हेलकावे बसून त्यातून फक्त आपणच तारु शकता.

माझ्या अल्पशा भक्तीरूपी साधनेमध्ये जे जे अडथळे आले ते ते श्री साईनाथांनी सोडविले.

श्री बाबांच्या कृपेने मला माझ्या मनाप्रमाणे चांगली नोकरी मिळून प्रमोशन सुद्धा मिळाले. बहिणींची लग्ने सुद्धा बाबांच्या कृपाशीर्वादाने व्यवस्थित पार पडून त्या त्यांच्या संसारात सुखी आहेत. मधल्या बहिणीच्या पहिल्या बाळंतपणाचे वेळी अक्षरश: आम्हाला बाबांनीच तारले व अत्यंत कठीण परिस्थितील सुद्धा सिझरिनने बाळ व बाळाच्या आईस माझ्या साईनी परत दिले, त्यावेळची परिस्थिती आठवून आता अक्षरश: अंगावर काटे उभे रहातात.

दुसरे असे की बऱ्याच वर्षापासून माझे एक स्वप्न होते व ते म्हणजे घराची पुर्नरचना सुधारणा. परंतु अक्षरश: ह्या महागाईच्या काळात घराचे बांधकाम म्हणजे एक दिव्यच आहे व नोकरी पेशातील माणसास ते अवघड जाते. परंतु माझ्या बाबांचीच कृपा म्हणा. वेळेवर पैशाची व अन्य वस्तुंची सोय उपलब्ध होऊन माझ्या मनाप्रमाणे माझ्या बाबांच्याच घरात बाबांनी सुधारणा करुन घेतली.

आताचा ज्वलंत अनुभव म्हणजे माझी मधल्या नंबरची बहिण पुन्हा गरोदर राहिल्याने आम्हा घरातील मंडळीना रोज एकच काळजी होती व ती म्हणजे तिची प्रसूती चांगल्या प्रकारे व्हावी. मी एक दिवस बाबांना म्हणालो की बाबा मी तुमचा जरी खरा भक्त असलो तर माझ्या या वेळी मला आपला दृष्टांत हवा व तो म्हणजे माझ्या बहिणीचे पहिल्याप्रमाणे पुन्हा सिझरिन न होता तिची डिलीव्हरी नॉर्मल होऊन तिला पुत्ररत्न व्हावे. आणि काय आश्चर्य! दिनांक ४ जुलै १९८३ रोजी माझ्या बाबांनी माझी हाक ऐकली व बहिणीला कोणत्याही प्रकारचा त्रास न होता डिलीव्हरी होऊन मुलगा झाला. आज माझा (भाचा साई-प्रसाद, मोठ्या छोकरीचे नाव आम्ही श्रद्धा ठेवले आहे) अगदी छान असून बाबांचे गुणगान करीतच रडतोय असे मला वाटते. माझ्या भाचीस (श्रद्धा) सुद्धा साईबाबांच्या उदीची खूपच आवड असून ती रोज न चुकता ती लावण्यास सांगते.

नियमित साईनाथांचे स्मरण, साईसत्चरित्राचे पठण व आरत्या वगैरेनी बाबांची मी अल्पशी भक्ती करतोय ती बाबांनी गोड मानून ह्या अज्ञानी बालकास सदैव आपल्या चरणीच विसावा द्यावा हीच साईचरणी प्रार्थना.

"कुठे ही असा काहीही करा, एवढे पूर्ण सदैव स्मरा<br>
की तुमच्या इत्यंभूत कृतीच्या खबरा मज निरंतरा लागती." ☆

# साईकृपेचा अनुभव

—सौ. सुनीता मोहन कोंडकर
बाबा कोंडकर वाडा,
भास्कर आळी,
वसई, जि. ठाणे.

○ मी एक साईबाबांची भक्त आहे. त्यांचेवर माझी अत्यंत निष्ठा आहे. मी नेहमी धावा करीत असते.

दिनांक १४ मे रोजी आम्ही आमचे कुलदैवत कुडाळ येथे जाण्यास निघालो. सर्व तयारी झाली होती. जाण्यासाठी आम्ही प्रायव्हेट गाडी ठरविली होती. पहाटे पाच वाजता आम्ही निघणार होतो आणि अचानक रात्री माझ्या मुलाला दोनपर्यंत ताप आला. ताप कशानेच उतरेना. आम्ही बेत रद्द करण्याचे ठरविले. माझा साईनामाचा जप चालूच होता. मी साईबाबांना गाऱ्हाणे घातले जर माझ्या मुलाचा ताप उतरुन आम्हाला कुलदैवतेला जाण्यास मिळाले तरच मी माझ्या भक्तीवर विश्वास ठेवीन, आणि तसेच मी नवस केला की माझ्या मनासारखे झाले तर मी 'साईलीलेत' अनुभव लिहून पाठवीन, आणि काय आश्चर्य एक तासातच माझ्या मुलाचा ताप उतरुन सकाळी आनंदाने आम्ही सर्वजण निघालो. कुडाळ ते गोवा असे पंधरा दिवसाची ट्रिप करुन मजेत आलो. आणि या पंधरा दिवसात माझ्या मुलाने कसलाच त्रास दिला नाही. ही श्री साई माऊलीचीच कृपा आहे.

श्री साईबाबांची कृपा आमच्या पाठीशी सदैव रहावी हीच प्रार्थना!

❖ ❖ ❖

# जरी हे शरीर गेलो मी टाकून ।
# तरी मी धावेन भक्तांसाठी ॥

—सौ. अरुणा भालचंद्र कर्णिक.
'शिवालय अपार्टमेंट
ब्लॉक जी-५-ए, एस. व्ही. पी. रोड,
बोरिवली-पश्चिम, मुंबई ४०० ०९२

आमच्या कुटुंबातील सर्वचजण श्री साईबाबांची भक्ती मनापासून करतात. कोणतेही काम करताना व कोठेही बाहेर जाताना बाबांची उदी लावून व नमस्कार करूनच बाहेर पडतात.

सन १९७६ ची गोष्ट माझ्या सासूबाई वयाच्या ९२ वर्षी वृद्धापकाळामुळे निधन पावल्या. त्यांच्या क्रियाकर्माची सारी जबाबदारी माझ्या मिस्टरांवर होती. त्यामुळे ह्यांना एकच काळजी लागून राहिली कि सर्व काही व्यवस्थित होईल की नाही? त्याप्रमाणे २—३ दिवस क्रियाकर्म सुरू झाले. हे रोज उदी लावून, बाबांना नमस्कार करून सांगायचे की सर्व व्यवस्थित होऊन द्या. १३ व्या दिवशी (श्राद्धाच्या दिवशी) ह्यांनी बाबांना मनःपूर्वक नमस्कार करून आदराने भोजनरूपी प्रसादाला येण्याचे आमंत्रण दिले. व सांगितले की ह्या कार्यक्रमाची परिपूर्णता करा. त्याप्रमाणे सर्वांची जेवणे आटोपली. सर्व मंडळी जाण्याच्या तयारीला लागली. तेवढ्यात साधारण सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास मला आचाऱ्याने हाक मारली व म्हणाला, 'वहिनी, इकडे या जरा. हा माणूस बघा काय सांगतो की मला भूक लागली आहे. मला जेवायचे आहे.' यावेळेस जरा मी घाईतच होते. तरीपण काही मनांत शंका न आणता मी विचारले, 'कोण आहे हा?' तेव्हा याने सांगिले की भाड्याची भांडी आणणारा गाडीवान आहे. तेव्हा मी म्हणाले, हो वाढा ना, त्यांना व्यवस्थित सर्व वाढा. यांत काय विचारायच आहे? आणि नंतर ही गोष्ट माझ्या मनात घर करून राहीलीसुद्धा नाही.

साधारण २—३ दिवसांनी सर्व पाहुणे गेल्यावर सर्व आटोपल्यावर माझे मिस्टर म्हणाले की, झालं बाबा सर्व व्यवस्थित. मी बाबांना सुद्धा ह्या भोजनाचे आमंत्रण दिले होते. आणि त्याप्रमाणे श्री बाबा नक्कीच कुणाच्या तरी रुपाने येऊन प्रसाद घेऊन गेले असणार. त्यांचा हा श्रद्धापूर्वक ठाम निश्चय ऐकून मी एकदम

सुन्न होऊन विचारले. की काय हो, अगोदर मला नाहीत हे बोललात? कारण एक माणूस अगदी सर्व आटोपल्यावर खाकी पँट व खाकी शर्ट घालून आला होता व सर्वांत शेवटी म्हणजे सायंकाळी ५ वाजता मला भूक लागली आहे, मला जेवायला वाढा, अंक मागणी करून जेवून सुद्धा गेला. पण, मला तर हे तुम्ही बोलल्याचे काहीच माहीत नव्हते, असो. मला तर वाटते की, श्री बाबाच प्रत्यक्ष येऊन भोजन करून गेले. हे ऐकून माझे मिस्टर म्हणाले, बघितलस, प्रत्यक्ष श्री साईबाबा 'जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव' ह्या आपल्या वचनाला जागले!

खरोखरच नेहमी आपल्या भक्तांच्या हाकेला धावून येणाऱ्या शिर्डीच्या ह्या श्री साईबाबांना आमच्या कुटुंबाचे कोटी कोटी प्रणाम!

# बाबांनी मला नोकरी दिली

—कु. अलका वसंत सावंत
१८; ब, लक्ष्मी कॉटेज,
परेल, मुंबई क्र. ४०० ०१२.

मी गेली दोन वर्षे नोकरीसाठी सातत्याने प्रयत्न करत होते. घरची परस्थिती अत्यंत बिकट असल्यामुळे हा त्रास होत होता त्यातूनही शिर्डीला बाबांकडे जाण्याची प्रबळ इच्छा पण यश येईना शेवटी शिर्डीला जाण्याची इच्छा साईबाबांनी १॥ महीन्यांनी नोकरी देऊन पूर्ण केली. शिर्डीहून परतल्यानंतर पुन्हा परस्थितीची उजळणी सुरू. शेवटी नोकरी शोधण्याचे प्रयत्न सोडून दिले. अखेर साईबाबानांच माझी दया आली आणि उद्या माझी नेमणूक होणार त्याच्या आदल्या दिवशी दृष्टांत देऊन बाबानी मला दर्शन दिले व आशिर्वाद देवून माझं मन तृप्त केलं. दुसरे दिवशी दृष्टांता प्रमाणे "सेंट्रल टेलिग्राफ ऑफीस C.T.O." प्रमाणे मध्ये टेलीग्राफटीस '(Telegraphits) या पदावर माझी नेमणूक झाली. म्हणतात ना श्रद्धा तेथे फळ हे ब्रीद पुरेपूर माझ्या प्रत्ययास आले.

परमेश्वराने मला भकरी दिली ती आज मी आनंदाने खात आहे परंतु यासाठी प्रयत्न माझ्या गुरुमाऊलींनी केले. अश्या या माझ्या गुरुमाउलीची मी अनंत जन्मी ऋणी आहे. आज ते मला मुली म्हणूनच हाक मारुन दृष्टांत देतात. असेच त्यांचे कृपाशिर्वाद सदैव माझ्याच नाहीतर माझ्या कुटुंबियांवर राहून भावी आयुष्य उज्वल करावे आणि सर्व साईभक्तांवरसुद्धा त्यांचे कृपाशिर्वाद रहावेत एवढीच त्यांच्या चरणी प्रार्थना.

# शरण मज आला आणि वाया गेला ।
# दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥

—सौ. रजनी अशोकराव घेवारी
४००, गुरुवार पेठ,
सातारा-२.

आमच्या घरी श्री साईबाबांचा खूप जुना असा आशिर्वादाचा फोटो होता. परंतु आमच्या घरातील कोणीही त्या फोटोची पुजाअर्चा कधीही केली नव्हती. ज्याप्रमाणे नामदेव, तुकाराम, एकनाथ या साधुसंताप्रमाणेच श्री साईबाबा असावेत असा माझा समज होता. नरहरी सोनाराप्रमाणेच आम्ही शिवभक्त त्यामुळे फक्त शिवलिंगाची रोज नित्यनेमाप्रमाणे पुजा-अर्चा नैवेद्य वगैरे विधी व्यवस्थितपणे आणि शुचिर्भूतपणे करीत असत. आम्ही लिंगायत असल्यामुळे फक्त लिंगाचीच तेवढी पुजा-अर्चा करीत. इतर देवदेवतांकडे हव्या तितक्या प्रमाणात मन लावले नाही. त्यांची पुजा-अर्चा देखील केलेली नव्हती.

लिंगायत म्हणजे फक्त लिंगाचीच पुजा करणे असा माझा स्वतःचा समज होता. परंतु श्री साईबाबांनी मला आकृष्ट केले.

"श्री साईलीला" मासिकातील आश्चर्यकारक ताजे अनुभव, त्याचप्रमाणे बाबांच्या विषयी भक्तांना येणारी प्रचिती यावरून मला देखील बाबांच्या बद्दल तीव्र ओढ लागली. मासिकांतील एकेक नवनवीन अनुभव वाचता वाचता श्री साई-बाबांचे नाव नकळत जीभेवर नाचू लागले. ॥ ॐ नमः शिवाय !! या जपाप्रमाणेच ॥ हरी ॐ साई ॥ हा जपही सुरु झाला.

आमचेकडे श्री साईबाबांच्या प्रतिमेची श्री शंकराच्या पुजेअर्चेप्रमाणेच पुजा होऊ लागली. जणू काही बाबा हेच कैलासनाथ होऊन अवतरले; घरामध्ये ते एकरुप झाले असे वाटू लागले. मनातील कोणतीही इच्छा बाबांजवळ बोलावी आणि ती पूर्ण व्हावी. यात नवल ते काय? लेकीने केलेला हट्ट वडीलांनी पूर्ण करावा याप्रमाणे घडू लागले.

माझी सर्वात धाकटी मुलगी असीता. तिला महत्प्रयासाने आम्ही आमच्या शहरातील एका शाळेमध्ये प्रवेश मिळविला. ती बालवाडी मध्ये जाऊ लागली. परंतु काही दिवसानंतर तिचे रडगाणे सुरु झाले की मी शाळेमध्ये जाणार नाही. मला शिकावयाचे नाही. शाळेमध्ये जातेवेळी रोज दंगा, रडगाणे चालू व्हायचे. तिला गोड बोलावे, वेळप्रसंगी रागवावे पण बालहट्टच तो. त्यामध्ये भरीसभर म्हणून मोठ्या दोन्ही मुलांचे अभ्यासावरून लक्ष कमी झाले. खेळण्याचे प्रमाण जास्त वाढले. अभ्यासामध्ये चांगले असणारे त्यांचे नंबर घसरले.

आजच्या या महागाईच्या काळात शिक्षणावर एवढा खर्च करून उपयोग काय? या विचारामध्ये मन त्रस्त होऊन गेले. नको हा संसार, नको हा प्रपंच. आपण या सर्वांचा त्याग करून कुठे तरी निघून जावे असे मनामध्ये वाटू लागले या सर्व विचाराने कांही सुचेनासे झाले. या विचारामध्येच असताना माझे लक्ष समोर भितीला लावलेल्या श्री साईबाबांच्या प्रतिमेकडे गेले. बाबा मला हात हलवून आशिर्वाद देत होते. आणि म्हणत होते की, एवढ्याशा क्षुल्लक गोष्टीला एवढा खचतेस. संसाररूपी सागरात अशी छोटी मोठी वादळे येणारच. त्यामुळे नावेला हेलकावे बसणारच. त्यास असे भिऊन कसे चालेल.

नकळत अश्रुपूर्ण नयनांनी बाबांना हात जोडले आणि प्रार्थना केली. बाबा! तुम्हीच मला मार्ग दाखवा. माझी मुलं हुषार व्हावीत. छोटी असीता शाळमध्ये व्यवस्थितपणाने जावी. ही माझी इच्छा पूर्ण करा. मला धनसंपत्ती नको. मुलांचे शिक्षण हीच माझी धन संपत्ती होय. मी "श्री साईसच्चरित्राचा" सप्ताह करीन.

त्याप्रमाणे मी "श्री साईच्चरित्राचा" सप्ताह केला आणि जादूची कांडी फिरविल्याप्रमाणे मुलानांही बांबांनी मोहीत केले. मुले शाळेत जाताना तसेच परिक्षेला जाताना नमस्कार करून आणि उदी सेवन करू लागली. त्याचप्रमाणे मुले अभ्यास चांगल्या प्रकारे करू लागली. लहान असीताला सर्वांनी सांगितले की, ते बघ बाबा तुझ्याकडे बघताहेत तुला आशिर्वाद देत आहेत. तू जर अभ्यास केला नाहीस तर तुझ्यावर बाबा रागावतील. तुला ते शिक्षा देतील. तिच्यामध्ये देखील हळूहळू बदल होऊ लागला. ती मुळाक्षरे काढू लागली. वार्षिक परीक्षा झाली. सर्वांचा रिझल्ट समाधानकारक लागला. मनाला अतिशय आनंद झाला. लहान असीताच्या बाईनी (वर्गशिक्षकांनी) तर मला बोलावून घेतले आणि सांगितले की, पहिले सहा महिने तुमची मुलगी रडत होती. त्या मानाने तिने चांगली प्रगती केलेली आहे. आता तर वर्गामध्ये सर्वांपेक्षा पुढे बसण्याकरिता दहा वाजल्यापासून शाळमध्ये जाण्यासाठी हट्ट चाललेला असतो.

साई रहम नजर करना ।बच्चोंका पालन करना ।।

"श्री साईसच्चरित्राचा" सप्ताह केल्यापासून लगेच शिर्डीला जवयास मिळाले. शिर्डीस्थान पाहिल्यानंतर बाबांच्या दर्शनाने मन बाबांच्यामध्ये गुंतले गेले. तिन्ही मुले श्री साईबाबांची अकरा वचने त्याचप्रमाणे बाबांची भजने म्हणू लागली.

शिव आणि साई यांमध्ये भेद राहिला नाही.

इवलेसे रोप लावियले द्वारी। तयाचा वेलू गेला गगनावरी ।।

ज्या ज्या वेळेस आमच्यावर संकटे येतात अडचणी येतात तेव्हा आम्ही सर्वजण मन:पूर्वक प्रार्थना करतो, त्यांचे भजन करतो. त्याप्रमाणे अडचणीमधून मुक्त होतो.

# शिरडीवृत्त माहे ऑगस्ट १९८३

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली, ती खालीलप्रमाणे –

**कीर्तन** :– १) ह. भ. प. शुक्लेश्वर महाराज, मोरवी.
२) ह. भ. प. जाधव गुरुजी, शिर्डी
३) ह. भ. पु. वासुदेवशास्त्री धर्माधिकारी, अकोले

**प्रवचन** :– १) ह. भ. प. रघुनाथ कृष्ण कारखानीस, पुणे.
२) ह. भ. प. लक्ष्मण महाराज वाक्चौरे, शिर्डी.
३) ह. भ. प. स्वामी प्रभाकर, केरळ.
४) ह. भ. प. धनाजी भ. साळुंके, कोवळ, डि. कऱ्हाड.

**भजन, गायन, वादन, नृत्य वगैरे** :– (१) श्री. वनवासी मंडळ, कोल्हेवाडी, जामखेड. (२) श्री. ज्ञानेश्वर भजनी मंडळ, नांदुर्खी, (३) श्री साईनाथ भजनी मंडळ, शिर्डी (४) श्री. गोपाळ चौरसीया, कलकत्ता (५) कु. संगीता कुलकर्णी, मुंबई (६) श्री. प्रभूप्रसाद प्रिंसीपॉल म्हैसूर (७) श्री. भास्कराचार्य तिरुपती (८) सौ. विशालाक्षी श्रीवेंकाटाचलम, दिल्ली, (९) श्री. अनुराग श्रीवास्तव, मुंबई (१०) श्री. राजन पटेल, मुंबई (११ श्री सुदेश पटेल, मुंबई (१२) श्री. विनायक महादेव कापडी, मुंबई. (१३) श्री. संजीवराव कोहाड, नागपूर. (१४) नरेंद्र कुहाड, नागपूर. (१५) श्री साईनाथ गुंडवेल्ली, (१६) सौ. चंदाताई जगदीश तिवारी, पंढरपूर. (१७) श्री. अरुण ओंकारदास सोमाणी, संगमनेर, (१)) श्री. डी. टी. सावंत, भांडूप (१९) श्री सय्यद मीरसय्यद मुलतान (२०) लोणे, विजापूर (२०) श्री. माधवराव शंकरराव वहारणे, लोणी, (२१) श्री. बाळ करंदीकर, डोंबिवली, (२२) श्री. चंद्रकांत शिरोडकर, विलेपार्ले (२३) सौ. कुमुदिनी मुंडकूर, पुणे (२४) श्री साईनाथ महिला मंडळ शिर्डी (२५) मंजिरी कर्वे, पुणे, (२६) श्री. जी. डी. ओक.

**स्वराज्य प्राप्ती दिन** :– सोमवार १५ ऑगस्ट १९८३ रोजी श्री साईबाबा संस्थान, शिर्डीतर्फे मा. कोर्ट रिसीव्हर श्री. क. हि. काकरेसाहेब यांचे शुभ हस्ते

प्रतिवर्षाप्रमाणे ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमास संस्थान कर्मचारी श्री साईनाथ हायस्कूल बँडपथक, शिक्षकवर्ग, होमगार्डस्, पोलीस, विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्रतिष्ठित ग्रामस्थ मंडळी, साईभक्त, पाहुणे मंडळी उपस्थित होती कार्यक्रम संपल्या वर सर्वांना चहापान देण्यात आले. व मुलांना खाऊ वाटण्यात आला. रात्री समाधी मंदिर व श्रींचे कळसावर रोषणाई करण्यात आली होती.

**श्रीकृष्ण जयंती कार्यक्रम** :— बुधवार दि. ३१–८–८३ रोजी नित्याचे कार्यक्रम झाल्यावर रात्री ९ ते १० कलाकारांचा कार्यक्रम झाला. १० ते १२ पर्यंत ह. भ. प. वासुदेवशास्त्री धर्माधिकारी, अकोले यांचे कृष्णजन्मावर कीर्तन झाले. त्यानंतर शेजारती झाली, व सर्वांना तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्री समाधी मंदीर व श्रींच्या कळसावर रोषणाई करण्यात आली होती. दुसरे दिवशी गोपाळकाला, कीर्तन व दहीहंडी कार्यक्रम झाल्यावर रात्री श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून फिरून आली. त्यानंतर शेजारती झाली.

**हवापाणी** :— शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही पावसाचे प्रमाण कमी आहे.

## माहे सप्टें. १९८३

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी भक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. रविवार, गुरुवार व सुटीचे दिवशी बरीच गर्दी होती. काही कलाकारानी श्रींच्या पुढे हजेरी दिली, ती खालीलप्रमाणे—

कीर्तन—(१) ह. भ. प. श्री. वासुदेवशास्त्री धर्माधिकारी, अकोले.
(२) ह. भ. प. हिंमतराव बेडुजी मोरे, तळेगाव, जि. जळगाव.

प्रवचन—(१) ह. भ. प. मुरलीधर देशमुख महाराज, शिर्डी.

भजन, गायन, वादन वगैरे—(१) श्रीमती रमाबाई मुळे, नेहरे (धुळे). (२) श्री. श्रद्धानंद केळकर आणि मंडळी, रत्नागिरी. (३) श्री. वासुदेव दयाळ, नागपूर. (४) श्री. साईनाथ भजनी मंडळ, शिर्डी. (५) श्री. रामकृष्ण आंबादास चौधरी, नागपूर. (६) श्री. कृष्ण प्रसाद भजनी मंडळ, तांदुर्वी. (७) सद्गुरुदास किसनबाबा मंदिर, मुंबई ४. (८) श्री. रमेश दत्तात्रय वैद्य, मुंबई. (९) श्री. स्वामी

संजयानंद. (१०) सौ. मीरा संजयानंद. (११) जय-विजय ऑर्केस्ट्रा पार्टी, मनमाड. द्वारा विजयकुमार आळवले. (१२) हेटकरी समाज महिला मंडळ, मुंबई. (१३) (१३) श्री. श्रीधरबुवा मुणगेकर, सांताक्रुझ. (१४) श्री. राजेंद्र इंगळे, परळ. (१५) श्री सरस्वती संगीत विद्यालय, लातूर. (१६) श्रीरंग रंगभूमी, कोल्हापूर. (१७) श्री. मुकेशकुमार सक्सेना दिल्ली. (१८) श्री. संयोग नाट्य मंडळ, वाडेगव्हाण, पारनेर, (१९) श्री. म्हैसास भजनी मंडळ, मिरज. (२०) शिवशाहीर गहीनीनाथ पांडुरंग देशमुख, सांगली. (२१) श्री. प्रभाकर डोंगरे. (२२) श्री. अर्जुन सखाराम माने. (२३) श्री. संग्राम पांडुरंग सोहार. (२४) (२४) श्री. शरद रामचंद्र गिरमे. (२५) श्री. रामदास रणदिले. (२६) श्री. राजन पटेल, सायन. (२७) श्री. अनिलकुमार पगारे. मुंबई.

हवापाणी.—शिरडी येथील हवा-पाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पाऊस चांगला पडला.

★

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | २२-०० | ६-०० |
| २) | ,, | इंग्रजी | १३-५० | ४-०० |
| ३) | ,, | हिंदी | १२-०० | ४-०० |
| ४) | ,, | गुजराथी | १२-०० | ४-०० |
| ५) | ,, | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ६) | ,, | तेलगू | १३-०० | ४-०० |
| ७) | ,, | तामीळ | १२-०० | ४-६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७-५० | ३-०० |
| ९) | ,, | हिंदी | ७-०० | ३-५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४-२५ | ३-०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४-०० | ३-०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०-३५ | ३-०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०-३० | ३-०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०-५० | ३-०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०-५० | ३-०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १-२५ | ३-०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | ५-०० | ३-०० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०-७५ | ३-०० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४-०० | ३-०० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४-५० | ३-०० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १-७५ | ३-०० |
| २३) | ,, | इंग्रजी | १-७५ | ३-०० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १-५० | ३-०० |
| २६) | ,, | हिंदी | १-७५ | ३-०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

(कव्हर पृष्ट ३ वरून)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०–५० | ३–०० |
| २८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५–२५ | ३–०० |
| २९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १–५० | ३–०० |
| ३०) | ,, | मराठी | १–५० | ३–०० |
| ३१) | शिरडी गाईड | गुजराथी | १–५० | ३–०० |
| ३२) | ,, | हिंदी | छपाई चालु | आहे. |
| ३३) | रुद्राध्याय | मराठी | ०–१० | ३–०० |

३४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी १०–०० प्रत्येकी प्रत १–००
(व्ही. पी. ची पद्धत नाहीं)

| अ क्र. | फोटोचे नाव | फोटो साईज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२० | १–३५ | ३–०० |
| २) | ,, | १०"×१४' | १–१० | ३–०० |
| ३) | ,, | ७"×१०' | ०–५५ | ३–०० |
| ४) | ,, | ४"×५" | ०–२० | ३–०० |
| ५) | ,, | २"×३" | ०–१५ | ३–०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | १४"×२०" | १–६५ | ३–०० |
| ७) | ,, (काळा पांढरा) | १४"×२०" | १–३५ | ३–०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २–७५ | ३–०. |
| ९) | ,, | १३"×१८" | १–०० | ३–०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा (रंगीत फोटो) | १०"×२०" | १–१० | ३–०० |
| ११) | ,, (काळा पांढरा) | १०'×१४" | ०–८५ | ३–०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो | ९'×१२' | १–१० | ३–०० |
| १३) | ,, (रंगीत) | ९"×१२' | १–६५ | ३–०० |
| १४) | शिक्का | ९×१३ | ०–७५ | ३–०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे फ्याचे कॅलेंडर | — — — | १६–०० | ८–०० |

मुद्रक : पांडुरंग भोरे. बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, संपादक व प्रकाशक : श्री. क. हि. काकरे, साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४, बी. दादर मुंबई १४.